# माणूस

शनिवार । १६ सप्टेंबर १९७८ । ७५ पैसे

एका शतकापूर्वी अमेरिकन संघराज्याच्या संरक्षणासाठी अब्राहम लिंकनने सर्वस्व पणाला लाविले. ‘ एकात्म अमेरिकन व्यक्तिमत्त्व आणि एकात्म समाज ’ निर्माण करण्यासाठी आज आपणही असेच सर्वस्व पणाला लावू या . . . .

## वांशिक दंगलीनंतर अमेरिकेत झालेलं एक विचारमंथन

मुखपृष्ठ . . . . २

‘ डेव्हिड कॉपरफील्ड ’ हा डिकन्सच्या कल्पनाशक्तीचा आविष्कार नव्हता, तर असे अनेक डेव्हिड कॉपरफील्ड प्रत्यक्ष अस्तित्वात होते. आज मात्र समाजवाद हा शब्द जनतेच्या आशाआकांक्षांचे शब्दरूप बनला आहे आणि जनता आज थांबायलाही तयार नाही. आपल्याकडील उत्पादकशक्तींची कोंडी आहे तशीच पुढे चालू राहिली तर ?

## अर्थशास्त्रज्ञ कांता रणदिवे यांची मुलाखत

पृष्ठ . . . . ९

# साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे–अंक सोळावा

१६ सप्टेंबर १९७८

मूल्य ७५ पैसे



संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९


मराठवाडा विद्यापीठ नामांतरावरून झालेल्या दंगलीनंतर समतावादी मंडळीही एकात्म समाजनिर्मितीसंबंधी आस्था दाखवू लागलेली आहे. या दृष्टीने हा लेख विचारांना चालना देणारा, आपल्या पुनर्वसन-कार्याला दिशा दाखवू शकणारा ठरू शकेल.

प्रेसिडेंट जॉन्सन यांनी वांशिक दंगलींवर दीर्घकालीन उपाययोजना सुचविण्यासाठी एक महामंडळ नेमले होते. महामंडळाने एक प्रदीर्घ अहवाल सादर केला. प्रस्तुत लेख या अहवालाचा केवळ सारांश आहे.

# एकात्म अमेरिकेची निर्मिती

आम्ही ज्या शिफारशी येथे केल्या आहेत आणि जे कार्यक्रम सुचविले आहेत, त्यांचा सरकारने अंमल केल्यास दंगलींना खात्रीपूर्वक लौकरच पायबंद बसेल; पण दीर्घकालीनदृष्टचा प्रवाह कोणत्या दिशेने वाहतो आहे, त्याविषयीचे चित्र अत्यंत स्पष्ट आहे. दंगलींना जन्म देणाऱ्या प्रवृत्तींचा जोर वाढता आहे.

यांपैकी महत्त्वाची व मूलगामी प्रवृत्ती आपल्या सर्वांत मोठ्या शहरांमधून पसरलेल्या नीग्रोंच्या 'महारवाड्या'तून (घेट्टो) गरीब आणि संकटग्रस्त नीग्रोंची वस्ती खूप झपाट्याने वाढत आहे ही आहे. अशा 'महारवाड्या'तून राहणारी नीग्रो लोकसंख्या आज १ कोटी २१ लाख आहे, ती १९८५ पर्यंत सुमारे २ कोटी ८ लाख होईल. म्हणजे ती ७२ टक्क्यांनी वाढलेली असेल. हे नीग्रो 'महारवाडे' शहरांच्या मध्यभागी मूळ गावठाणात निर्माण झालेले आहेत.

अमेरिकेतील नागर जीवनाचे स्वास्थ्य आणि दर्जा अशा मोठ्या शहरांच्या भवितव्याशी साक्षात निगडित आहे.

अमेरिकन समाज अत्यंत गुंतागुंतीचा आहे. त्यामुळे, शहरातील मध्यवर्ती नीग्रो वस्त्या आणि उपनगरे, तसेच नीग्रो आणि श्वेतवर्णीय लोकांची महानगरक्षेत्रातील वस्ती यांचे वेगवेगळे घाट निर्माण करणे शक्य आहे. व्यवहारात दोन महत्त्वाचे प्रश्न डोळ्यांपुढे उभे राहतात, असे आम्हास वाटते. गेल्या वीस वर्षांप्रमाणे यापुढील काळातही नीग्रोंची वाढती लोकसंख्या शहरांच्या मध्यभागातच केंद्रित होऊ द्यावी का आणि नीग्रो आणि श्वेतवर्णीय लोक यांची वस्ती अधिकच वर्णभेदाधारित होऊ द्यावी का? समाजाने नीग्रोंना आणि तत्सम इतर दलित गटांना अधिक विशेष सहाय्य द्यावे काय?

### तीन पर्याय

या प्रश्नांना ज्यात निश्चित उत्तरे दिलेली आहेत, असे तीन मूलभूत पर्याय महामंडळ विश्लेषणाच्या सोयीसाठी निर्दिष्ट करीत आहे, ते पुढीलप्रमाणे :

## 'जसे थे' वादी पर्याय

मूलतः आजची धोरणेच कायम ठेवून गरीब, दलित आणि बेकार वर्गांना मदत देण्याचे आज चालू असलेले कार्यक्रम व त्यासाठी साधनसंपत्तीचा बाजूला काढून ठेवला जाणारा वाटा आजच्या पातळीवर कायम ठेवावयाचा. आर्थिक वाढीबरोबर (ती होईल असे गृहीत धरून) व त्याबरोबरच वाढणाऱ्या केंद्रीय सरकारच्या उत्पन्नवाढीतून या कार्यक्रमांवर खर्च होणारी एकूण रक्कम वाढेल. तरी पण, या कार्यक्रमांच्या वाढीची गती शहरांतील मध्यभागात असलेल्या नीग्रो वस्तीच्या झपाट्याने बिघडत चाललेल्या परिस्थितीच्या तुलनेत मंदच राहील. हा पर्याय आपण निवडल्यास अंतिमतः आपणांस सर्वांत जबर किंमत सामाजिकदृष्ट्या चुकवावी लागेल. ही गोष्ट आम्ही पुढे स्पष्ट करणार आहोतच.

## संपन्नतेचा पर्याय

दुसरा पर्याय असा की, मोठ्या शहरातील 'महारवाड्या'तून नीग्रो लोक केंद्रित होण्याचे जे परिणाम होत आहेत, ते दूर करण्यासाठी राष्ट्र काही विशेष कार्यक्रम हाती घेईल. शिक्षण, घरबांधणी, नोकऱ्या, प्रशिक्षण आणि कल्याणकारी सुखसोयी या बाबींवर खर्च होणाऱ्या रकमांत भरीव वाढ करून शहरांच्या मध्यभागातून राहणाऱ्या दलित श्वेतवर्णीय आणि नीग्रो यांच्या जीवनाचा दर्जा या पर्यायातून उंचावला जाईल. या पर्यायाद्वारे नीग्रो आणि श्वेतवर्णीय यांचे दारिद्र्य दूर केले जाईल. त्यामुळे अमेरिकन जीवनाच्या मुख्य प्रवाहात मिसळून जाण्याची कुवत त्यांच्या ठिकाणी येईल. या पर्यायातून नीग्रोंचे 'महारवाड्या'तून होणारे केंद्रीकरण किंवा 'महारवाड्या'च्या बाहेरही वर्णभेदावर आधारलेली वस्ती या प्रवृत्तींना किमान अनेक वर्षे तरी आपण विशेष अटकाव करू शकणार नाही.

## एकात्मीकरणाचा पर्याय

विभक्त आणि असमान असे दोन समाज देशामध्ये निर्माण होण्याची प्रवृत्ती उलटविण्याचे उद्दिष्ट तिसरा पर्याय डोळ्यांसमोर ठेवील. नीग्रो 'महारवाड्या'तील जीवनाचा दर्जा मोठ्या प्रमाणावर सुधारण्यासाठी वरील दुसऱ्या पर्यायाप्रमाणेच याही पर्यायात भर दिला जाईल; पण नीग्रोंनी शहरातील 'महारवाड्या'तून बाहेर पडावे यासाठी समर्थ प्रोत्साहने निर्माण करणे, तसेच घरे, नोकऱ्या, आणि शाळा या बाबतीतील त्यांचे निवड-स्वातंत्र्य अधिक विस्तृत करणे, या दोन गोष्टींना या पर्यायात महत्त्व दिले जाईल. हा पर्याय स्वीकारला तरी संपूर्ण एकात्मता निर्माण होणार नाही; तरीपण पुष्कळ अंशी दोन्ही समाज एकात्मतेकडे वाटचाल करू लागतील आणि अलगपणाची कोणावर सक्ती होणार नाही.

असे तीन पर्याय मांडणे म्हणजे एका अर्थाने आजच्या परिस्थितीत काय करता येणे शक्य आहे याविषयी काहीसा अतिशयोक्तीचे चित्र निर्माण करण्यासारखे आहे; पण आम्हाला असे वाटते की, मूलभूत समस्या त्यातून स्पष्ट होतात. अमेरिकन समाजाला जर खरोखरीच वांशिक संघर्ष पूर्णपणे बंद व्हावेत, आपल्या लोकशाहीचे भवितव्य सुरक्षित रहावे असे वाटत असेल, तर वरील समस्यांना डावलून चालणार नाही.

## जैसे थे वादी पर्यायाचे परिणाम

हल्ली आपल्या देशातील बलिष्ठ अशा 'जैसे थे'वादी सामाजिक व राजकीय शक्ती या देशाला क्रमाक्रमाने सध्याच्या धोरणाच्या मार्गाने दुभंगलेला समाज निर्माण करण्याकडे खेचून नेत आहेत. या मार्गाने वाटचाल करीत असताना आपण हाती घेतलेल्या सामाजिक व आर्थिक कार्यक्रमांमध्ये पुष्कळ बदल होतील हे खरे आहे; पण नीग्रोंचे केंद्रीकरण, वर्णभेदावर आधारलेले अलगीकरण आणि बकाल वस्त्यांचे अधिक अधःपतन या तीन मुख्य घटकांमध्ये मूलभूत परिवर्तन करण्यास असे बदल असमर्थ ठरतील. शहरांच्या मध्यभागातून कारखाने उभारले जावेत यासाठीचे प्रयत्न, शिक्षणावर केंद्रीय सरकारच्या खर्चात केलेली वाढ, 'दारिद्र्याविरुद्ध युद्ध' आणि 'आदर्श शहर योजना' या दोन मोहिमांमध्ये समाविष्ट असलेल्या संकल्पना या दिशेने चाललेल्या प्रयत्नांमधून नीग्रोंचे व इतर दलितांचे जीवन थोडेफार संपन्न होईल; पण थोडेफारच. कारण, सध्याच्या केंद्रसरकारच्या कार्यक्रमासाठीदेखील अमेरिकन काँग्रेसने मंजूर केलेली रक्कम अत्यंत कमी आहे. नीग्रोंचे केंद्रीकरण होऊ नये, ते अलग पडू नयेत, या ध्येयाने राष्ट्र अद्यापही प्रेरित झालेले नाही. राष्ट्राने स्वतःला त्यासाठी बांधून घेतलेले नाही. नीग्रोंना घरे खरेदी–विक्री करताना वर्णभेदाच्या मुद्यावरून नकार देणे बेकायदेशीर ठरविणारा कायदा अद्यापही काँग्रेसमध्ये लोंबकळत पडला आहे. हा इतिहास ताजा आहे. राष्ट्राध्यक्षांनी परत एकदा काँग्रेसला हा कायदा पास करण्यासाठी आवाहन केले आहे.

भविष्यासाठी वर जे तीन पर्याय नमूद केले आहेत त्यांपैकी 'जैसे थे'वादी पर्याय, जो तूर्त तरी आपण निवडलेला दिसतो, हा सर्वांत अधिक भयावह व घातक ठरणार आहे. वर्णभेद दूर करण्यासाठी, कमालीचे दारिद्र्य हटविण्यासाठी आज समाज जे काही करीत आहे, त्यापेक्षा 'जैसे थे'वादी पर्यायाखाली फारसे अधिक केले जाणार नाही. वांशिक दंगलींच्या संभाव्यतेच्या दृष्टीने या पर्यायाचे काय परिणाम होतील? अलीकडील वर्षांत ज्या घटनांमधून मोठ्या वांशिक दंगली उद्भवल्या त्या प्रकारच्या हिंसक घटनांची संख्या 'जैसे थे'वादी पर्यायाची निवड केल्यास वाढेल, असे आम्हाला दोन कारणांनी वाटते.

शहरांच्या मध्यभागातून तरुण नीग्रोंची संख्या झपाट्याने वाढत आहे. या तरुणांच्या बुद्धिमत्तेस विधायक आव्हान देईल, त्यांच्या ऊर्मीचे समाधान करील, त्यांच्या आशा फुलवू शकेल असे 'जैसे थे'-वादी पर्यायामध्ये काहीही नाही. म्हणजेच अशा नीग्रो तरुणांपैकी, बहुसंख्यजण बेकार किंवा अर्धबेकार राहतील. भूतकालात शहरांतून होणाऱ्या गुन्ह्यांमध्ये आणि हिंसक प्रकारांमध्ये या तरुण मंडळींचा वाटा प्रमाणाबाहेर मोठा आहे आणि भविष्यातही तो तसा मोठा राहील अशी भीती वाटते. शहरातील दुर्लक्षित भागात राहणाऱ्या नीग्रोंपैकी उत्तरोत्तर अधिकाधिक लोकांना, दंगलीच्या द्वारे जीवन विस्कळित करण्याचा मार्ग जे आत्यंतिक वृत्तीचे नीग्रो अवलंबीत आहेत त्यांना पाठिंबा देण्यासाठी आपल्या दलित आणि बंदिस्त जीवनात पुरेसे समर्थन मिळेल अशी 'जैसे थे'वादी पर्यायात शक्यता आहे. अर्थात, हिंसक प्रकारांची संख्या वाढणे याचा अधिक उग्र दंगली होतील असा आवश्यकतः अर्थ होतोच असे नाही. अगदी

नजीकच्या भविष्यकालाचा विचार करता, एकटघा-दुकटचा प्रक्षोभक घटनेमधून मोठी दंगल उद्भवण्याच्या आधी उपाययोजना करता येईल अशी बरीच शक्यता आहे; पण दूरवरचा विचार करता, आजपर्यंत अनुभवलेल्या दंगलींच्यापेक्षाही खूप रौद्र दंगली घडण्याची शक्यता 'जैसे थे'वादी पर्यायाच्या पोटात सामावलेली आहे.

अंतिमतः आजचीच धोरणे चालू ठेवण्याची जी सामाजिक व आर्थिक किंमत द्यावी लागेल, ती अन्य पर्यायांचा स्वीकार करण्याने द्यावयास लागणाऱ्या किमतीच्या तुलनेने खूप मोठी असेल. शहरातील 'महारवाड्या'तून नीग्रोंची आणि इतर दलित अल्पसंख्यांकांची वस्ती अधिक केंद्रित जशी होत जाईल तसा समाजकल्याणकारी योजना, कायदा व सुव्यवस्था यांचे पालन, बेकरी-निवारण आणि या प्रकारचे कार्यक्रम यांवर होणारा खर्च सारखा वाढत जाईल; पण त्यामधून शहरातील जुने भाग अधिकाधिक अवनत होत जाण्याची प्रवृत्ती आणि त्यांमधून फोफावणारी निराशा व असंतोष उलटविली जाणार नाहीत. तरी पण यात नफानुकसानीच्या ताळेबंदातील सर्वांत महत्त्वाची बाब ही बरीचशी अदृश्य अशीच रहाते. गरिबी, संधींची विषमता आणि अलगीकरण यामुळे मानवी मूल्यांमध्ये निर्माण होणाऱ्या अश्रद्धेच्या नाण्यात मोजावी लागणारी किंमत ही किती मोठी असेल याचा हिशेब होऊ शकत नाही.

याहून आणखी आणि तितकाच गंभीर परिणाम असा की, या मार्गाने वाटचाल करीत राहिल्यास दोन विभक्त समाजांची कायमच्यासाठी निर्मिती होईल. एक मुख्यत्वेकरून श्वेतवर्णीयांचा जो बहुसंख्य उपनगरांत व छोट्या शहरांतून वस्ती करील, ग्रामीण भागातून वस्ती करील आणि दुसरा मुख्यत्वेकरून नीग्रोंचा, जो शहरांच्या मध्यभागांतून वस्ती करून राहील, असे दुभंगलेले राष्ट्र निर्माण करण्याच्या मार्गावर आपण बरीच वाटचाल आताच केली आहे.

ही विभागणी अद्याप स्पष्ट झालेली नाही. ती बुरख्याआडच आहे. कारण, नीग्रोंचे मोठ्या शहरांतून अद्यापि प्रभुत्व प्रस्थापित झालेले नाही; पण ते लौकरच प्रस्थापित होईल. नव्याने सत्ता हाती घेणाऱ्या भावी नीग्रो महापौरांना सध्यापेक्षा जास्त अडचणींच्या प्रसंगांना तोंड द्यावे लागणार आहे. कारण, आपल्या मोठ्या शहरांतून जशी नीग्रोंच्या हाती सत्ता येईल तशी, श्वेतवर्णीयांची वस्ती कमी होऊन अल्प उत्पन्न असणाऱ्या नीग्रो लोकांचे प्रमाण अधिकच वाढेल अशी शक्यता आहे. आजच्याच वेगाने श्वेतवर्णीय आणि नीग्रो या दोघांचेही उत्पन्न वाढत राहिले तरी ही गोष्ट होईल. कारण, मुळातच नीग्रोंचे उत्पन्न श्वेतवर्णीयांपेक्षा खूप कमी आहे.

आपल्या मोठ्या व प्रमुख शहरांतून नीग्रो बहुसंख्यांक महापालिकाशासने निर्माण होतील त्या वेळी बहुधा उपनगरे आणि महानगरक्षेत्रातील मतदारांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींचे कॉंग्रेसमधील आधिक्य व प्रभाव अधिकच वाढलेला असेल. उपनगरे व महानगरक्षेत्रातील वस्ती करणाऱ्या लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण १९६० साला ३३ टक्के होते, ते १९८५ साली ४१ टक्क्यांवर जाईल असा अंदाज आहे. याउलट शहरांच्या मध्यभागांतील वस्त्यांच्या बाबतीत हीच टक्केवारी सध्याच्या ३१ वरून २७ पर्यंत खाली घसरेल. एकात्मीकरणाच्या दिशेने जर जोमदार पावले आपण टाकली नाहीत, तर अशी शक्यता आहे की, अशा उपनगरांतून व महानगरक्षेत्रांतून राहणाऱ्या एकूण लोकसंख्येत ९५ टक्क्यांहून अधिक श्वेतवर्णीय असतील. हा मतदारांचा गट वजनदार तर असेलच; पण शहरांच्या मध्यवर्ती भागात राहणाऱ्या लोकांच्या तुलनेने खूप अधिक सधन असेल. भविष्यामध्ये महापालिकांच्या शासनांवर होणारे खर्च खूप वाढतील आणि या सधन भागांनादेखील त्याची झळ लागेल. असे झाले म्हणजे मग शहरांच्या मध्यवर्ती भागांची आत्यंतिक गरज असूनही कॉंग्रेस त्यांना मोठ्या प्रमाणावर साहाय्य करण्यास विरोध करील. आजच कित्येक मोठ्या शहरांतील महापौर मध्यवर्ती सरकारकडे मोठ्या प्रमाणात मदत मिळावी म्हणून विनंत्या करीत आहेत.

अशा प्रकारे 'जैसे थे'वादी पर्याय आणखी काही काळ चालू राहिला, तर आपल्या सर्वांत मोठ्या महानगरक्षेत्रांमध्ये सर्वत्र एकाच वेळी राजकीय व आर्थिक ध्रुवीकरण होईल. यांपैकी एक ध्रुव मुख्यतः नीग्रो, गरीब आणि जवळजवळ दिवाळखोर असा शहरांचा मध्यवर्ती भाग असेल. मुख्यतः श्वेतवर्णीय, सामान्यतः धनी, करांच्या भाराखाली वाकलेला असा उपनगरांचा विभाग हा दुसरा ध्रुव बनेल.

मालमत्तेवरील कर, हवा-पाण्याची स्वच्छता व शुद्धता तसेच केरकचऱ्याची वासलात आणि लोकांची दैनंदिन नोकरीधंद्यासाठीची वाहतूक यांसारख्या निकडीच्या शहरी प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी क्षेत्रीय उपाययोजनांचा विचार करू शकणारी एक वेगळ्या धर्तीची महानगरक्षेत्र प्रशासनव्यवस्था निर्माण करून वरील ध्रुवीकरणातून उगवणारा राजकीय संघर्ष टाळण्याचा प्रयत्न काही ठिकाणी होईल; पण अशा प्रयत्नांमधून नीग्रोंच्या अलगीकरणावर वा शहरांतून राहणाऱ्या नीग्रोंच्या सापेक्ष दारिद्र्यावर तोडगा निघत नाही, ती वस्तुस्थिती तशीच कायम राहील. वरील प्रकारच्या महानगरक्षेत्रीय शासनव्यवस्थेमुळे शहरांच्या मध्यवर्ती भागांची राजकीय सत्ता नीग्रोंच्या हाती जाण्यास प्रतिबंध निर्माण झाला, तर उलट, आपण वाळीत पडलो आहोत, ही परकेपणाची भावना व नैराश्य यांत भरच पडेल.

आज जेव्हा शहरातील 'महारवाड्या'तून १ कोटी ६५ लाख नीग्रो राहत आहेत, अशा वेळी वांशिकदृष्ट्या एकात्म समाजाची निर्मिती जर कमालीची अवघड गोष्ट असेल, तर मग ज्या वेळी श्वेतवर्णीयांपेक्षा तेव्हाही अधिकच गरीब व कमी शिक्षित असे २ कोटी १० लाख नीग्रो १९८५ साली अशा वस्त्यांतून राहू लागतील, तेव्हा तर एकात्मतेची भाषाच करता येणार नाही. 'जैसे थे'वादी पर्याय कायम ठेवूनही नीग्रो व श्वेतवर्णीय यांच्यात ध्रुवीकरणाची प्रक्रिया घडून न यावी यासाठी दोन गोष्टी साहाय्यभूत होऊ शकतील. त्यांपैकी पहिली गोष्ट, अलीकडच्या काळात नीग्रोंच्या उत्पन्नात ज्या वेगाने वाढ झाली आहे त्यापेक्षा अधिक वेगाने त्यांचे उत्पन्न वाढले पाहिजे. असे झाले तर, त्यामुळे शहरांतील नीग्रोवस्त्या दारिद्र्याच्या सापळ्यात आजच्यापेक्षा अधिकच वाईट अवस्थेत अडकणार नाहीत. 'दारिद्र्याचा सापळा' या शब्दप्रयोगाने नीग्रोंसाठी नोकऱ्या निर्माण करण्याच्या परिणामकारक कार्यक्रमाचे, तसेच कुटुंबीय मंडळींसाठी आर्थिक मदतीचे प्रमाण वाढविण्याचे महत्त्व सूचित होते. नीग्रोंमधील मध्यमवर्ग वाढत आहे. हा मध्यमवर्ग

शहरांतील मध्यभागांतून उठून वस्तीसाठी जर उपनगरांत व महानगरक्षेत्रांत पसरला तर ही ध्रुवीकरणाची प्रक्रिया काही प्रमाणात रोखली जाईल. अर्थात मध्यमवर्गीय नीग्रोंची अशी विखुरणी झाली, तरी शहरातील मध्यवर्ती भाग व उपनगर व महानगरक्षेत्रे यांच्यात केंद्रीय साहाय्यासाठी असलेली स्पर्धा थांबणार नाही; पण निदान या स्पर्धेला वर्णसंघर्षाचा रंग, गडद स्वरूपात तरी, प्राप्त होणार नाही.

वर उल्लेखिलेल्या घटना घडून येतीलच, असे म्हणण्यास काही बळकट आधार नाही. नीग्रो मध्यमवर्ग आजही म्हणावा इतका मोठा आहे. १९६० ते ६६ या काळात तो खूप जोराने वाढत आला आहे आणि तरीही या वर्षामध्ये नीग्रो लोकसंख्येत जी एकूण वाढ झाली त्यापैकी ८८.९ टक्के वाढ ही शहरांच्या मध्यभागांतून केंद्रित झालेली आढळली. इतिहासात हे प्रमाण हा एक उच्चांक आहे. किंबहुना १९६० ते ६६ या कालात महानगरक्षेत्रांतून शहरांच्या मध्यभागांत नीग्रोंची नक्त आवकच झालेली आहे.

लोकांची मनोवृत्ती आणि सरकारी धोरणे यांत महत्त्वपूर्ण बदल घडून आल्याखेरीज आजचा दुभंगलेल्या समाजाच्या दिशेने वाहणारा प्रवाह उलटविला जाऊ शकेल, असे महामंडळाला वाटत नाही.

## संपन्नतेच्या पर्यायाचे परिणाम

संपन्नतेच्या दुसऱ्या पर्यायाची बैठक अर्थव्यवस्थेची प्रत्यक्ष कामगिरी ही आहे. हा पर्याय स्वीकारावयाचा याचा अर्थ राष्ट्रीय उत्पन्नाचा मोठा वाटा या कामासाठी लावावा लागेल. शहरी नीग्रो 'महारवाड्या'तून राहणाऱ्या नीग्रोंच्या जीवनामध्ये नाट्यपूर्ण बदल घडवून आणण्यासाठी पुरेसा, इतका मोठा हिस्सा त्यासाठी बाजूस काढावा लागेल. संपन्नता निर्माण करण्याच्या दृष्टीने परिणामकारक धोरणे अवलंबिली, तर दंगलींवर तीन प्रकारचे परिणाम तत्काळ होतील अशी शक्यता आहे. निश्चित मोठे असे कार्यक्रम जाहीर केले आणि ते प्रत्यक्षात साकार करण्याचा निर्धार दाखविला, तर कदाचित आपल्यापुढील समस्यांची सोडवणूक खरोखरच होणार आहे, अशी 'महारवाड्या'तून राहणाऱ्या नीग्रोंची भावना होईल व त्यामुळे वांशिक तेढ कमी होईल. अशा प्रकारचा निर्धार प्रकट झाला, तर नीग्रोंच्या आशाआकांक्षांना नवी चेतना मिळेल, ही दुसरी गोष्ट घडून येईल. या आशाआकांक्षा समाज तावडतोब पुऱ्या करणार नाही, इतक्या अधिक उंचावण्याची शक्यतादेखील लक्षात घेतली पाहिजे. त्यातून निर्माण होणारी निराशा व असंतोष हा एक विघातक परिणाम काही प्रमाणात होईल. अशा निर्धाराचा परिणाम म्हणून मोठ्या प्रमाणावर बेकार असलेल्या नीग्रो तरुणांसाठी उपयोगी प्रशिक्षणाच्या सोयी निर्माण करणे आणि मोठ्या प्रमाणावर उत्पादक नोकऱ्या त्यांना मिळतील अशी व्यवस्था करणे, या दिशेने भरीव पावले तातडीने टाकली गेली तर त्यामुळे बेकार तरुण नीग्रो उद्योगी बनतील व मग ते समाजविध्वंसक चळवळीत कमी सामील होतील.

'जैसे थे'वादी पर्याय आणि संपन्नतेचा पर्याय या दोन्हींच्या मध्ये अगदी नजीकच्या काळात शहराच्या मध्यभागांतून घडणाऱ्या विध्वंसक घटनांचे प्रमाण कमी करण्याची कुवत जवळपास सारखीच आहे, असे कदाचित निष्पन्न होईल; पण शिक्षण, नोकऱ्या, घरे आणि नागरी सुखसोयी या बाबतीतल्या दलित लोकांच्या गरजा पुऱ्या करण्यात जर संपन्नतेचा पर्याय यशस्वी झाला, तर कालांतराने मात्र या पर्यायामुळे दंगलींचे प्रमाण व उग्रता दोन्ही कमी होतील याविषयी शंका नाही.

संपन्नतेच्या पर्यायाचे एक उद्दिष्ट अर्थातच केवळ नीग्रोंना नव्हे, तर सर्वच दलित अमेरिकनांना मध्यमवर्गीय जीवनमान प्राप्त करून देणे, हे राहील.

नीग्रो समाजात मध्यमवर्गात समाविष्ट होणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत गेली तर असे नीग्रो शहरांच्या मध्यभागांतून अन्यत्र स्थलांतर करतील आणि अशा प्रकारे संपन्नतेचा पर्याय बंदिस्त 'महारवाड्या'तून बाहेर पडण्यासाठी महाद्वार उघडे करून देईल, असे प्रतिपादन केले जाऊ शकते. असे प्रतिपादन दोन कारणांनी लंगडे आहे, असे आम्हाला वाटते.

पहिली गोष्ट आजपर्यंतचा अनुभव असा नाही. शहरांच्या मध्यभागांतील नीग्रो वस्त्यांमध्ये राहणाऱ्या मध्यमवर्गीय कुटुंबांची संख्या आजच मोठी आहे आणि त्यात सारखी वाढ होत आहे; परंतु त्यातील फारच थोडी मंडळी उपनगरात वा महानगरक्षेत्रात स्थलांतर करू शकली आहेत. आर्थिक सुस्थिती प्राप्त झाली की कुटुंब शहराच्या मध्यभागातून उपनगरात स्थलांतर करते, हा श्वेतवर्णीयांच्या बाबतीत दिसून आलेला प्रवाह नीग्रो कुटुंबांच्या बाबतीत आढळलेला नाही. त्यासाठी घरांच्या खरेदी-विक्रीविषयक कायद्यांमध्ये वर्णभेद हा गुन्हा ठरविला जाणे आणि अशा कायद्यांची परिणामकारक अंमलबजावणी होणे आवश्यक आहे; पण याहीपेक्षा अधिक सर्वस्पर्शी बदल धोरणात व वृत्तींमध्ये घडून यावे लागतील. यासाठी संपन्नतेच्या पर्यायाची लक्ष्मणरेषा ओलांडावी लागेल. वेळ फार थोडा आहे आणि त्याचा विचार वरील प्रतिपादनात नाही, हा दुसरा दोष म्हणावा लागेल. समजा, नीग्रोंची आर्थिक परिस्थिती सुधारून मध्यमवर्गीयांच्या संख्येत भर पडली आणि शहराच्या बकाल वस्तीतून स्थलांतर करणाऱ्यांचा प्रवाह वाहू लागला तरी तो पुरेसा मोठा व वेगवान असेल काय? म्हणजे बकाल नीग्रोवस्त्यांची वाढ रोखण्याइतके वेगवान स्थलांतर होईल काय?

दरवर्षी २ लाख १७ हजार लोक शहरांच्या मध्यभागातील वस्त्यांमधून स्थलांतर करून गेले तरी देशील १९७५ पर्यंत या वस्त्यांचा लोकसंख्येत जी वाढ होणार आहे त्यापैकी फक्त निम्म्यांची बरोबरी या स्थलांतराने होईल. १९६० ते ६६ या काळात, दरवर्षी उपनगरातील नीग्रो लोकसंख्येत होणाऱ्या वाढीच्या संख्येच्या (यामध्ये जन्म-मृत्यू धरून होणारी नैसर्गिक वाढही समाविष्ट आहे. म्हणजेच, होणारी सर्व वाढ स्थलांतरित नीग्रोंमुळे नाही, हे लक्षात घ्यावयाचे) २ लाख १७ हजार ही संख्या ८ पट येते. अत्यंत प्रभावी असा संपन्नतावाढीचा कार्यक्रमदेखील स्थलांतराचे हे प्रमाण गाठू शकणार नाही. संपन्नतेच्या पर्यायाचा हेतू भिन्न वांशीय लोक एकमेकांपासून विभक्त ठेवण्याचा अर्थातच नाही. तरीही या पर्यायाचे गृहीत असे आहे की, जवळपास पूर्ण अलग राहूनही, त्याही परिस्थितीत दलित नीग्रोंना श्वेतवर्णीयांच्या बरोबरीने आपला उत्कर्ष साधण्याची संधी प्राप्त होऊ शकेल.

या भूमिकेचा पाठपुरावा 'ब्लॅक पॉवर' या पंथाच्या पुरस्कर्त्यांनी

जोराने केला आहे. मुळात नीग्रोंना वांशिक एकात्मता हवीशी वाटत होती, तरी तशी एकात्मता घडून येईल याची आशा श्वेतवर्णीयांच्या कट्टर विरोधामुळे आता पुष्कळांनी सोडून दिली आहे; परंतु निग्रोंना विभक्त राहण्यास भाग पाडले जात असले तरी, त्या कारणास्तव कोटयवधी नीग्रोंनी निकृष्ट जीवनमान कायमचे पत्करावे ही गोष्ट त्यांना पटू शकत नाही. विभक्त आहोत म्हणून आपला सामाजिक दर्जा हीन असावा, हे त्यांना मान्य होत नाही. 'महारवाड्या'तील जीवनाचा दर्जादेखील सर्व दृष्टींनी श्वेतवर्णीयांच्या सर्वसामान्य जीवनमानाइतका सुधारण्याचा कोणता तरी मार्ग असलाच पाहिजे असे त्यांना वाटते. त्यांचे हे प्रतिपादन समजण्याजोगे असले, तरी ते भ्रामक आहे, हे अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या पुराव्याने दाखवून देणे शक्य आहे. अमेरिकेची अर्थव्यवस्था आणि विशेषतः नोकऱ्या देण्याची शक्ती व स्रोत हे प्रामुख्याने श्वेतवर्णीयांच्या हाती आहेत. अशा परिस्थितीत 'विभक्त पण समान' या धोरणामुळे प्रत्यक्षतः व्यवहारात नीग्रोंना कायमचे सामाजिक, आर्थिकदृष्ट्या हीन स्थान पत्करावे लागेल. गरीब संपूर्ण नीग्रो वस्त्यांमध्ये दिले जाणारे शिक्षण उत्कृष्ट दर्जाचे खरोखर करावयाचे झाल्यास, सध्यापेक्षा किती तरी जादा खर्च सरकारला करावा लागेल; कदाचित दर विद्यार्थ्यामागे अन्यत्र कोठेही केला जात नाही इतका खर्च करावा लागेल. त्याऐवजी, वेगवेगळ्या वंशांच्या आणि वेगवेगळ्या सामाजिक थरांतील मुलांसाठी शाळा एकच ठेवल्या, तर कमी खर्चात शिक्षणाच्या गुणवत्तेत तेवढीच सुधारणा करता येईल. नीग्रोंच्या 'महारवाड्यां'चे जीवनमान संपन्न करू पाहणारा हा पर्याय खरोखरच यशस्वी होईल की नाही, याची कोणालाच कल्पना नाही. ते एक सद्भावप्रेरित गृहीत आहे. या पर्यायाखाली हाती घेतलेल्या कार्यक्रमाद्वारे, आज नीग्रो वस्त्यांमधील शाळांमधून मिळणारे शिक्षण पुष्कळ सुधारता येईल, यात शंका नाही; पण त्यासाठी शिक्षणपद्धतीमध्ये मूलग्राही सुधारणा कराव्या लागतील; पण शहरांच्या मध्यभागांतून राहणाऱ्या नीग्रो लोकसंख्येच्या ज्या दूरगामी व मूलभूत शैक्षणिक गरजा आहेत, त्या 'विभक्त पण समान' या धोरणातून पूर्ण केल्या जाऊ शकत नाहीत. शिक्षणाच्या बाबतीत आपणासमोर मुख्यतः तीन पर्याय आहेत. काळेगोरे विद्यार्थी यांच्या एकात्म शाळांमध्ये नीग्रो मुलांना दर्जेदार शिक्षण देणे, नीग्रो शाळांमधून उत्तम शिक्षण देण्याच्या दृष्टीने त्या शाळांच्या साधनसंपत्तीत भर टाकणे किंवा वर्णभेदासाठी शालेय व्यवस्थेत सध्या मिळत आहे तसेच रद्दी शिक्षण नीग्रो मुलांना देत राहणे आणि त्यांच्या जीवनातील संधी अतिशय तोकड्या आहेत त्या तशाच कायम ठेवणे.

कळत वा नकळत राष्ट्राने आज तिसऱ्या पर्यायाची निवड केली आहे. महामंडळ हा पर्याय स्वीकारायला मुळीच तयार नाही. घरांच्या बाबतीत हीच परिस्थिती आहे. 'विभक्त परंतु श्वेतवर्णीयांसारखी घरांची सोय करू' हे प्रत्यक्षात कधीच खरे होऊ शकत नाही. विभक्त याचा अर्थ विभक्त व निकृष्ट असाच होतो.

संपन्नतेच्या पर्यायामधून 'महारवाड्या'तील लोकसंख्येला उपलब्ध असलेल्या घरांच्या संख्येत वाढ होईल, विविध प्रकारची घरे उपलब्ध होतील आणि एक सुसंस्कृत वातावरण लाभू शकेल हे मान्य करूनही असे म्हणावे लागते की, उत्पन्नाच्या सारख्याच पातळीवरील श्वेतवर्णीयांना जे स्वातंत्र्य व जी निवड उपलब्ध आहे, ते स्वातंत्र्य व ती निवड नीग्रोंना या पर्यायामधून मिळणार नाही.

संपन्नतेच्या पर्यायाचे फायदे काहीही असोत, शेवटी परिणाम मात्र त्यांचाही 'जैसे थे'वादी पर्यायाशी मिळताजुळताच असेल. तो परिणाम म्हणजे श्वेतवर्णीय आणि निग्रो असे दोन समाज एका अमेरिकन राष्ट्रात निर्माण होतील.

उत्पन्न, शिक्षण, घरे, नोकऱ्या आणि जीवनमान या बाबतींत नीग्रो वस्त्या आणि मुख्य अमेरिकन समाज यांच्यामध्ये जी दरी आहे, ती संपन्नतेच्या पर्यायाच्या परिणामकारक अंमलबजावणीतून पुष्कळच निरुंद होऊ शकेल. म्हणून, या पर्यायाचा स्वीकार केल्यास पुढील २० वर्षांमध्ये तीव्र स्वरूपात ध्रुवीकरण होण्याची शक्यता पुष्कळ कमी होईल. त्यामुळे दंगलीचे प्रमाणही घटेल; पण पुरेशा प्रमाणात ते घटेल किंवा नाही ही गोष्ट हाती घेतलेले कार्यक्रम किती मोठे व सर्वस्पर्शी आहेत त्यावर अवलंबून राहील. आजच्यापेक्षा नीग्रो व श्वेतवर्णीय यांच्या परिस्थितीतील अंतर कमी झाल्यावरही जे अंतर उरेल तेही संघर्षाला जन्म देत राहील. इतिहास असे सांगतो की, स्वतःच्या परिस्थितीमध्ये खूप मोठी नक्त सुधारणा झाली म्हणजे माणसे समाधान पावतातच असे नाही. ते समाधानी होतील की नाही, ही गोष्ट सापेक्ष तौलनिक उन्नतीवर अवलंबून आहे. आपल्या इतक्याच कुवतीच्या व दर्जाच्या माणसांचे जीवनमान आपल्यापेक्षा खूप वरच्या दर्जाचे आहे असे जर त्यांना वाटले, तर स्वतःच्या परिस्थितीत सुधारणा होऊनही त्यांचे असमाधान खूप तीव्र राहू शकते. संपन्नतेच्या पर्यायातून वीस वर्षानंतर अशीच परिस्थिती निर्माण होईल, म्हणजे नीग्रोंना आपल्यामध्ये व श्वेतवर्णीयांमध्ये एक निराधार दरी असल्याचा प्रत्यय येईल. त्याबद्दल त्यांना तीव्र असंतोष वाटेल, अशीच नेमकी शक्यता आहे. कारण, संपन्नतेचा पर्यायदेखील शेवटी मूलतः राष्ट्र कायमचे दुभंगण्याचाच मार्ग आहे.

## एकात्मीकरणाच्या पर्यायाचे परिणाम

तिसरा पर्याय, मोठ्या संख्येने नीग्रोंना 'मराठवाड्या'तून बाहेर काढून समाजाच्या मुख्य प्रवाहात एकरूप करून घेण्याचा आहे. अशी एकरूपता निर्माण होण्यास सहाय्यभूत ठरणारे, नीग्रोंचे जीवनमान उंचावणारे, सामाजिक आर्थिक कार्यक्रम हे पर्यायात अभिप्रेत आहेत. एकात्मीकरणाचा पर्याय स्वीकारावयाचा याचा अर्थ संपन्नतेचा पर्याय अस्वीकृत करावयाचा असा होत नाही. कारण ही गोष्ट तर खरीच की, एकात्मीकरणाचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम स्वीकारला आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी केली तरी देखील, शहरांच्या मध्यभागांतून असणारे नीग्रो 'महारवाडे' आणखी अनेक वर्षे नाहीसे होणार नाहीत. दरम्यानच्या काळामध्ये या वस्त्यांतून नीग्रो ज्या अवस्थेत राहत आहेत त्यात भरीव सुधारणाही घडून येणे आवश्यक आहेच. नीग्रो वस्त्यांमधील स्थितीमध्येच सर्वांगीण सुधारणा घडवून आणण्याचे कार्यक्रम ही एक तात्कालिक उपाययोजना आहे, ते काही अंतिम ध्येय नाही, ही गोष्ट मात्र या पर्यायात पक्की ध्यानात घेतली जाईल. या पर्यायाचे मुख्य उद्दिष्ट नीग्रोंना मिळणारे

पृष्ठ २१ वर

मुंबई वार्ता

विनय सहस्रबुद्धे

# □ एक अनोखे प्रदर्शन

वर्तमानकाळापेक्षा भूतकाळ अधिक रोमहर्षक असतो, असे म्हणतात. निदान, दोन सप्टेंबरपासून एशियाटिक सोसायटीने मुंबईत आयोजिलेल्या 'जुनी मुंबई' या प्रदर्शनावरून, धावपळीत घामेजून, घुसमटून जाणाऱ्या मुंबईकराला तरी खचितच तसे वाटले असेल.

हेरास इंस्टिटयूट ऑफ इंडियन हिस्टरी अँड कल्चर आणि मफतलाल ट्रस्टस यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या महिन्यात जुन्या मुंबईविषयक ऐतिहासिक संशोधनावर एक परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. ह्या परिसंवादाचं निमित्त साधून एशियाटिक सोसायटी ह्या मुंबईतील एका शंभरी उलटलेल्या संस्थेनं एक अनोखं प्रदर्शन आयोजित केलं होतं. ह्या प्रदर्शनाबद्दल सविस्तर लिहिण्यापूर्वी एशियाटिक सोसायटीबद्दल बरंच काही लिहिलं पाहिजे, असाच या संस्थेचा एकूण दबदबा आहे.

वॉरन हेस्टिंग्जच्या कारकीर्दीत १७८४ मध्ये एशियाटिक सोसायटीची कलकत्त्यात स्थापना झाली. याच संस्थेची एक शाखा मुंबईतही निघाली. १८२९ साली रवीन्द्रनाथ टागोर हे या सोसायटीचे पहिले इंग्रजेतर सन्माननीय सदस्य म्हणून नोंदले गेले. सर जेम्स मॅकिटॉश याच्या अध्यक्षतेखाली १८०४ मध्ये ह्या सोसायटीचं मुंबईतलं कार्य खऱ्या अर्थाने सुरू झालं. सध्याच्या हाफकिन सोसायटीच्या इमारतीत या संस्थेचं जुनं कार्यालय होतं. काही काळ लिटररी सोसायटी ऑफ बॉम्बे या नावानं ओळखली जाणारी ही संस्था लॉटरी आणि वर्गणीच्या व देणगीच्या पैशातून उभी राहिली आणि आज सहा लाखापेक्षा जास्त ग्रंथसंख्येसह महाराष्ट्रातील एक अग्रगण्य ग्रंथालय म्हणून नावारूपास आली आहे.

देशातील जवळजवळ सर्व व अनेक आंतरराष्ट्रीय वृत्तपत्रे हमखास वाचायला मिळतील असे ठिकाण म्हणजे हे ग्रंथालय. केंद्र सरकारने हे ग्रंथालय एक राष्ट्रीय ग्रंथसंग्रहालय म्हणून घोषित केले असल्याने पुस्तकप्रकाशन व नोंदणी कायद्यानुसार प्रत्येक प्रकाशकाला पुस्तकाची किमान एक प्रत या ग्रंथालयास पाठवावी लागते.

राज्यसरकारने आपल्या दप्तरखान्यातील कैक ग्रंथ या ग्रंथालयाला दिले आहेत. याशिवाय मॉन्स्टुअर्ट एल्फिन्स्टन या एका गव्हर्नरसाहेबाने व अशा अनेक देणगीदारांनी या ग्रंथसंग्रहालयाला मौल्यवान ग्रंथसंग्रह भेट दिले आहेत. याच एल्फिन्स्टनसाहेबाने 'डिव्हाइना कॉमेडिआ' ह्या डँटेलिखित प्रसिद्ध इंग्रजी खंडकाव्याची मूळ प्रत या ग्रंथसंग्रहालयाला भेट दिली आहे.

डॉ. भाऊ दाजी, माणेकजी करसेटजी, जमशेदजी जीजीभॉय, कावसजी जैहांगीर, व्ही. एन्. मंडलीक, जगन्नाथ शंकरशेट, इ. अनेकांनी जसा या ग्रंथालयाचा मनसोक्त उपयोग करून घेतला तशीच या ग्रंथालयाला वेळोवेळी ग्रंथभेटही दिली. आज सुद्धा दुर्गाबाई भागवतांसारख्या विचारवंत या ज्ञानभांडाराचा नेहमीच आश्रय घेतात.

अशा या एशियाटिक सोसायटीनं जुनी मुंबई या विषयावर उपलब्ध ग्रंथ आणि चित्रसंग्रहाचं एक देखणं प्रदर्शन गेल्या आठवड्यात भरविलं होतं. १८५४ मधल्या मुंबईची कल्पना देणाऱ्या नकाशापासून या शतकाच्या प्रारंभी मुंबापुरीची नगररचना कशी होती ते दाखविणाऱ्या नकाशापर्यंत विविध नकाशे या प्रदर्शनात होते.

बॉम्बे टाइम्स या प्रदर्शनातील सर्वांत जुन्या (१८५९) वर्तमानपत्रापासून बॉम्बे क्रॉनिकल या अलीकडच्या दैनिक वार्तापत्रापर्यंत अनेक वृत्तपत्रेही या प्रदर्शनात पहायला मिळाली. बॉम्बे गॅझेट या एका दैनिकात एका बँकेची जाहिरात बघायला मिळाली. या जाहिरातीची सुरुवातच बँक म्हणजे काय? इथपासून होत होती. एकोणिसाव्या शतकातली ही दैनिके आपल्या पहिल्या पानावर भरगच्च जाहिराती मिरवीत असत आणि त्यांचा आकारही आजच्या वृत्तपत्रांच्या निम्म्याएवढा असे. ब्रिटिशांची राजवट असल्याने भारतापेक्षा ब्रिटनविषयक मजकुराचाच या वृत्तपत्रांत वरचष्मा! दैनिकांशिवाय बॉम्बे गार्डियन, बॉम्बे करिअर, सॅटरडे रिव्ह्यू, नेटिव्ह ओपिनियन इ. साप्ताहिके देखील प्रदर्शनात मांडण्यात आली होती.

जुन्या मुंबईविषयक शंभराहून अधिक ग्रंथ हे या प्रदर्शनाचं आणखी एक वैशिष्टय. ब्रिटीश लेखकांच्या पुस्तकांचं प्रमाण ह्या ग्रंथप्रदर्शनात अधिक असलं तरी दिनशा वाच्छा, ए. डी. पुसाळकर डॉ. जे. एफ. बलतारा, श्री. करकारिया, इ. भारतीय इतिहाससंशोधकांच्या पुस्तकांनीही या प्रदर्शनात हजेरी लावली आहे. डलहौसी, कॅनिंग इ. गव्हर्नर जनरलमंडळींबद्दल उद्‌बोधक माहिती देणारे 'मेन अँड इव्हेंट्स् ऑफ माय टाइम इन इंडिया' (लेखक रिचर्ड टेंपल) हे किंवा मॅकलिन नावाच्या लेखकानं लिहिलेलं 'ए गाईड टू बॉम्बे' प्रदर्शनातली काही उल्लेखनीय पुस्तके होत. वेलिंग्टन नामक एका गव्हर्नराचं मुंबई शहरावरील प्रेम त्याच्याच 'द चार्म ऑफ बॉम्बे' ही या पुस्तकात व्यक्त झालं आहे, तर केन नामक एका चित्रकार लेखकानं 'पिक्चरसेक इंडिया' या पुस्तकात मुंबईची अनेक रेखाटणे काढून ठेवली आहेत.

या प्रदर्शनातील नकाशे, वृत्तपत्रे किंवा पुस्तके परिणामशून्य ठरलीच तर तुम्हाला जुन्या मुंबईच्या त्या आगळ्या वातावरणात घेऊन जाण्याचं काम इथली जिवंत चित्रं करतील. एशियाटिकच्या संग्रही असलेलं सगळ्यात जुनं दृश्यचित्र १६६८ सालातलं आहे. गेल्या दोन शतकात मुंबईबेट, मुंबईतील रेल्वे, बाजाराची ठिकाणे इ. त कसकसे स्थित्यंतर होत गेले याची पुसटशी कल्पना, या प्रदर्शनातली सुमारे पन्नास साठ चित्रं सहजपणे देतात. त्या काळात आजचं गजबजलेलं चर्चगेटस्टेशन अवघ्या एका कमानदार देवडीसारखं कसं होतं ते बघायला गंमत वाटते. एका चित्रात १८५४ च्या भायखळा-स्टेशनचं चित्र आहे. आजचं दापोडी किंवा पळसदरी स्टेशनसुद्धा मोठं वाटावं इतकं भायखळा तेव्हा लहान होतं.

कापसाच्या बाजारपेठेतील दृश्य (१८५५), विलसन कॉलेज परिसर (१९००), चौपाटी (१८६४), महालक्ष्मी (१८४७), ही

मुद्दाम बघावी अशी या प्रदर्शनातील काही चित्रे. १८८० साली मुंबईत बर्फाची आयात होत असे; चौपाटीवर लाकडांचा व्यापार चाले, प्रवासी मेण्यामधून स्टेशनवरून घरी जात; दक्षिण मुंबईत कुलाब्यापर्यंत रेल्वे जात असे; ही व अशाच प्रकारची मनोरंजक माहिती ही वैशिष्टयपूर्ण चित्रं देऊन जातात.

काळ उलटतो तशी शहरं बदलतात आणि बदलतीलही. मुंबई सारखी मोक्याच्या ठिकाणी वसलेली शहरे तर दिवसागणिक बदलत असतात. मुंबई, म्हणजे गर्दी, गाडयांचे गोंधळ, भयानक उकाडा, माणूसपण हरवायला लावणारं गतिमान जीवन, घड्याळाची बांधिलकी अशी अनेक समीकरणं आज प्रसिद्ध आहेत. आजच्या गजबजाटात तोच परिसर, तीच ठिकाणं काल कशी होती हे पहाणं म्हणूनच एक वेगळा अनुभव ठरतो. अर्थात रोजच्या धावपळीत मुद्दाम वेळ काढून मुंबईकरांनी हे प्रदर्शन बघितलं असेल तरच ! □

## □ नाट्यशिक्षण शिबिर

कार्यक्रमाची अंमलबजावणी करणारा अधिकारीवर्ग चांगला असेल, मनापासून काम करीत असेल तर एखादा सरकारी कार्यक्रम सुद्धा किती उपयुक्त आणि किती यशस्वी ठरू शकतो याचं उदाहरण म्हणजे गेली १७ वर्षे अव्याहतपणे सुरू असलेला राज्यशासनाच्या सांस्कृतिक विभागाचा नाटयशिक्षण शिबीर हा उपक्रम.

नुकताच या १७ व्या सरकारी नाटयशिक्षण शिबिराचा समारोप समारंभ रवीन्द्र नाटयमंदिरात पार पडला. सरकारतर्फे होणाऱ्या मराठी नाटयस्पर्धांमध्ये पारितोषिके मिळविणारे उदयोन्मुख कलाकार, काही नाटयसंस्थानी शिफारस करून पाठविलेले कलाकार अशा सुमारे ४५ कलाकारांनी या शिबिरात भाग घेतला होता. मुंबई, ठाणे, नागपूर, अकोला, अमरावती, नाशिक, सोलापूर इ. अनेक शहरांतूनच नव्हे तर आंबेजोगाईसारख्या तालुक्याच्या ठिकाणाहून आलेले स्पर्धक कलाकारही या शिबिरात दाखल झाले होते.

उदयोन्मुख कलाकारांची नाटयविषयक जाणीव वाढविणे, या क्षेत्रातील इतिहासाची, वर्तमान प्रयोगांची सविस्तर माहिती देणं, नाटयतंत्र म्हणजे काय याची या विद्यार्थ्यांना कल्पना देणं इ. उद्देशातून शिबिराचा हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. गेल्या १७ वर्षांत शिबिरार्थींची संख्या सतत वाढतच आहे. या निवासी स्वरूपाच्या शिबिरात नाटयक्षेत्रातील अनेक नामवंतांना पाचारण केलं जातं नि त्यांच्या अनुभवांचा, ज्ञानाचा या विद्यार्थ्यांना निश्चितच फायदा होतो.

गेली काही वर्षे या नाटयशिक्षण शिबिराचं संचालन सुप्रसिद्ध दिग्दर्शिका श्रीमती विजया मेहता करीत असतात. विजयाबाईंचा या क्षेत्रातील अधिकार वादातीत आहे. कुशल दिग्दर्शिका आणि गुणी अभिनेत्री म्हणून त्या प्रसिद्ध असल्या तरी नाटयप्रशिक्षणातलं त्यांचं कर्तृत्व फार कमी जणांना ठाऊक असेल. त्यांच्या या कर्तृत्वामुळेंच मध्यप्रदेश सरकारनं इंदूर येथे आयोजिलेल्या नाटयशिक्षण शिबिराच्या संचालनासाठी त्यांना खास विनंती केली होती.

या शिबिरात दाखल होणारे कलाकार उदयोन्मुख आहेत नव्या नव्या गोष्टी शिकण्याचा उदंड उत्साह घेऊन येणाऱ्या या शिबिरार्थींपैकी एकजात सर्वांनीच विजयाबाईंच्या प्रशिक्षणतंत्राची तारीफ केली. शिवाय विजयाबाई ज्या जिव्हाळयाने, आत्मीयतेने या कलाकारांमध्ये समरस होतात त्या बाबतही सर्वांनीच त्यांची प्रशंसा केली. विजयाबाईंबद्दल या तरुण कलाकारांना जो आदर वाटत होता, जी श्रद्धा निर्माण झाली होती ती व्यक्त करताना एका शिबिरार्थी युवकाने आपल्या भाषणात त्यांना साक्षात 'आई' म्हणून संबोधलं. या वेळी स्वतः विजयाबाई दचकल्या आणि प्रेक्षकांतही हशा पिकला; पण हा विनोदाचा भाग सोडला तर वेळात वेळ काढून, सर्व नाटकांचे करार सांभाळून वर येऊ पहाणाऱ्या या तरुण कलाकारांना हात देण्यासाठी विजयाबाईंनी व्यक्तिशः जे कष्ट घेतले ते विशेष महत्त्वाचे आहेत.

सुमारे महिनाभराच्या या शिबिरात विद्यार्थ्यांना भारतीय रंगभूमीवरील वाटचाली, प्रयोग, नवे उपक्रम यांच्याबाबत ज्येष्ठ समीक्षिका प्रा. पुष्पा भावे यांनी सविस्तर माहिती सांगितली. नाटयसंगीत, लोकनाटये, नाटयाविष्कार अशा नाटयविषयक उपविषयांवर व्याख्याने देण्यासाठी श्री. अशोकजी परांजपे, दिलीप कोल्हटकर इ. नामवंतांना बोलाविण्यात आलं होतं.

नाटयदिग्दर्शन, अभिनयाचे विविध प्रकार, संगीतयोजना, ध्वनिसंकलन, प्रकाशयोजना, नेपथ्य, रंगभूषा इ. ची शिबिरार्थींना नुसती माहितीच नव्हे तर प्रात्यक्षिकेही करून दाखविण्यात आली. विद्यार्थ्यांकडूनही नेमकी अशीच प्रात्यक्षिके करवून घेतली गेली. स्टेजवर विखल आहे अशा समजुतीनं चालून दाखविणं, प्रकाशाची तिरीप चुकविण्याचा अभिनय करणं, असे अनेक नाटयाविष्कार या विद्यार्थ्यांकडून करवून घेतले गेले. पथेरपांचाली, दुविधा इ. प्रायोगिक चित्रपट विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. समारोपाच्या कार्यक्रमात या विद्यार्थ्यांनी वृंदावन दंडवते यांची दुष्टचक्र ही प्रायोगिक एकांकिका सादर केली. छायादृश्यांचा देखणा वापर, आणि चलत चित्रांसारख्या पात्रांच्या वेधक हालचाली यामुळे एकांकिका विशेष प्रेक्षणीय ठरली. शिबिरार्थींपैकीच दोन विद्यार्थिनींनी या एकांकिकेची प्रकाशयोजना केली होती हे विशेष उल्लेखनीय !

शिबिराबद्दलचं मत व्यक्त करताना विश्वास तांबोळी यांनी सांगितलं की, स्वतःबद्दल कैक गैरसमज असणाऱ्या अनेक अभिनेत्यांना किंवा गावात गाजलेल्या दिग्दर्शकांना ते स्वतः कुठे आहेत आणि अद्याप किती दूर जायचं आहे याचं यथार्थ दिग्दर्शन या शिबिरामुळं होतं. आणखी एका शिबिरार्थीनं सांगितलं की, नाटकाकडे पहाण्याची एक दृष्टी आम्हाला या शिबिरामुळं मिळाली.

'नाटयविषयक पूर्वीच्या जुन्या कल्पना अशा शिबिरांमुळे गळून पडतात, पण नव्या आधुनिक कल्पना नीटशा उमजत नाहीत. उमजल्या तरी पटत नाहीत अशी काहीशी अवस्था— विशेषतः ग्रामीण भागातून येणाऱ्या शिबिरार्थींची होते. नेमक्या याच अवस्थेत नव्यानं नाटयक्षेत्रात येऊ पहाणारे काही गुणी कलाकार निराश होण्याची शक्यता या शिबिरामुळं निर्माण होते', असं परखड मत एका शिबिरार्थीनं व्यक्त केलं. नवे बदल पचवू न शकणाऱ्यांच्या बाबतीत असं घडण्याची मोठीच शक्यता असते.

पृष्ठ १७ वर

# अवती-भवती

शिरीष सहस्रबुद्धे

## □ " 'कांति' फार मला तुजसाठी श्रम ...!"

मोठ्या लोकांच्या छोट्याछोट्या गोष्टीसुद्धा प्रसिद्धपात्र ठरतात, हा तसा जुनाच अनुभव, मोठ्या लोकांच्या मुलांच्या बाबतीही खरा ठरतो. ही गोष्ट गेल्या आठवड्याअखेर राजधानीला आणि एकूण देशातही चांगलीच जाणवली आहे. कांतिलालविषयक वादळाचे पडसाद जरा थंडावतात, तोच सुरेशकुमार–प्रकरण पेटलं–फुटलंसुद्धा आणि आता शांतपणे या सगळ्या घडामोडीचा–किंबहुना मोडतोडीचा–हिशेब मांडणाऱ्यांच्या डोळ्यांसमोर संजय–कांति–सुरेश अशी नवी 'त्रिमूर्ति' उभी राहते आहे.

संजय–कांतिलाल–सुरेशकुमार, तीन नावं आणि तीन कर्तृत्व–संपन्न व्यक्तित्वं! पण फरक तसा फार नाही, विशेषत: तिघांच्या मर्दुमकीची क्षेत्रं बरीच जवळजवळची. तिघंही बडे 'बाप' के बेटे; (चूकभूल देणे घेणे!) आणि तेच तिघांचंही प्रमुख–कदाचित एकमेव–क्वालिफिकेशन. तेच तिघांचंही भांडवल. आपल्या आदरणीय जन्मदात्यांच्या ऊबदार सिंहासनाच्या वळचणीला आपलंही एक शानदार घरटं बांधण्याची दैवदुर्लभ संधी एकानंही वाया दवडली नाही. आता थोडा-फार तपशिलाचा फरक हा व्हायचाच. म्हणजे एवढंच की, संजय हा तिघांमधला सर्वाधिक तरुण आणि महत्त्वाकांक्षी राजपुत्र, साहजिक सत्ता, संपदा आणि सुंदरी अशा तीन घोड्यांवर एकाच वेळी स्वार होण्याचा जिगरबाज धडपडाट त्यानं तब्बल दीड वर्ष केला. कांतिभाई त्यामानानं कनसवरून भागलेला, त्यामुळे चाल धीमी. त्यानं सध्या तरी फक्त संपदेवरच लक्ष केंद्रित केलं; तर सुरेशबाबूंनी सुंदरीचा हात (अक्षरश:)पकडला. केवळ दिवस फिरल्यामुळंच दीडएक महिना तुरुंगाची हवा चाखून थकलेल्या संजयचा नाद तात्पुरता सोडून वृत्तपत्र–नियतकालिकांनी आता सध्या तरी कांतिभाई आणि सुरेशबाबू यांच्याच पवित्र नामाचा नुसता घोशा लावला आहे. या दोघांविषयीच्या आतल्या, आतल्यातल्या आतल्या वगैरे गरमागरम कथा-कादंबऱ्यांनी साप्ताहिक–पाक्षिकांचे रकाने भरभरून वाहताहेत. त्यातही विशेष लक्ष वेधून घेतात ती कांतिबाळाच्या भलावणीसाठी मोरारजीभाई फेकीत असलेली तर्कबाज युक्तिवादांची भेंडोळी–जी वाचून इंदिरा विरचित संजय समर्थनस्तोत्राची आठवण झाल्यावाचून रहात नाही!

'मी सत्तेवर असतो, तेव्हाच फक्त कांतिलालवर भ्रष्टाचाराचे आरोप केले जातात–एरवी नाही.' मोरारजीभाईंचा हा तर्कवाद घ्या. आता हा मान्य केला, तरी त्यावरून आरोपांची सत्यासत्यता कशी शाबित करता येईल? आरोप अमुक एका मुहूर्तावर झाले, तरच ते लक्षणीय, असं काही कोष्टक असतं की काय? आणि पिताजी सत्ताधारी असतानाच चिरंजीव–भ्रष्टाचारी असणं अधिक शक्य नाही काय? अखेर भ्रष्टाचाराचं बांडगूळ सत्तावृक्षाच्या आश्रयानंच पोसत नाही का? पण 'धृतराष्ट्र–कॉम्लेक्स'नं पछाडलेल्या पंतप्रधानांचं पुढचं आर्ग्युमेंट तर याहूनही थोर आहे. 'इंदिराजींनी आपल्या प्रदीर्घ कारकीर्दीतही कांतिलालला मोकळंच सोडलं. तो खरोखरच दोषी असता तर त्यांनी मोठ्या आनंदानं त्याच्यावर कारवाई केली असती,' असा हवाला देताना मोरारजीभाई हे चुकून विसरतात की जाणूनबुजून, की इंदिराजींनी असलेच पापमुक्तीचे पासेस्, संजय–बन्सीलाल–विद्याचरण शुक्ला यानाही उदार हस्ते वाटले होते? की इंदिराजींकडून झालेलं हे 'Pardon' काहींच्या बाबतीत खरं आणि काहींच्या बाबतीत खोटं, असं सोयीसवडीचं राजकारण करायचं आहे? इंदिराजींकडून कारवाई झालेली असणं / नसणं हा जनता राजवटीतही, व्यक्तिगत भ्रष्टता / स्वच्छतेचा निकष ठरणार की काय?

'कांतिलालविरुद्ध कोणतेही प्रथमदर्शनी आरोप नाहीत, पुरावाही नाही, सबब तो निर्दोषच आहे,' असा निकाल चौकशीआधीच ठासून जाहीर करणाऱ्या मोरारजीभाईंचं पितळ उघडं पडलं, ते अर्थातच मधू लिमयेंच्या 'त्या' पत्रामुळं. 'कांतिलाल फक्त माझी व्यक्तिगत देखभाल करतो. जनता पक्षाशी वा सरकारशी त्याचा काहीही संबंध नाही,' असा दिमाखदार दावा करणाऱ्या पंतप्रधानांना कांतिलालनं जनता पक्षासाठी ८० लाख रुपयांचा निवडणूकनिधी जमवणं हा भ्रष्टाचाराचा / (पित्याच्या) सत्तेच्या गैरवापराचा नमुना वाटत नसेल, तर त्यांचं नीतिशास्त्र काही मुलखावेगळंच म्हटलं पाहिजे. या प्रकरणांची चौकशी करण्याचा आदेशात्मक ठराव राज्यसभेनं येता हिवाळी अधिवेशनात मंजूर केला (आणि ते सहज शक्य आहे!) तर देशात–परदेशात आपली पत काय शिल्लक राहणार आहे, याचा विचार मोरारजीभाईंनी केलेला असला म्हणजे मिळवली!

आपल्या प्रतिष्ठेचा–आणि भवितव्याचाही–असाच विचार करण्याची वेळ जगजीवनबाबूंवरही त्यांच्या चिरंजिवांनी आणून सोडली आहे. हे सारेच प्रकरण बाहेर आले ते राक्षसी व्यक्तिगत गळकापू स्पर्धेच्या कुजट दुर्गंधाबरोबरच जातीय विद्वेषाचे विखारी फूत्कार टाकीतच. त्या दृष्टीने इंग्लंडमधल्या प्रोफ्यूमो–ख्रिस्ताइन प्रकारणाशी याची तुलना करणं अपुरेपणाचंच ठरेल. तिथे प्रश्न होता तो मुख्यत: नैतिक आदर्श आणि सभ्यतेच्या आचारसंहितेचा; राष्ट्रीय प्रतिष्ठेचा. इथली समस्या त्याहूनही अधिक पैलूदार, जटिल आणि गुंतागुंतीची आहे. जगजीवनराम, प्रथम चरणसिंगांची रिकामीच झालेला खुर्ची

बळकावणार आणि नंतर कदाचित लवकरच रिकामी होऊ शकणारी, पंतप्रधानकीची गादीही अंगाखाली घ्यायला बघणार, या आशंकेनं चरणसिंगांच्या कडव्या अनुयायांनी हा जो राखीव विषारी वार त्यांच्या कंबरेखाली करायचा प्रयत्न केला, त्यातून तीन दुष्परिणाम तर निश्चितच घडतीलसं दिसतं. एक तर आधीच देशभर तापलेल्या जातीय वैमनस्यात या नव्या जाट विरुद्ध हरिजन द्वंद्वाची भर पडणार. दोन: राजकारणातल्या प्रतिस्पर्ध्याला नामोहरम करण्याच्या या नव्या सडक्या क्लृप्तीचा अधिकाधिक वापर होऊन भारतीय राजाकारण–समाजकारण दीर्घकाळ गढूळ होऊन राहण्याची आशंका आहे आणि तीन: चरणसिंग व जगजीवनराम अनायासेच परस्परांना शह-काटशह देत मोरारजीभाईंचं डळमळतं आसन स्थिर करायला न कळत हातभार लावणार.

चरणसिंग यांच्या कडव्या समर्थकांना हे सगळं समजत असेल असं नाही; पण असं रान पेटवूनही आपल्या धन्याचा वनवास कायमच राहणार आहे, ही आणखी एक गोष्ट त्यांना समजली असती, तर कदाचित हे प्रकरण इतकं चिघळलंही नसतं. या प्रकरणावर भाष्य करताना मुंबईच्या 'करंट' या हिंदी साप्ताहिकानं 'पंतप्रधानपद-प्राप्तीचे बाबूजींचे सर्व 'चान्सेस' या प्रकरणामुळे संपले,' असा निर्वाळा दिला आहे, तर आणखी एका इंग्रजी पाक्षिकाचाही होरा असाच आहे आणि सर्वसामान्य भारतीयांचा सेक्सविषयीचा 'प्यूरिटन' दृष्टिकोन लक्षात घेता, हा अंदाज तर्कविसंगत तर नक्कीच वाटत नाही. वरकरणी फक्त नैतिक मूल्यविषयक वाटणारं, पंतप्रधानांनी 'किरकोळ फौजदारी भानगड' म्हणून झटकून टाकलेलं हे प्रकरण प्रत्यक्षात मात्र अधिकच चिघळत, चरत जाणार असं दिसायला लागलं आहे. भालोदच्या काही संसदसदस्यांनी सुरेशकुमार–सुषमा चौधरीच्या 'त्या' छायाचित्रांच्या प्रती काढून लोकसभेच्या मध्यवर्ती सभागृहात आणि अन्यत्र वाटायला प्रारंभ केला आहे. अश्लील छायाचित्रांचा चोरटा व्यापार करणाऱ्या एका मुंबईच्या व्यापाऱ्यानं तर 'त्या' छायाचित्रांच्या हजारो प्रती काढून घाऊक प्रमाणात धंदा करण्याची तयारी सुरू केली आहे! लोकसेवकांच्या सर्वच गोष्टी सार्वजनिक मालकीच्या होतात त्या अशा!

राजनारायणजींसारख्या चरणदास हनुमंतानंही ज्यांच्यासंबंधी बोलण्यात रस घेतला, ती ही छायाचित्रं आहेत तरी कशी? इलेक्ट्रॉनिक पोलराइड कॅमेऱ्यानं घेतलेली ही छायाचित्रं अस्सलच आहेत, बनावट नव्हेत. एखाद्या भपकेबाज हॉटेलची पार्श्वभूमी त्यांना लाभली असावी असं दिसतं. आसपासच्या सामान–सजावटीवरून ती एखाद्या उंची फाइव्ह स्टार हॉटेलची आलिशान खोली वाटते. भालोदचे श्री. कल्याण जैन यांनी ही खळबळजनक छायाचित्रं, राष्ट्रपती श्री. संजीव रेड्डी यांनाही अगत्यपूर्वक नेऊन दाखविल्याची हकीकत समजली. श्री. जैन यांच्या म्हणण्यानुसार, सेक्सच्या विविध अवस्था/क्रीडा चित्रित करणारे हे फोटो राष्ट्रपतींनी बारकाईनं पाहिले, एवढेच नव्हे तर त्यांच्यावर काही इंटरेस्टिंग शेरेही मारले!

राष्ट्रपतींच्या उल्लेखावरून आठवण झाली. मोरारजीभाई व बाबूजी या दोघांवरही त्यांच्या चिरंजिवांच्या आडून कठोर दूषणांचा सार्वत्रिक भडिमार होत असला तरी माझ्या मते त्यांच्याविषयी अप्रत्यक्ष पण सर्वाधिक भेदक अशी, 'ब्रूटस, तू सुद्धा?' म्हणायला लावील अशी टीकाटिप्पणी खुद्द राष्ट्रपतींनीच केलेली आहे. त्यावर अधिक भाष्य न करता, राष्ट्रपतींची दोन ताजी अवतरणं जशीच्या तशीच उद्धृत करतो आणि थांबतो.

'ऑर्गनायझर' साप्ताहिकाला अलीकडेच दिलेल्या एका मुलाखतीत श्री. रेड्डी म्हणतात– 'मी आंध्रप्रदेशचा मुख्यमंत्री होतो, त्या काळात मी माझ्या मुलाला माझ्याबरोबर कधीच राहू दिलं नाही. माझ्या हातातल्या सत्तेची नशा त्याला चढेल आणि त्याचं तरुण मन बिथरेल, या भीतीपोटी मी प्रथम त्याला एका वसतिगृहात ठेवलं आणि नंतर तर तो चार वर्षं अमेरिकेतच होता. आता मी त्याला आमच्या मूळ गावात अनंतनाग इथं एक शुश्रूषागृह चालवायला सांगितलं आहे.'

आपल्या दक्षिण–दौऱ्यात चार सप्टेंबरला मद्रासमध्ये केलेल्या एका भाषणात राष्ट्रपती म्हणाले, 'मोठ्या माणसांच्या मुलांनी कसं स्वावलंबी आणि स्वाभिमानी असायला हवं; याचा आदर्श म्हणजे, कै. राजाजींची मुलं. अलीकडे मुलं आई-बापांच्या नाव-पदाचा गैरवापर करून पैसे मिळविताना दिसतात. अशानं ती त्यांची कीर्ती मलिन करीत असतात. त्या दृष्टीनं पाहिलं, तर कै. कामराज यांना मूल-बाळ काही नव्हतं, हे बरंच म्हणावं लागेल–निदान त्यांचा तरी नावलौकिक निष्कलंक राहू शकेल!'

आपल्याकडचे पूर्वापारचे राष्ट्रपति–मंत्रिमंडळसंबंध आणि श्री. रेड्डींची अलीकडची वाढती अस्वस्थता हे लक्षात घेतलं की, त्यांच्या या उद्गारांवर टीकाटिप्पणीची गरजच भासू नये इतके ते बोलके आहेत!

□


## तीन राजहंस प्रकाशने

## आणि ड्रॅगन जागा झाला
लेखक : अरुण साधू । मूल्य : चवदा रुपये

## फिडेल, चे आणि क्रांती
लेखक : अरुण साधू । मूल्य : सात रुपये

## पूर्णिया
लेखक : अनिल अवचट । मूल्य : सहा रुपये

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

# सवंग लोकप्रिय आर्थिक घोषणांनी प्रश्न सुटेल काय ?

## अर्थशास्त्रज्ञ कान्ता रणदिवे यांची मुलाखत

संकलन : छाया दातार

देशामध्ये अनेक राजकीय बदल झपाट्याने होत आहेत. गेली तीस वर्षे काँग्रेस पक्षाच्या बऱ्याच प्रमाणात एकसंध नेतृत्वाखाली चालणारी येथील राज्यसत्ता व येथील लोकशाही राज्यपद्धती हिला पहिला महत्त्वाचा तडा गेला २६ जून १९७५ रोजी आणीबाणी जाहीर झाली तेव्हा. त्यानंतर या आणीबाणीचा उगम कोठून झाला, तिची पाळेमुळे कुठे रुतली आहेत याचा शोध घेण्यात सामान्य माणसालाही रस वाटू लागला. इंदिरा गांधी यांच्या हुकूमशाही प्रवृत्तीमध्येच आणीबाणीचा उगम होता, असे राजकीय पक्षांनी ओरडून सांगितले तरी भोवतालचे वास्तव डोळे उघडून बघणाऱ्या सामान्य माणसाच्याही लक्षात येत होते की, या हुकूमशाही प्रवृत्तीला खतपाणी मिळेल असे आर्थिक अरिष्ट गेली काही वर्षे देशामध्ये रेंगाळत आहे. आज इंदिरा गांधी राज्यावरून दूर झाल्यावरसुद्धा अजूनही दुसरा पक्ष सत्तेवर स्थिरावू शकत नाही. भूकंपाचे धक्के बसावेत तसे राज्यसत्तेला जनतेच्या असंतोषाचे धक्के बसू लागले आहेत. रोज वृत्तपत्रांतून आर्थिक धोरणाविषयीच्या घोषणा दिल्या जातात व सामान्य माणसाला दिलासा देण्याचा प्रयत्न होतो; पण या घोषणांचा खरोखर आपल्या जीवनावर काय परिणाम होऊ शकेल याविषयी सामान्य माणूस अनभिज्ञ असतो. देवावर विश्वास ठेवावा तसा तो काही काळ राज्यकर्त्यांवर विश्वास ठेवायला तयार होतो आणि नंतर डॉक्टरच्या शोधात फिरायला लागतो. सध्या आपल्या अर्थव्यवस्थेचे दुखणेही असेच तज्ज्ञांकडून समजावून घेणे अवश्य झाले आहे. प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ प्रा. कान्ता रणदिवे यांच्याशी बातचीत करून ह्या दुखण्याचे स्वरूप समजावून घेण्याचा केलेला हा अल्पसा प्रयत्न.

कान्ताबाईंच्या म्हणण्याप्रमाणे अर्थशास्त्रीय प्रश्नांवर आज तीन तऱ्हेचे लेखन होत असते. एक प्रकार वृत्तपत्रीय लेखनाचा. दुसरा प्रकार राजकारणी लोकांना अर्थव्यवस्थेचे तात्कालिक प्रश्न व त्यावरील तात्कालिक उपाय याबद्दल सल्ला देणाऱ्या क्रियाशील पंडितांच्या लेखनाचा व सैद्धान्तिक प्रकारचे काम करून मूलभूत गृहीतकृत्ये तपासून पहाणाऱ्या अर्थशास्त्रज्ञांच्या लेखनाचा तिसरा प्रकार. श्रमविभागणीच्या तत्त्वानुसार तीनही प्रकारच्या लेखनाची आवश्यकता त्या नाकारीत नाहीत; पण त्यांचा पिंड तिसऱ्या प्रकारच्या लेखनासाठी तयार झालेला आहे. त्यामुळेच त्यांना प्रश्न जरी तात्कालिक विचारले गेले तरी त्यांची उत्तरे दूर पल्ल्याची व अर्थव्यवस्थेची मूलभूत बैठक समजावून घ्यायला उपयोगी पडणारी आहेत.

प्रश्न : जॉर्ज फर्नांडिस आणि पंतप्रधान श्री. मोरारजी देसाई यांनी यापुढे देशाच्या विकासाचा दर प्रतिवर्षी १० टक्के राहील, असे जाहीर केले आहे. हा विकासाचा दर वाढल्यामुळे सामान्य माणसाच्या राहणीमानाचा दर्जा वाढेल का ? नोकऱ्या भरपूर मिळतील का ? थोडक्यात सामान्य माणसाच्या जीवनावर या विकासाचा काय परिणाम होईल ?

: तुमच्या प्रश्नाचे उत्तर देताना दोन संकल्पना समजावून घेणे आवश्यक आहे. एक, विकासाचा दर ही संकल्पना आणि तिचा सामान्य माणसाच्या जीवनावर होणारा परिणाम म्हणजेच आमच्या अर्थशास्त्रीय भाषेत त्याला म्हणायचे 'न्याय्य वाटपाची' संकल्पना. विकासाचा दर व न्याय्य वाटप यांचे एकमेकांशी नाते कसे असते याविषयी आम्हा अर्थशास्त्रज्ञात बऱ्याच चर्चा चालू असतात. मी स्वतः याबद्दल एक विस्तृत लेख १९७३ साली 'इकॉनॉमिक अँड पोलिटिकल विकली'मध्ये लिहिला होता. त्या वेळी पाचव्या पंच-

वार्षिक योजनेची चर्चा जोरात चालू होती. सामान्य माणूस जसे रेडिओवरच्या गाण्याचे सूर घेऊन मनात गुणगुणत बसतो तशी आम्हा अर्थशास्त्रज्ञांनासुद्धा गुणगुणायला काही सूत्रे लागत असतात. अर्थात त्याचे स्वर सरकारी आर्थिक धोरणाच्या घोषणांनी प्रस्थापित केले जातात त्या काळी इंदिराबाईंच्या निवडणूक–जाहीरनाम्यातील सूत्र व घोषणा होती, 'गरिबी हटाओ.' प्रत्येकजण त्याविषयी लिहीत होता. आपल्या देशातील 'गरिबी 'बद्दलचे बरेच अभ्यासही त्याच सुमारास केले गेले आहेत. त्या घोषणेची लोकप्रियता एवढी होती की, जागतिक बँकेचे अध्यक्ष मॅकन्मारा यांनी जागतिक धोरणाचे उद्दिष्ट म्हणून हीच घोषणा वापरण्याची शिफारस केली होती. इतर अनेक गोष्टी आपल्याला करता येत नसल्या तरी घोषणा तयार करण्यात मात्र आपली बरोबरी कोणी करू शकत नाही, असे म्हणायला हरकत नाही.

गेल्या पंचवीस वर्षांत विकासाच्या अर्थशास्त्राचा अर्थशास्त्रज्ञांनी बराच अभ्यास केला आहे. जागतिक मंदीच्या काळात बेकारीच्या प्रश्नावर लक्ष केंद्रित होणे हे जितके साहजिक होते तितकेच दुसऱ्या महायुद्धानंतर विकासाचा प्रश्न अग्रगण्य ठरणे अपरिहार्य होते. अविकसित राष्ट्रात या प्रश्नाला वेगळीच धार होती. यातील बरीच राष्ट्रे नुकतीच साम्राज्यशाहीच्या मगरमिठीतून बाहेर पडली होती. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात दारिद्र्यात खितपत पडलेल्या जनतेला आर्थिक प्रगतीबद्दल आश्वासने दिली गेली होती. तेव्हा अधिकार प्राप्तीनंतर विकासाच्या प्रश्नाकडे लक्ष वळविणे राज्यकर्त्यांना आवश्यक होते. बहुतेक अविकसित देशांनी दारिद्र्यनिवारण, सामान्य माणसाचे राहणीमान सुधारणे ही विकासाची उद्दिष्टे उघडपणे जनतेपुढे मांडलीही होती. सर्वसाधारणपणे अर्थशास्त्रज्ञांचा असा समज होता की, गतिमान विकासाच्या प्रक्रियेतूनच दारिद्र्यनिवारण 'साधते', तेव्हा विकास की न्याय्य वाटप असा प्रश्नच उद्भवत नाही; पण विकासकार्याच्या दहा वर्षांच्या अनुभवानंतर हा प्रश्न वाटतो तितका सोपा नाही, याची अर्थशास्त्रज्ञांना आणि शासनकर्त्यांना जाणीव होऊ लागली.

अनेक देशांची आर्थिक प्रगती काही प्रमाणात चांगली झाली होती. विकासाचा दर वाढला होता. मात्र दुसरीकडे दारिद्र्यरेषेच्या खाली जगणाऱ्या लोकांच्या राहणीमानात सुधारणा झाली नव्हती आणि त्याचे राजकीय परिणाम जनतेच्या असंतोषाच्या रूपाने जगभर दिसून येत होते. या वास्तवाची जशी तीव्र जाणीव अर्थशास्त्रज्ञांना झाली त्याचबरोबर दुसऱ्याही एका घटनेचा परिणाम त्यांच्या विचारसरणीवर झाला. ते म्हणजे चीनने आखलेले अर्थव्यवस्थेचे मॉडेल– ज्या पद्धतीमध्ये 'न्याय्य वाटप' ही कल्पना प्रत्यक्षात आली होती. आपल्याकडे या घटनेकडे अर्थशास्त्रज्ञांचे लक्ष वेधण्यास कारणीभूत झाले ते पाकिस्तानी अर्थशास्त्रज्ञ महबूब अल् हक. त्यांनी 'इनसाइट' या नियतकालिकातील 'Let us stand economic theory on its head' या आपल्या लेखात सांगितले की, विकास साधता–साधताच न्याय्य वाटप शक्य आहे, त्यासाठी फक्त भांडवलशाही आर्थिक सिद्धान्त उलटे उभे करून वापरायचे. मागणीकडून, बाजारपेठेकडून सुरुवात न करता पुरवठ्याकडून सुरुवात करायची.

पण आर्थिक सिद्धान्त हे स्थल–कालनिरपेक्ष नसतात. चीन आणि आणि भारत या दोन देशातील समाजव्यवस्थेतील फरक लक्षात न घेतल्यामुळे रोगाचे निदान न करता केलेल्या उपचारांइतकाच महबूब अल् हक् यांचा तोडगा निष्फळ आहे.

## विकासाचा दर वाढला तरी न्याय्य वाटप होतेच, असे नाही

आता आपण ह्या आर्थिक संकल्पना समजावून घेऊ, म्हणजे आजच्या राजकीय चौकटीच्या आर्थिक धोरणांबाबतच्या मर्यादा आपल्याला उघड होतील.

विकासाचा दर याचा मर्यादित अर्थ आहे, 'राष्ट्रीय उत्पन्नाची वाढ.' राष्ट्रीय उत्पन्नात वेगवेगळ्या वस्तूंचा समावेश होतो. ज्वारी, गहू, पोलाद, पंखे, मोटारी वगैरे. या वस्तूंची एकत्रित बेरीज करता येत नाही. यामुळे एखाद्या विशिष्ट काळात विकासाचा दर किती होता, हे ठरविण्यास काही नियम पाळायला लागतात. काही वस्तूंचे उत्पादन वाढलेले असते तर काही वस्तूंच्या किंमतीच जास्त वाढलेल्या असतात. तेव्हा प्रत्यक्ष खरे उत्पादन किती वाढले हे समजून घेण्यासाठी वाढलेल्या किंमतींचा वाढावा काढून टाकावा लागतो. त्यासाठी price deflater वापरला जातो. आता असं समजा की, राष्ट्रीय उत्पन्नात १० टक्के वाढ झाली; पण एअरकंडिशनर्स, मोटारी, रेफ्रिजरेटर्स इत्यादी वस्तूंचे उत्पादन वाढले आणि सामान्य माणसाला आवश्यक असणाऱ्या वस्तूंच्या किंमती इतर वस्तूंच्या किंमतींपेक्षा अधिक वाढल्या तर १० टक्के विकासाच्या वेगाने न्याय्य वाटप साध्य होणार नाही. सामान्य माणसाच्या राहणीमानात सुधारणा होण्यासाठी त्याच्या हातात क्रयशक्ती वाढली पाहिजे, त्याला आवश्यक अशा वस्तूंचे उत्पादन वाढले पाहिजे आणि त्या वस्तूंच्या किंमती स्थिर राहिल्या पाहिजेत. विकासाच्या वेगाच्या टक्केवारीतून या तीन घटकांचे स्वरूप स्पष्ट होत नाही. विकास झाला तरी तितक्याच प्रमाणात रोजगार वाढेल आणि सामान्य माणसाची क्रयशक्ती वाढेल असे नाही. त्याच्या खिशाला न परवडणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनवाढीचा त्याला फायदा नाही. याउलट त्याला आवश्यक असणाऱ्या वस्तूंच्या किंमती वाढल्या तर त्याच्या खिशावर अधिक बोजा.

आपल्या २० वर्षांच्या अनुभवांचे सार काय आहे? आपल्या विकासाचा सरासरी दर ३·५% होता. त्यातून अनावश्यक वस्तूंचे उत्पादन वजा केले, गरिबांच्या उपभोगाच्या वस्तूंच्या किंमती जास्त प्रमाणात वाढल्या, त्यांना अधिक वजन देऊन 'price deflater' अधिक वाढविला तर विकासाचा वेग ३·५% सुद्धा रहात नाही. याचाच अर्थ विकासाचा दर अधिक वाढला असता तर सामान्य जनतेचे भले झाले असते, हे सूत्र बरोबर नाही. दहा टक्के विकासाचा दर वाढला म्हणून सामान्य माणसाचे राहणीमान उंचावण्याचा प्रश्न सुटेल अशी ग्वाही देता येत नाही.

प्रश्न : असे का होत रहाते? गरिबी हटाओची घोषणा देऊनसुद्धा श्रीमंतांच्या उपभोगाच्या वस्तूंचे उत्पादन का वाढविले जाते? त्यासाठी कोणत्या आर्थिक प्रेरणा अर्थव्यवस्थेवर तसा दबाव आणतात?

: याचे उत्तर असे आहे की, राष्ट्राचे उत्पन्न व राष्ट्राचा विकास आणि त्याचे न्याय्य वाटप ह्या दोन वेगळ्या प्रक्रियाच नाहीत. गेली १५ वर्षे मी उत्पन्नाचे वाटप या विषयावर काम करीत आहे. त्या आधारावर मी म्हणेन की, उत्पादन आणि विभाजन याचा वेगवेगळा विचार करण्यात त्यातील परस्परसंबंध दुर्लक्षिला जातो. उत्पादन-प्रक्रियेतूनच उत्पन्न निर्माण होते आणि त्याचे वाटप होते. इतकेच नाही तर उत्पादकच कोणत्या वस्तूंचे उत्पादन करायचे हे ठरवितो. अर्थशास्त्रात ग्राहकाच्या सार्वभौमत्वावर (consumer's sovereignity) भर दिला जातो; पण एक तर हा ग्राहक सधन असायला लागतो आणि शिवाय आपला नफा टिकून ठेवण्यासाठी उत्पादक सतत नव्या नव्या वस्तू या सधन ग्राहकांपुढे मांडीत असतो. म्हणजे उत्पादकच 'मागणी' निर्माण करीत असतो.

आपल्या देशातील संपत्तीचे मूळ विभाजन विषम आहे. एकीकडे संपत्तीचे केंद्रीकरण काही मूठभरांच्या हातात. दुसरीकडे कोट्यवधी लोकांचे उत्पन्नाचे एकमेव साधन म्हणजे श्रमशक्ती–त्यांचा रोजगार. ज्यांच्याकडे संपत्तीचे केंद्रीकरण त्यांचे उत्पन्न जास्त. त्यामुळे मागणी करण्याची त्यांची क्षमता जास्त. ते ज्या वस्तूंची मागणी करणार त्याच वस्तूंचे उत्पादन होणार. देशातील उत्पादित वस्तूंचा product-mix ठरविणे हे या लोकांच्या हातात अखेर अवलंबून रहाते. हा वस्तूंच्या उत्पादनाचा फेरा पूर्ण झाला की, पुन्हा एकदा पूर्वीचीच व्यवस्था बळकट होते. संपत्तिवाल्यांचे उत्पन्न वाढते व रोजगारवाल्यांचे उत्पन्न त्या मानाने कमी वाढते आणि अशा रीतीने हाच उत्पन्नाचा ढाचा पुन्हा पुन्हा तयार होत रहातो. या जादा उत्पन्नवाल्यांकडून कररूपाने पैसा जरी सरकारने काढून घेतला व तो पैसा गरिबांना रोजगार देण्यासाठी वापरला तरी जोपर्यंत गरिबांसाठी आवश्यक वस्तू निर्माण होत नाहीत तोपर्यंत या पैशाचा गरिबांनाही फायदा होणार नाही. समजा, दुसरीकडे काही प्रमाणात या पैशाचा उपयोग ज्वारी–बाजरीचे उत्पादन वाढविण्यासाठी झाला तरी सरकारी हस्तक्षेप योग्य तऱ्हेने झाला नाही तर आज 'शेतकऱ्यांच्या लॉबी'मुळे या धान्याच्या किंमती खाली येतील याची खात्री नाही व आवश्यक वस्तूंचे उत्पादन वाढूनही गरिबांना त्याचा फायदा मिळेल असे गृहीत धरता येणार नाही.

या अनावश्यक वस्तूंच्या उत्पादनामध्ये आणखी एक गोम अशी आहे की, त्यांच्या उत्पादनासाठी अद्ययावत यंत्रसामुग्रीची आवश्यकता असते. त्यासाठी पुष्कळदा परदेशी यंत्र व तंत्रज्ञानावर अवलंबून रहावे लागते. शिवाय या अद्ययावत यंत्रांचा एक मुख्य परिणाम म्हणजे त्यामुळे रोजगार कमी होतो. कसबी इंजिनियर लागतात. त्यांना चांगले पगार द्यावे लागतात आणि त्यामुळे पुन्हा धनिकवर्गामध्ये भर पडते व त्याचा परिणाम विशिष्ट वस्तूंच्या मागणीवर होतो. या सर्व चर्चेचा अर्थ असा की, कितीही चांगल्या विचाराने काम करणारे सरकार आले तरी त्याला या बाजारपेठेच्या शक्तींच्या आधारे चालणाऱ्या अर्थव्यवस्थेला फारसे वळण लावता येत नाही. म्हणजेच आज तरी आपल्याकडे विकास ही प्रक्रिया न्याय्य वाटपापासून फारच दूर रहाते आहे.

## द्वैताची कल्पना चुकीची

प्रश्न : आजच्या विषमतेचे, केंद्रीकरणाचे, बेकारीचे सर्व मूळ हे जुन्या आर्थिक धोरणांमध्ये आहे, असे सांगितले जाते. त्यामध्ये जड उद्योगधंदे व बडे उद्योगपती यांना प्राधान्य मिळाले. अत्याधुनिक यंत्रसामुग्रीला प्राधान्य मिळाले म्हणून जुने आर्थिक धोरण बदलले पाहिजे. खेड्यांकडे परत चला, हातमाग वापरा, कुटीरोद्योग काढा असे सांगितले जाते. चरणसिंग म्हणतात, कापडगिरण्या बंद करा. जॉर्ज फर्नांडिस म्हणतात, आगपेट्यांचे व अंगाच्या साबणांचे उत्पादन कुटीरोद्योगात करा. तसेच उद्योगधंद्यांकडून भांडवल शेतीकडे वळवा. हे सर्व उपाय बरोबर आहेत का ?

: माझ्या दृष्टीने ही उत्तरे अर्थव्यवस्थेच्या प्रक्रियेच्या अपुऱ्या समजावर आधारित आहेत. सर्वांत महत्त्वाचा अंतर्विरोध जो आहे तो product-mix काय असावे यासंबंधीच्या निर्णयातच आहे. देशामध्ये एका उत्पादनप्रक्रियेमध्ये कोणत्या कोणत्या वस्तू किती किती प्रमाणात उत्पादित व्हाव्यात याच्याच निर्णयावर इतर सर्व निर्णय, उत्पादनपद्धती, भांडवलाची गुंतवणूक वगैरे अवलंबून असतात. जड उद्योगधंदे की लघु उद्योगधंदे, बडे उद्योगपती की लघु उद्योगपती हा वादविवाद हा उत्पादनाच्या संघटनांविषयी आहे. एकदा कोणत्या वस्तूंचे उत्पादन करायचे हे ठरले की, भांडवलाची गुंतवणूकसुद्धा त्याप्रमाणे करणे शक्य होते. मोठे उद्योग की छोटे उद्योग हे त्यानुसार ठरते. शेती आधी की उद्योगधंदे आधी, हे द्वैत कल्पिणे चूक आहे. शेती व उद्योगधंदे यांचे एकमेकांशी अविभाज्य नाते आहे. ही दोन्ही क्षेत्रे एकाच उत्पादनव्यवस्थेच्या चक्रात गुंफली गेली आहेत. ज्या देशामध्ये दारिद्र्यरेषेखाली लक्षावधी लोक रहात आहेत त्यांच्या जीवनावश्यक वस्तूंपैकी महत्त्वाची वस्तू अन्न. N S. S. च्या २५ व्या consumption expenditure round प्रमाणे पंजाबमध्ये जेथे हरितक्रांती झाली असे मानले जाते तेथील गरिबांच्या खर्चातील ८०% खर्च अन्नधान्यावर होतो; पण अन्नधान्याचे उत्पादन वाढवायचे म्हणजे उत्पादनासाठी आवश्यक वस्तूंचे –यंत्रे, खते–उत्पादन वाढले पाहिजे आणि या वस्तूंचे उत्पादन मोठ्या शहरात, मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंद्यातच होऊ शकते. रासायनिक कारखाने लघु उद्योगात काढता येत नाहीत. पोलादासाठी जड उद्योगधंदे लागतात. तेव्हा लघु की बडे उद्योगधंदे हा वादविवाद चुकीचा, हे द्वैत निर्माण करणे चूक आहे. चीनमध्येसुद्धा 'बॅकयार्ड फर्नेस'चा प्रयोग फसला आहे. तेव्हा appropriate technology –आवश्यक तंत्र–ही सकल्पना अधिक शास्त्रीय आहे. ही संकल्पना देशातील उत्पादनसाधनांच्या उपलब्धतेवर अवलंबून न ठेवता कोणत्या वस्तूंचे उत्पादन करायचे ते निश्चित करून त्यासाठी 'आवश्यक तंत्र' अशा अर्थाने वापरली गेली पाहिजे.

## आवश्यक वस्तूंचे उत्पादन

या सर्व मुद्द्यांचा विचार तपशिलाने करण्यापूर्वी आपण या 'Product-mix'ची चर्चा करू. कोणत्या वस्तूंचे उत्पादन करायचे हे कोणत्या निकषांवर ठरवायचे ? मी यासाठी दोन संकल्पना वापरते. 'आवश्यक वस्तू' व 'अनावश्यक वस्तू'. माझ्या मते विकास करतानाच त्याचे न्याय्य वाटपही करणे शक्य आहे. फक्त हे साध्य होण्यासाठी आवश्यक वस्तूंच्या उत्पादनावर भर दिला पाहिजे. याचाच अर्थ 'Product-mix' चा निर्णय हा 'आवश्यक वस्तू' या

निकषाच्या आधारे घेतला पाहिजे. येथे मी स्वतःच्या नैतिक कल्पनांना प्रमाण मानीत नाही. आपल्या नियोजनाची बैठक समोर काही उद्दिष्टे ठेवून केली आहे. समान संधी, गरिबी नष्ट करणे, विषमता नष्ट करणे वगैरे. तेव्हा आवश्यक, अनावश्यक वस्तूंच्या उत्पादनासंबंधी निर्णय सरकारला टाळता येत नाही.

आता प्रश्न असा उपस्थित होतो, 'आवश्यक वस्तू' हा निकष कसा ठरवायचा? त्याची व्याख्या काय? अमेरिकेत मोटार ही आवश्यक वस्तू धरायची का? भारतात पंखा ही आवश्यक वस्तू समजायची का? मग एअरकंडिशनर्समुळे कार्यक्षमता वाढते. रिव्हिएराला दरवर्षी एकदा सुट्टीला जाऊन आले, तर सबंध वर्षाचा मानसिक ताण हलका होऊन नवीन वर्षाच्या कामाला हुरूप येतो वगैरे ओघाने आलेच.

शिवाय नेहमीचा वादाचा मुद्दा आहेच. आम्हाला कशाचाही उपभोग घेता आला पाहिजे. देशाच्या 'व्यापक आर्थिक व्यवस्थेचा' विचार करताना व 'विकास व न्याय्य वाटप' हे तत्त्व पायाभूत मानले असताना वरील मुद्दे गैरलागू होतात. अर्थशास्त्रामध्ये नैतिक निकषांना आधार नसतो व भौतिक निकषच लावावे लागतात हे एकदा लक्षात घेतले की, 'आवश्यक वस्तूची' व्याख्या करावीच लागते. येथे मी अर्थशास्त्रीय संकल्पना न वापरता थोडक्यात असे म्हणेन की, उत्पादनात भाग घेऊन काम करणाऱ्या सर्व माणसांना त्यांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक किमान गरजांसकट जगता यावे यासाठी लागणाऱ्या सर्व वस्तू, तसेच या वस्तूंच्या उत्पादनासाठी लागणारी यंत्रे व त्यासाठी लागणारा कच्चा माल. उदा. पोलाद, वीज, कापूस वगैरे. येथे सांस्कृतिक गरज ठरविताना अविकसित देशातील सर्वसाधारण उपभोगाची पातळी लक्षात घेतली पाहिजे. नाही तर रिव्हिएराची ट्रिपसुद्धा सांस्कृतिक गरज होईल. सामान्य माणसाच्या उपभोगासाठी आवश्यक वस्तू ठरविताना अनेक प्रश्न तयार होतील. उदा. सिमेंट हे 'आवश्यक वस्तू' या सदरामध्ये येणार की नाही? सिमेंटचा वापर धरणांसाठी होतो तसाच गगनचुंबी इमारतींसाठी होतो. याच अलिशान हवेल्यांतून 'आवश्यक वस्तूंचा' उपभोग घेणारे धनिक लोक रहात असतात. तसेच सिमेंटचा वापर करून बांधलेल्या पंचतारांकित हॉटेलमध्ये गरीब देशातील माझ्यासारखे विचारवंत देशातील गरिबांबद्दलच्या चर्चासत्रांना हजर रहात असतात. तेव्हा जे सिमेंट आवश्यक वस्तूंच्या उत्पादनासाठी उदा. गरिबांच्या घरांसाठी वापरले जाते तेव्हा ते 'आवश्यक वस्तू' असते. इतर वेळी तेच सिमेंट अनावश्यक वस्तूंच्या सदरामध्ये जाते. कृपया माझ्या 'आवश्यक वस्तूंच्या' उत्पादनाचा सिद्धान्त याची गल्लत गांधीवादी आर्थिक सिद्धान्ताशी करू नका. मी साध्या राहणीच्या आदर्शाचा पुरस्कार करते, असे म्हणणेही चुकीचे आहे.

याच 'आवश्यक वस्तूं'च्या उत्पादनाच्या सिद्धान्तानुसार आपण मघाशी चर्चा करीत असलेल्या शेती की उद्योगधंदे या वादाची फोड करून दाखविता येईल. समजा, भांडवलाचा ओघ शेतीकडे वळविला तरी त्याचा उपयोग कोणती पिके काढण्यासाठी होणार हे महत्त्वाचे आहे. फळफळावळांच्या बागा किंवा ऊस यांच्या उत्पादनासाठी उपयोग झाला, तर पुन्हा त्याचा फायदा अनावश्यक उपभोग्य वस्तू म्हणून धनिकांना मिळणार. शिवाय त्यातून जे उत्पन्न श्रीमंत शेतकऱ्यांना मिळेल तेही 'अनावश्यक वस्तूं'च्या उपभोगासाठी खर्च होणार. आज हा श्रीमंत शेतकरी गहू, ज्वारी या आवश्यक वस्तूंचे उत्पादन करूनही त्यांच्या किंमती महाग ठेवतो. त्या वस्तू शहरातील कामगारवर्गासाठी 'आवश्यक उपभोग्य वस्तू' आहेत. या आवश्यक वस्तूंच्या किंमती वाढल्या की, शहरी कामगारवर्ग संघटनेच्या जोरावर पगारवाढ करून घेतो. त्याचा पगार वाढला की औद्योगिक मालाच्या किंमती वाढतात व त्याचा परिणाम पुन्हा शेतीवर होतो. त्यामुळे शेती व उद्योगधंदे हे परस्परांवर अवलंबून आहेत हे लक्षात घेतले पाहिजे व भांडवलाची गुंतवणूक कशी करायची हे ठरविताना 'आवश्यक वस्तू' व 'अनावश्यक वस्तू' हे निकष लावले पाहिजेत.

भांडवलाचे केंद्रीकरण, बड्या भांडवलदारांची मक्तेदारी याबद्दल नेहमीच ओरड होत असते. या बाबतीत सरकारी धोरणांना दोष द्यायचा झाला तर तो त्यांनी हेतुतः बड्या भांडवलदारांना पोसले असा देता येणार नाही, त्यांनी ही आजची उत्पादनव्यवस्था चालू ठेवली असाच दोष द्यावा लागेल. म्हणून प्रश्न असा पडतो की, आजचे सरकार तरी ही उत्पादनव्यवस्था बदलू शकणार का? जॉर्ज फर्नांडिस यांच्या सूचनेचा विचार करू. आगपेट्यांचे व अंगाच्या साबणाचे उत्पादन ग्रामीण भागासाठी ग्रामीण भागात व्हावे असे फर्नांडिस म्हणतात; पण शहरी व ग्रामीण बाजारपेठा यांना भौगोलिक बंधने घालता येणार नाहीत. ग्रामीण माल शहरी मालाच्या, मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या व आकर्षक दिसणाऱ्या, जाहिरात केलेल्या वस्तूंच्या स्पर्धेत टिकणार नाही. उद्या विमको कंपनी बंद केली व आगपेट्यांचे सर्व उत्पादन कुटीरोद्योगासाठी राखून ठेवले तर त्या मालाचे वितरण शहरात करण्याची हमी घेता येणार नाही. उत्पादकांना योग्य भाव मिळून शिवाय त्या वस्तूंचे वितरण करायचे झाले तर व्यापाऱ्यांवर विसंबून चालणार नाही. सरकार ह्या वस्तूंच्या विक्रीचे काम अंगावर घेऊ शकेल का? इतर अत्याधुनिक वस्तूंच्या तुलनेत हा ओबडधोबड माल चांगला दिसणार नाही व चोरटी आयात परदेशाहून व्हायला लागेल. असे अर्धवट उपाय सवंग लोकप्रियतेसाठी ठीक आहेत; पण विचारवंतांनी सवंग लोकप्रियता आणि सरकारदरबारचा आश्रय या दोहोंचाही मोह टाळून परखड भूमिका घेणे आवश्यक आहे.

### विकासाच्या मार्गावरील मर्यादा

प्रश्न : सध्याच्या सरकारवर 'विकास व न्याय्य

वाटप ' हे दोन्ही एकत्रित साधण्यासाठी आणखी कोणत्या आर्थिक व राजकीय मर्यादा आहेत असे तुम्हाला वाटते ?

कोणत्याही सरकारला 'संपत्तीच्या विषम वाटपा 'च्या काही एका व्यवस्थेपासून सुरुवात करावी लागते. म्हणजेच संख्यात्मक अडचणी असतात. उदा. आपल्याकडे मूठभरांच्या हातात केंद्रीय संपत्ती आणि तिचा बाजारपेठेवर होणारा परिणाम. अर्थात ही सर्वसाधारण स्वरूपाची, भांडवलशाही विकासाच्या मार्गाची मर्यादा झाली; पण आज आपल्यासारख्या मागासलेल्या देशाला या जागतिक भांडवलशाही व्यवस्थेच्या चौकटीत मिश्र अर्थव्यवस्थेच्या मार्गाने विकास करताना काही विशिष्ट राजकीय मर्यादा पडतात, ज्या इतर पाश्चात्य देशांना त्यांच्या औद्योगीकरणाच्या कालखंडामध्ये पडल्या नाहीत. आज 'प्राथमिक भांडवलसंचयासाठी' आपल्याला राजकीय वसाहती करता येणे शक्य नाही. त्यामुळे नुसती सोन्या-चांदीची लूट व इतर स्वस्त कच्चा माल दोन्ही शक्य नाही. त्याचबरोबर आपल्या मालासाठी झटकन् परदेशी बाजारपेठ मिळविणेही शक्य नाही. वसाहतवाद आज राजकीय तत्त्वज्ञान म्हणून बाद झाला आहे. वरील ऊहापोहावरून हे स्पष्ट होते की, औद्योगिक मालाला मुख्यत्वे अंतर्गत बाजारपेठच निर्माण झाली पाहिजे. यासाठी शेतीमधील उत्पादन वाढून शेतमजूर व छोटा शेतकरी यांच्या हातातील क्रयशक्ती वाढली पाहिजे. तिसरी महत्त्वाची राजकीय मर्यादा आहे ती 'कामगार-कष्टकरी' यांच्या वाढत्या आशा-आकांक्षांची. इंग्लंडमध्ये प्राथमिक संचयाचा व भांडवली उत्पादनपद्धती पूर्णपणे सर्व उत्पादनक्षेत्रात पसरण्याचा काळ १००–१५० वर्षांचा होता. बेकारी व गरिबी हे त्या काळी आर्थिक प्रश्न समजले जात नव्हते. त्याचप्रमाणे कल्याणकारी राज्याची संकल्पना विकसित झाली नव्हती. 'डेव्हिड कॉपरफील्ड' हा डिकन्सच्या कल्पनाशक्तीचा आविष्कार नव्हता तर असे अनेक डेव्हिड कॉपरफील्ड प्रत्यक्ष अस्तित्वात होते. आज मात्र समाजवाद हा शब्द जनतेच्या आशा-आकांक्षांचे शब्दरूप बनला आहे आणि जनता आज १००–१५० वर्षे थांबायला तयार नाही. आज येथील कामगार, शेतमजुरांना अर्धपोटी ठेवून भांडवल निर्माण करणे कठीण आहे आणि श्रीमंतांनी बचत केली तर एअरकंडिशनर्सना बाजारपेठ मिळणे कठीण आहे. या सर्वांचा परिणाम म्हणून विकासाचा वेग कुंठित झाला आहे. एकीकडे लक्षावधी हात बेकार आहेत, दुसरीकडे कारखाने स्वत:च्या उत्पादनक्षमतेपेक्षा कमी उत्पादन करीत आहेत. कोट्यवधी लोक बेकार आहेत तर दुसरीकडे २० दशलक्ष टन धान्याचा साठा पडून आहे. थोडक्यात सांगायचे म्हणजे येथील उत्पादकशक्ती वाढत नाहीत व आपण एका विचित्र कोंडीत सापडलो आहोत. अर्थात अशाच कुंठित गतीने ही अर्थव्यवस्था आणखी पुढे काही काळ चालू राहू शकणार नाही असे नाही; पण जनतेचा असंतोष वाढत गेला तर अर्थव्यवस्थेचा आधीच अस्थिर असलेला तोल बिघडू शकेल. सध्याची राजकीय परिस्थिती पहाता (दिशाहीन नेतृत्व, सत्तारूढ पक्षातील सत्तास्पर्धा व डाव्या शक्तीचे दौर्बल्य) नजीकच्या काळात क्रांती होण्याची शक्यता कमी दिसते.

या उलट सध्याचा आर्थिक ढाचा – विषमतेवर आधारलेली व बाजारपेठेने नियंत्रित होणारी अर्थव्यवस्था न बदलल्यामुळे जे आर्थिक उद्दिष्ट वाढत जाईल त्याला तोंड देण्यासाठी राज्यकर्ते हुकुमशाहीकडे तर झुकणार नाहीत ना, हा प्रश्न मात्र भेडसावतो ! □



लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे ३० । मूल्य : २० रुपये

चन्द्रशेखर पुरंदरे

## निकारागुआ :

# एक अध्यक्ष त्याच्या देशातील लोकांच्या रक्ताची निर्यात करीत असे त्याची गोष्ट

निकारागुआ या देशाचा सोमोझा हा तो अध्यक्ष होय. मध्य अमेरिकेत ग्वाटेमाला, होंडुरास आणि अल् साल्वाडोर यांच्या दक्षिणेस व कोस्टारिका आणि पनामाच्या उत्तरेस कॅरिबिअन आणि पॅसिफिक समुद्रवलयांकित देशाचा हा अनभिषिक्त राजा. त्याच्या एकाधिकाराला धक्का लागणाऱ्या घटना घडू लागल्या आहेत आणि त्या अनुषंगाने युनायटेड स्टेट्सच्या साम्राज्यवादाचे केविलवाणे दर्शनही घडत आहे.

पार्श्वभूमी : १८५६ पासून हा देश अमेरिकेच्या वर्चस्वाखाली होता, तो १९३२ पर्यंत. १९३२ मध्ये सोझर सँडिनोच्या स्थानिक चळवळीने अमेरिकेच्या मरीन कॉर्प्सला देश सोडणे भाग पडले; पण जाता जाता या कॉर्प्सने आपलाच एक पित्तू अॅनॅस्टॅशिओ सोमोझा याला अध्यक्ष केले. या अध्यक्षाने सॅडिनोच्या राष्ट्रीय चळवळीशी प्रथम नमते धोरण घेतले; पण नंतर दोनच वर्षात सॅडिनोचा खून करून आपली हुकूमशाही प्रस्थापित केली. सोमोझा घराण्याची ही हुकूमशाही अमेरिकेच्या वेळोवेळी मिळणाऱ्या लष्करी पाठिंब्यावर आजतागायत म्हणजे तब्बल ४५ वर्षे चालू आहे. सध्याचा अध्यक्ष हा या अॅनॅस्टॅरिओचा मुलगा. ५२ वर्षांचा हा विद्यमान अध्यक्ष स्वतः संपूर्ण देशाच्या एकूण लागवडीस योग्य असलेल्या जमिनीच्या एकचतुर्थांश जमिनीचा मालक आहे. देशाच्या पहिल्या वीस प्रमुख उद्योगसमूहांचा नियंत्रक आहे. त्याची एकूण मालमत्ता पन्नास कोटी डॉलर्सच्या घरात असावी. या इसमाने पैसा मिळविण्यासाठी निकारागुआच्या लोकांच्या रक्ताची निर्यात करणाऱ्या कंपनीशीही हातमिळवणी करण्यास मागेपुढे पाहिलेले नाही. त्यावरून त्याच्या मनोवृत्तीची कल्पना यावी.

याच्या राजवटीविरुद्ध १९६० सालापासून जनमत तयार व्हायला सुरुवात झाली. जवळच असणाऱ्या क्युबामध्ये डिसेंबर १९५९ मध्ये फिडेल कॅस्ट्रोने क्रांती घडवून आणलेली पाहून डावी संघटना निकारागुआमध्येही उभी राहू लागली; पण तिला विस्कळित व अतिरेकी असे स्वरूप असल्याने मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळेना.

## जनमतसंघटन व विरोध

पेट्रो जोआकिन शामोरो हा 'ला प्रेन्सा' या वृत्तपत्राचा संपादक सतत तीस वर्षे सोमोझाच्या राजवटीवर हल्ला करीत होता. त्याचा या जानेवारीमध्ये खून झाला. तत्पूर्वीच तीन महिने, सप्टेंबर १९७७ मध्ये तीन वर्षे चालू असलेली आणीबाणी उठविण्यात आली होती. त्यामुळे शामोरोच्या प्रश्नावरून वातावरण तापायला सुरुवात झाली. एकूण बारा विरोधी पक्षांनी एकत्र येऊन विद्यार्थी, शिक्षक, डॉक्टर, इंजिनिअर, दुकानदार वगैरे सामान्य लोकांची सोमोझा विरुद्ध आघाडी बांधायला सुरुवात केली आणि अध्यक्षीय राजवटीत पिढी घालवावी लागलेल्या लोकांकडून त्यांना प्रतिसादही मिळाला. त्यात डाव्या चळवळीचा अतिरेकी प्रचार न रहाता व एकांगी भूमिका न रहाता एक सर्व विरोधसमावेशक असा नवीन मोर्चा उभा राहिला. तरुण पिढी विशेष उत्साहाने यात सामील झाली आणि प्रामुख्याने गुप्तपणे व गनिमी काव्याने आजवर लढणाऱ्या डाव्या अतिरेक्यांना आश्रय मिळाला आणि सोमोझाला विरोध या पायावर देशव्यापी पाठिंबाही मिळाला. डिसेंबर १९७५ मध्येच या गनीमांनी ( Guerilla ) सरकारला पहिला हिसका दाखविला होता. त्यानंतर अगदी अलीकडे म्हणजे या २४ ऑगस्टला त्यांनी संघटितपणे निकारागुआची राजधानी मानागुआ येथील राजवाड्यावर धाड घालून सुमारे दीड हजार लोकांना पळविले ! दोन विमाने भरगच्च भरून चर्चच्या लोकांच्या आणि राजकीय व्यक्तींच्यामध्ये यांना मिसळवून पनामामध्ये नेले ! या निष्पाप लोकांच्या मोबदल्यात त्यांनी अध्यक्षीय सरकारकडे प्रचंड खंडणी द्यावी अशी मागणी केली. तसेच ५९ राजकीय विरोधकांना मुक्त करावे आणि गनीमांचा कार्यक्रम ( Manifesto ) निकारागुअन रेडिओवरून जाहीर करावा याही मागण्या केल्या.

या तीनही मागण्या मान्य करण्यात आल्या. सव्वा तासाचा गनीमांचा Manifesto ही रेडिओवरून दोनदा प्रसृत झाला. त्यांत ४५ वर्षांच्या सोमोझा घराण्याच्या राजवटीवर प्रच्छन्न टीका होती. ही प्रथमच लोकांच्या कानी सरकारी माध्यमातून पडली.

हा विरोध प्रामुख्याने सँडिनिस्टा लिबरेशन फ्रंट या गनिमांच्या संघटनेकडून होतो. उपरिनिर्दिष्ट राष्ट्रीय चळवळीचा हुतात्मा नेता सँडिनो याच्यावरून हे नाव घेण्यात आले आहे.

## झीरो

पण २४ ऑगस्टच्या प्रकाराने सरकारची बेअब्रू झाली. लष्कर काय लायकीचे आहे, सरकार जराशा दडपणाखाली कसे दबते आणि अशा आततायी कृत्यांनाही अनपेक्षित पाठिंबा मिळतो यावरून जनमत राजवटीला किती विटले आहे, या सर्व गोष्टी त्यावरून स्पष्ट झाल्या.

या धाडसी कृत्यामागे एडन पेस्टोरा हा कोस्टा रिकाचा चळवळ्या आहे. तो 'झीरो' नावाने ओळखला जातो. १९६२ पासून तो सोमोझाचा विरोध करीत आलेला आहे. सँडिनिस्ट चळवळीतही जे गट आहेत त्यातल्या सगळ्यात जहाल अशा टेर्सेरिस्टा गटाचा तो नेता आहे. कोस्टा रिका या दक्षिणेच्या देशाशी असणाऱ्या सीमेवरच गनिमांचा जोर जास्त आहे आणि बहुतेक गनीम सरकारी फोजांना चुकवायला तिकडे पळून जातात. त्यामुळे कोस्टा रिकाचे आणि निकारागुआचे सरकारी संबंध वाईट आहेत.

ओलीस ठेवणाऱ्यांच्या मोबदल्यात खंडणी वसूल करण्याची वरील घटना घडल्यानंतर लगेचच विरोधी आघाडीतर्फे देशव्यापी संपाचे आवाहन करण्यात आले. सामान्य माणसानेही हा संप शांततामय मार्गाने राजवट खिळखिळी करण्याचा शेवटचाच प्रयत्न

असणार, हे जाणून मोठ्या प्रमाणावर पाठिंबा दिला आहे. लिओन हे निकारागुआतील मानागुआच्या खालोखाल मोठे शहर संपूर्ण बंद पडले होते. दिराबामाना, माटागल्पा या शहरांतही कडकडीत हरताळ पडले. वाहतुकीपासून सगळे देशांतर्गत व्यवहार अध्यक्षीय राजवटीच्या निषेधार्थ बंद आहेत आणि तो नीरो मे १९८१ पर्यंत मी जाणार नाही, ही धुन वाजवतो आहे.

माटागाल्पा शहरात तर यादवीच सुरू झाली होती. गनिमांनी काही काळ–५ दिवस–हा प्रदेश 'मुक्त' म्हणून जाहीर केला होता. १२–१२ वर्षांची मुले गावठी शस्त्रांनिशी नॅशनल गार्ड या सरकारी फौजेशी लढत आहेत. ही नॅशनल गार्ड फार पूर्वीपासून पोसण्यात आलेली आहे. साडेसात हजार सैनिक असणारी ही फौज जोपर्यंत आपल्याशी एकनिष्ठ आहे तोपर्यंत आपली खुर्ची सुरक्षित आहे, असा सोमोझाचा दावा आहे. मेजर जनरल अर्माण्डो फर्नांडिझ हा या फौजेचा सेनापती आहे. सोमोझांचा मुलगाही या सेनेमध्ये अधिकारपदावर आहे आणि बापाच्या सत्तालालसेविरुद्धच्या प्रजेला गोळ्या घालीत हिंडत आहे.

चर्चच्या पाद्र्यांपासून कामगारांपर्यंत सर्वांनी मिळून एक सोळा कलमी कार्यक्रम मांडलेला आहे. त्यानुसार सत्तांतर होऊन खऱ्या लोकशाही शक्ती याव्यात अशी त्यांची इच्छा आहे; पण सोमोझाला विनाशकाले विपरित बुद्धी सुचलेली आहे.

## आंतरराष्ट्रीय महत्त्व आणि परिणाम

या छोट्याशा देशाच्या भवितव्याचे त्या विभागावर गंभीर परिणाम होतील. १. जर डाव्या शक्तींचा विजय झालाच तर मध्य अमेरिकेमध्ये कम्युनिझमचा शिरकाव होईल. वस्तुतः आज सरकारविरोधी जो सामान्य माणूस आहे तो डाव्या विचारसरणीला फारसा अनुकूल आहे असे नाही; पण ती संघटित शक्ती असल्याने सोमोझानेच म्हटल्याप्रमाणे तो गेला की कम्युनिझम येणार हे नक्की ! आजवर जसा अशा प्रकारच्या राजवटीविरुद्धचा असंतोष डाव्यांनी स्वतःच्या सत्तासंपादनासाठी इतरत्र वापरला, तोच प्रकार येथे घडणार !

२. सोमोझा जो आज खुर्चीत टिकून आहे, तो अमेरिकेच्या भरंवशावर. प्रत्यक्ष अमेरिका संभ्रमात आहे. कारण सद्यःस्थितीत सोमोझाला पाठिंबा देणे म्हणजे उद्याचा निकारागुआ सरळ शत्रू करून घेणे होईल. तसे केले नाही तरी क्युबाचा इथला प्रवेश हा त्या देशाचा फार मोठा विजय असेल. मध्य अमेरिकेत क्युबा पोचला तर बाहेर निघणे कठीण होईल.


३. होंडुरास, अल् साल्वाडोर, ग्वाटेमाला या देशांवर त्वरित परिणाम होऊन त्यांच्यातील राजवटीही खाली यायला वेळ लागणार नाही. कारण अमेरिकन पाठिंब्याच्या कल्पनेचा फुगा फुटल्याने तेथील सरकारचे नीतिधैर्य खचेल आणि जनतेचे वाढेल.

निकारागुआने आज कार्टरला असे पेचात पकडले आहे. आजवर बळाच्या जोरावर राष्ट्रांची भवितव्ये अमेरिकेने लीलया घडविली; पण भविष्यात ते उत्तरोत्तर अशक्यच होणार हे यावरून स्पष्ट व्हावे. □


हे पुस्तक प्रत्येक ग्रंथालयात जाईल अशी व्यवस्था करण्यासाठी शासनाने आवर्जून प्रयत्न करावेत.

( रविवार केसरी दि. १० सप्टेंबर १९७८ )

–डॉ. वा. ना. कुबेर



**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन,
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.

पुस्तके

# युकॅलिप्टस

## विषयांचं विलक्षण वैविध्य

'नवे कवी, नवी कविता' ह्या कविता-संग्रहमालिकेतलं हे सातवं पुस्तक. पॉप्युलर प्रकाशनानं गेल्या दशकातल्या आणि त्यानंतरच्या काळातल्या ग्रेस, महानोर, वसंत सावंत, केशव मेश्राम, शंकर वैद्य, अनुराधा पोतदार यांच्यासारख्या आघाडीच्या कवींची कविता ह्या मालिकेतून संग्रहित केली आहे. कविता हा भले कितीही अभिजात वाङ्मय-प्रकार गणला जात असला, तरी देखील आजच्या जगात तो तितकाच उपेक्षितही ठरला आहे सर्वसामान्य वाचकाच्या दृष्टीनं तर आजची आधुनिक कविता, अपवाद वगळता, बऱ्याचदा हास्यास्पदच ठरत असते. जीवनानुभवांच्या गुंतागुंतीच्या स्वरूपामुळे आजची कविता पण तेवढीच क्लिष्ट बनली आहे. पूर्वापार परिचित असलेली तिची गेयता कधीच हरवली आहे. अर्थात ह्यालाही महानोरासारखे काही अपवादही आढळतातच. जीवनाच्या बदलत्या स्वरूपाप्रमाणे मराठी कविता देखील तशीच बदलत गेली असली तरी तिच्यातले बदल सर्वसामान्य वाचकानं अद्यापही स्वीकारलेले नाहीत. म्हणूनच सामान्य मराठी वाचक कवितेपासूनच एकंदर दूर गेला आहे. वाचकांच्या ह्या दुराव्यामुळे मराठी वाङ्मयात कविता ह्या वाङ्मयप्रकाराची चांगलीच कोंडी होऊन बसली आहे. कवितेच्या प्रकाशनावर व्यावहारिक मर्यादा आल्या आहेत आणि ह्या मर्यादांमुळेच बरेचसे यशस्वी प्रकाशक ह्या वाङ्मयप्रकाराकडे वळताना दिसत नाहीत. ह्या साऱ्याच पार्श्वभूमीवर 'पॉप्युलर'चा अभिजात, नवी मराठी कविता मर्यादित प्रमाणावर का होईना सादर करण्याचा हा उपक्रम निश्चितच लक्षणीय ठरतो.

'युकॅलिप्टस' हा सुरेश मथुरे यांचा पहिलाच कवितासंग्रह. त्यांच्या एकूण पंच्याऐंशी कविता ह्यात संग्रहित करण्यात आल्या आहेत. तसे सुरेश मथुरे हे सत्यकथेचे कवी मानले जातात. स्वाभाविकच त्यांच्या ह्यातल्याही बऱ्याचशा कविता सत्यकथेतूनच प्रसिद्ध झालेल्या आहेत. ह्यातल्या किती तरी कविता सुरेश मथुरे ह्यांच्या काव्यात्मक सामर्थ्याचा प्रत्यय आणून देणाऱ्या असल्या तरी देखील ह्या सर्व कवितांचं अधिक विवेचक दृष्टीनं संकलन करून त्यांची संख्या मर्यादित करण्याची आवश्यकता प्रकर्षानं जाणवत रहाते आणि असं संकलन, संपादन काहीसं झालं नसल्यामुळंच की काय, पुनरुक्त आणि काहीशा निकस आशयाच्या काही कविता देखील येथे समाविष्ट होताना दिसतात आणि त्यामुळंच ह्या संग्रहाचं एकूण स्वरूप देखील बरचसं पसरट आणि अस्ताव्यस्त झाल्यासारखं वाटतं. सुरेश मथुरे ह्यांच्यासारख्या एका प्रभावी कवीचं एकसंध व्यक्तिमत्व जाणवून देण्यात अशा अनावश्यक कविता अकारण बाधा आणीत रहातात.

'युकॅलिप्टस' सारखी एखाददुसरीच कविता मुंबईच्या बाह्यवातावरणावर लिहिली गेली असली तरी देखील सुरेश मथुरे यांच्या बहुतेक कविता मुंबईच्याच महानगरी जीवनाशी निगडित झालेल्या दिसतात. ह्या बहुरंगी शहरातल्याच अनुभवांच्या तुकड्या-तुकड्यांतून आकार घेताना दिसतात. त्यात मरीन ड्राइव्हचं कॉंक्रीटलेले गुलछबू टेट्रापॉड्स असतात. कधी न वाढणाऱ्या, जीर्ण–शीर्ण न होणाऱ्या समुद्राची चित्रणं असतात, कॉंक्रीटचे अजस्त्र क्रॉसवर्डस असतात, चौपाटी असते, राजस व्यक्तिमत्त्वानं उन्हात लकाकणारे स्काय-स्क्रेपर असतात. मुंबईच्या महानगरी जीवनातले किती तरी संदर्भ इथे ओळीओळीतून डोकावताना दिसतात. अर्थात हे संदर्भ अर्थहीन नसतात, दिशाहीन नसतात, तर आधुनिक विज्ञानवेड्या जीवनाशी, त्यातून निर्माण होणाऱ्या आजच्या समस्यांशी हे संदर्भ बांधील असतात. सुरेश मथुऱ्यांची सारीच कविता जणू मुंबईच्या आधुनिक जीवनाचं एका मर्यादित अर्थानं का होईना प्रतिनिधित्व करताना दिसते.

मथुरे आपल्या कवितांतून शहरी जीवनातले विविध विषय प्रकर्षानं हाताळीत असले तरी मुळात त्यांनाही कुठं तरी निसर्गाची एक प्रामाणिक ओढ वाटत असते. ह्या निसर्गाला त्यांनीही कुठं तरी, कधी तरी, जाणतेपणी पाहिल्याचा, अनुभवल्याचा प्रत्यय त्यांच्या कवितेतून येत असतो. ह्या जाणिवेतूनच त्यांना कोडाई-कॅनॉलचा युकॅलिप्टस इव्हिनिंग-वॉक घ्यायला बाहेर पडलेल्या गोऱ्या, तैलबुद्धी, खानदानी कलेक्टराप्रमाणे भासतो. कोडाईकॅनॉलच्या त्या युकॅलिप्टसला मथुरे आपल्या प्रभावी, नेमक्या शब्दांनी जिवंत करून सोडतात. इतकंच काय, त्या भव्यकाय वृक्षाला ते विलक्षण सुंदर मानवी रूप अगदी सहज देऊन टाकतात. इतरत्रदेखील निसर्गाला आपल्या शब्दांतून मांडताना ते 'मावळतीची रजत–रुपेरी आरास,' 'वेस वर्तुळून टाकणारा रानदांडगा डोंगर,' 'दिवसाची जत्रा-वळ,' 'जंतरमंतर ढग,' 'कवडशांचे कळे,' 'सांजेच्या सांझरात,' 'पारंब्यांची पणतवंडी टोके,' 'श्रावण शिर्वा,' ह्यांसारख्या सुंदर प्रतिमांनी आपली ही कविता सजविताना दिसतात. अशा प्रतिमांतूनच त्यांची कविता जिवंत होत जाते, त्यामुळेच सुरेश मथुरेंच्या कवितेतून,

> श्वासावर वाहे श्वास
> अस्वस्थ उसासे वारा
> का पंख शिडाला फुटला
> मचव्याची खचली आरा'

ह्यांसारख्या लयदार, अर्थवाही रचनादेखील आढळून जातात.

मथुरेंच्या एकूण कवितेतच विषयांचं विलक्षण वैविध्य आढळतं. त्यात जसा कोडाईकॅनॉलचा युकॅलिप्टस असतो, पानशेतचा पूर असतो, श्रवणबेळगोळाचा भीमकायी पुतळा असतो, तसंच मत्स्यालय, सी साईड रिसोर्ट, स्कायलॅब ह्यांचाही समावेश होतो. ह्या विविध विषयांतून ते आपल्या अनुभवांना आकार देत जातात, तशाच आपल्या प्रतिक्रिया नोंदविताना दिसतात. अशा जीवनप्रवासात त्यांना 'अशीही माणसं जवळपास हरघडी आढळतात की, क्षितिजं ज्यांच्याकडे लीन होऊन धावत येतात.' मथुरेंच्या किती तरी कविता अशा आशयानं समृद्ध झालेल्या असतात. 'रात्री'संबंधीच्या एका कवितेत ते सहज लिहून जातात.

> 'रात्र जाते प्रत्येकाच्या डोळ्यांमधून
> प्रत्येकाच्या वयाप्रमाणे वकून वचून'

किंवा हुकूमशाही पर्वाबद्दलचं त्यांचं कवितेतलं निदानदेखील तसंच अचूक ठरतं.

'फिरवता येत नाही काळ
चाळ बांधलेल्या पायांसारखा'

अशी अर्थपूर्ण शब्दरचना सुरेश मथुरेंच्या कवितेत जागोजाग दिसते आणि त्यामुळेच त्यांची कविता अधिक प्रभावी ठरते.

मथुरेंच्या कवितेत विषयांचं वैविध्य असलं तरी त्यातून जाणवते ती अनुभवांची एक विशिष्ट घडण. हे अनुभव तळागाळातले नसतात किंवा सर्वसामान्यांचे नसतात, तर ते एका विशिष्ट सामाजिक परिस्थितीचे प्रातिनिधिक ठरतात. ह्यामुळेच मथुरेंच्या कवितेत स्टफ करून ठेवलेला पक्षी, दारावरचा गनिमी डोळा, फ्रीजमधला ब्रेकफास्टलेला भर्जरी ब्रेड, टी. व्ही. तून घरी येणाऱ्या ओल्या ओल्या आठवणी, मांसावर येणारे मांस, इंग्लंडमधून राजरोस कान कोरीत हिंडणारी माणसं, कॅक्टसची झुंबड, सेल्फ कंटेंड ब्लॉकच्या ग्लासहाउसमध्ये जपविलेली ऑर्किड यांसारखे उल्लेख वरचेवर येत रहातात. हे सारेच उल्लेख उच्चभ्रू शहरी जीवनाशी निगडित असतात आणि असं उच्चभ्रू जीवनच मथुरे ह्यांनी आपल्या बऱ्याचशा कवितांतून मांडलं आहे. म्हणून एका विशिष्ट प्रकारच्या, काहीशा उच्चभ्रू जीवनानुभवांत त्यांची कविता कुठे तरी बंदिस्त झाल्यासारखी वाटते.

'युकॅलिप्टस' हा सुरेश मथुरे यांचा पहिलाच कवितासंग्रह असला तरी त्यात पहिलेपण निश्चितच जाणवत नाही. त्यातल्या किती तरी कविता आशयाच्या दृष्टीनं जशा समृद्ध तशा शब्दांच्या दृष्टीनं संपन्नही आहेत. आपल्या प्रतिमा–प्रतिकांमधून मथुरे निसर्गाबरोबरच माणसालाही कुठे तरी समजून घेताना दिसतात. ते आधुनिक जीवनातल्या अटळ अशा यांत्रिकतेबरोबरच मानवी मनातल्या गर्दगार भावनांचाही विचार करताना दिसतात. म्हणून निसर्ग आणि मानव, यंत्र आणि जीवन ह्यांतला समतोल साधणारी ही कविता आज महत्त्वपूर्ण ठरते.

—अशोक प्रभाकर डांगे

युकॅलिप्टस
सुरेश मथुरे
पॉप्युलर प्रकाशन
पृष्ठे : ९६, किंमत : आठ रुपये.

## मुंबई वार्ता : पृष्ठ ६ वरून

'शिबीर म्हणजे एक धमाल होती' असं समाधानानं सांगणाऱ्या अलका गरुड या विद्यार्थिनीनं सांगितलं की, शिबिराच्या शेवटी प्रात्यक्षिक म्हणून जी एकांकिका बसविली जाते त्याऐवजी थेट संगीत नाटकापासून प्रायोगिक नाटकापर्यंत वेगवेगळ्या नाट्यप्रकारातले एकेक प्रवेश बसवून घेतले असते तर ते अधिक उपयुक्त ठरले असते.

या शिबिराचा समारोपसमारंभ श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. दारव्हेकरांनीच म्हटल्याप्रमाणे या शिबिरातून अमुक इतके अभिनेते, दिग्दर्शक निर्माण होतीलच असे नाही. सरकार या शिबिराचा सगळा आर्थिक भार स्वतः पेलते, विद्यार्थ्यांना खर्च येत नाही. असा खर्च करूनच यापुढे सोलापूर, अकोला इ. ठिकाणी आणखीही शिबिरे भरविण्याचा शासनाचा विचार आहे आणि तो खचितच स्वागतार्ह आहे.

किमान, नाट्यविषयक जाण असणारे असे नाट्यप्रेमी शिबिरातून नक्कीच निर्माण होतील. नाट्यसमीक्षकांसाठीही यात एखादा अभ्यासक्रम ठेवला तर तो उपयुक्तच ठरेल. □

## □ पूरनियंत्रण–सरकारी योजनांचे अपयश

नेमेचि येणाऱ्या पावसाळ्याबरोबर उत्तर भारताला बसणारा पुराचा फटका ही गोष्ट आता नवीन राहिलेली नाही. ही आपत्ती प्रतिवर्षी येत असल्यामुळे सावधगिरीचे आणि मुख्य म्हणजे कायमस्वरूपी पूरनियंत्रणाचे उपाय सरकारकडून अपेक्षित आहेत. सरकारनेही अशा अनेक पूरनियंत्रणयोजना आखल्या होत्या. त्यातील काहींची अंमलबजावणीही सुरू झाली आहे; पण पूरनियंत्रणाचे हे उपाय पाहिजे त्या प्रमाणात प्रभावी ठरत नाहीत. या पूरनियंत्रण-योजनांवर प्रकाश टाकणारी माहिती मुंबईतील एका वृत्तसंस्थेनं अलीकडेच प्रसिद्ध केली आहे.

काही वर्षांपूर्वीच राष्ट्रीय पूरनियंत्रण मंडळ स्थापन करण्यात आले होते आणि पूरनियंत्रणाच्या देशव्यापी मोहिमेसाठी आजतागायत सुमारे ५५३ कोटी एवढी प्रचंड रक्कम खर्ची पडली आहे. तरीही राज्यांना पुराचा फटका बसणं, मोठ्या प्रमाणावर जीवित आणि वित्तहानी होणं आणि नंतर पुनर्वसनासाठी देखील मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च होणं हा आता नेहमीचाच घटनाक्रम ठरला आहे.

प्रसिद्ध झालेल्या माहितीनुसार या वर्षी उत्तर भारतात आलेल्या पुरामागचं मुख्य कारण उत्तर काशी आणि आसपासच्या प्रदेशात मोठ्या प्रमाणावर होणारी जंगलतोड हे होय. उत्तर काशीपरिसरातील ८०% भाग पूर्वी घनदाट जंगलांनी व्यापलेला होता; पण आज मात्र अवघ्या १५% भूभागावर जंगले दिसून येतात. वनरक्षक, वनक्षेत्रपाल असे उच्चपदस्थ सरकारी अधिकारी नेमूनही एवढ्या मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर जंगलतोड होते याचं मुख्य कारण म्हणजे लाचलुचपत व भ्रष्टाचार!

हिमालयाच्या नजीकचा जंगलव्याप्त प्रदेश सतत जंगलव्याप्त ठेवण्याकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे. अन्यथा सर्वच लहानथोर नद्यांना पूर येतील. उत्तर काशी भागात आलेला पूर जंगलतोडीमुळे आला आहे आणि गेल्या २५ वर्षांत देशातील ५० लाख एकर वनव्याप्त जमीन उजाड बनल्यानंतर आजही जंगलतोडीविरुद्ध परिणामकारक उपाय अभावानेच आढळतात. १९७७ मध्ये महापुराच्या या संकटामुळे ११२०० कोटी रुपयांची वित्तहानी झाली आहे आणि पूरनियंत्रण असेच अयशस्वी ठरत गेले तर हे आकडे आणखीनच फुगतील.

समाधानाची बाब म्हणजे गुजरात सरकार जंगलतोडीला प्रतिबंध करीत असतानाच वनसंवर्धनाची महत्त्वाकांक्षी मोहीम हाती घेत आहे. या मोहिमेत गेल्या वर्षी उजाड माळरानावर ५ कोटी वृक्ष लावण्यात आले आणि आज त्यातले ४ कोटी – प्रभावी देखरेखीमुळे तग धरून आहेत. □

रंगभूमी

# चार्वाक - एक मोठे निमित्त....

विनय हर्डीकर

'चार्वाक' वर लिहिताना खरं म्हणजे 'तीन पैशाच्या तमाशा'ची आठवण होऊ नये इतकी ही दोन नाटकं वेगळी आहेत. विषय, लेखनपद्धती, प्रयोगतंत्र एवढ्यावरच हा वेगळेपणा थांबत नाही. या नाटकाविषयीचे अंदाजही दोन टोकांचे होते. म्हणजे 'चार्वाक कितीही चांगलं असलं तरी पडणार' आणि 'तमाशा कितीही भुक्कड असला तरी चालणार' अशा प्रकारचे. नेहमीप्रमाणेच हे अंदाज काही तंतोतंत खरे ठरलेले नाहीत. मात्र या दोन नाटकांत एक साम्यस्थळ मला सापडलं त्याचा मुद्दाम उल्लेख करतो. दोन्ही नाटकांचे नायक तुरुंगात जातात आणि त्यांच्या शेवटच्या इच्छा पुरविण्याचा प्रश्न दोन्ही नाटकांत येतो. दोन तास बेंबीच्या देठापासून पॉपसंगीत खच्चून ओरडणारा अंकुश नागवकर, 'बाजरीची भाकरी आणि वांग्याचं भरीत' असं नंदू भेंडेच्या बुळबुळीत, आंग्लाळलेल्या मुंबईकर आवाजात म्हणतो तर चार्वाकाची अंतिम इच्छा आधीच ओळखून अमात्य त्याचा ग्रंथ त्याला पाहण्यासाठी घेऊन येतात. या दोन नाटकांतला फरक इथे खरा जाणवतो, महत्त्वाचा ठरतो. कारण जवळपास एकाच वेळी ही नाटके रंगमंचावर आली. आधुनिकतेचा बुरखा मिरवणारी पुलंची कंटाळवाणी मध्यम वर्गीय जाणीव एकीकडे तर गंभीर तत्त्वज्ञानाचा वेध घेऊन त्याच्यात नाट्य निर्माण करू पाहणारी पुंडलीकांची प्रगल्भ वृत्ती दुसरीकडे! पहिली ब्रेश्तच्या ओझ्याखाली पार मोडली. दुसरीचं काय झालं तेच पाहण्याचा प्रयत्न करतो आहे...

'चार्वाक'च्या निमित्ताने इतरही अनेक गोष्टी नोंदवून ठेवाव्यात असं वाटतं. विद्याधर पुंडलीक यांच्या यापूर्वीच्या नाटकांच्या यशापयशाचं (की अपयशाचंच?) ओझं हे नाटक पहात असताना, त्याच्यावर लिहीत असताना मनावर असणार! असतं, घाशीराम कोतवालपासून मराठी नाटकामध्ये जो संगीत, नृत्य, समूहदृश्ये यांचा वापर सुरू झाला व आता चांगलाच बोकाळला आहे तोही मनात असतोच. पीडीएच्या गेल्या ३–४ वर्षांतल्या सातत्यपूर्ण अपयशाचा विचारही प्रयत्न केला तरी मनातून जाऊ शकत नाही. एवढंच नाही तर नाटक हे मुख्यत: करमणुकीसाठी पहायचं व लिहायचं हा स्पष्ट धंदेवाईक, वास्तव दृष्टिकोण अनेक लोकांचा असतो हेही जाणवतं. जे विचार करू शकतात त्यांच्यापैकी अनेकांनी 'तात्त्विक चर्चा करायची तर कथा लिहा, कादंबरी लिहा; पण नाटक कशाला? आणि नाटकच लिहिलं तर त्याचे प्रयोग कशाला(?) वाचनच करा!' अशी प्रतिक्रिया केवळ टूम म्हणून नाही, तर एक प्रामाणिक तक्रार म्हणून केल्याचंही आठवतं. या आणि अशा अनेक पूर्वग्रहांच्या पार्श्वभूमीवरच या नाटकाचा विचार मला करायचा आहे.

बाकी काही असो. 'चार्वाक'चा प्रयोग अगदीच बेताचा होतो असं सगळ्यांचंच मत पडतं आहे. भालबा केळकरांचं दिग्दर्शन फारच एकसुरी आणि कंटाळवाणं वाटतं. प्रत्येक पात्रात त्यांच्या 'प्रेमा' छाप लकबी या ना त्या प्रकारे डोकावून जातात. त्यांचे ते भिक्षुक पाहुणं म्हणजे प्रेक्षकांना शिक्षाच आहे. इतको ती पात्रं बालिश व non farcical वाटतात. भास्कर झालेल्या बापू जोशींकडे आहे फक्त दणदणीत आवाज. त्याने आपल्या नकला नीट पाठ केल्या, इमानदारीने म्हटल्या एवढंच. अमात्य नुसताच आखाडेबाज बजरबट्टू वाटला आणि सेवा चौहान यांच्या कामातील सफाई गुळगुळीत, परिणामशून्य होती. रूढ समीक्षेत सांगायचं म्हणजे 'यांनी आपली कामं मन लावून, नेटकेपणानं केली' किंवा 'व्यवस्थित सांभाळली'. वधूपरीक्षेतल्या 'मुलगी नाकीडोळी नीटस आहे' किंवा 'वर्णाने उजळ आहे' या परस्पर छेदक वाक्यांसारखीच ही नाट्यपरीक्षणातली वाक्यं आहेत, उपयुक्त आहेत. माधुरी आगरकर म्हणजे डोक्याला, डोळ्याला, कानांना ताप आहे. तिने रेडिओवरच्या श्रुतिका हेच आपलं 'क्षेत्र' ठरवावं. तसा खोटा व्याकुळ आवाज तिचा आहेच. अभिनयाविषयी न बोललेलंच बरं! या मंडळींच्या कामाबाबत भालबांना दोष देणं फारसं योग्य होणार नाही. कारण निर्वाह: प्रतिपन्नव्यक्तिषु' अशी पीडीएची सध्याची स्थिती (की धोरण?) आहे हे मी जाणतो!

राहता राहिला दस्तुरखुद्द चार्वाक म्हणजे श्रीराम खरे! त्यांचं काम उजवं होतं हे मान्य; पण ते इतरांच्या तुलनेनं! बंडखोर विचारवंत चार्वाक, देवालाही धाक लावू पाहणारा चार्वाक मला त्याच्या दिसण्यात, बोलण्यात कुठेच सापडला नाही. एक हसतमुखमुद्रेचा गोरागोमटा तरुण, तो कधी आईशी लडिवाळपणा करतो, प्रेयसीबरोबर छानछानपणे लाडात येतो, धर्मसभेत वाद घालतो, भास्करला दम देतो, अमात्याशी खोचकपणे बोलतो असे तुकडेतुकडेच जास्त वाटले. एक तर बराच वेळ चार्वाक पाय धुवायला बसलेल्या नवरदेवासारखा आसनावर बसतो किंवा हाताची घडी घालून गरज असेल त्याप्रमाणे 'आधा दाहिनेमुड' किंवा 'आधा बायेंमुड' करून भालबांच्या दिग्दर्शनाला न्याय देतो. क्वचित चेहरा हुकमी व्यथितही करतो. श्रीराम खरे हे सगळे म्हणतात तसे ताकदीचे नट असले तर त्यांनी हे तुकडे गोळा करून बंडखोर विचारवंताची एकसंध प्रतिमा उभी करायला हवी होती. शेवटच्या प्रसंगातसुद्धा ते प्रेक्षकांची (आधीच असतात फारच थोडे) फारशी सहानुभूती मिळवू शकत नाहीत ते त्यामुळेच. मला स्वत:ला रंगभूमीवरच्या पात्रांपेक्षा ते मागचं भव्य चक्रच अधिक परिणामकारक वाटलं. अस्तित्व म्हणून आणि प्रतीक म्हणूनही!

प्रयोगाच्या अपयशातला हा दिग्दर्शक नटमंडळींचा वाटा पाहिल्यानंतर शेवटी लेखकच उरतो. लेखनच शिल्लक राहतं.

त्याबद्दल मात्र पुष्कळच लिहिण्यासारखं आहे आणि बरं-वाईट, आवडलं — नावडलं अशापेक्षा वेगळ्या भाषेत लिहिण्याची जरूर आहे. चार्वाक पाहणाऱ्या बहुतेकांना त्याची भाषा आवडते, काही ठिकाणी जिंकून घेते; पण तरीही त्यात नाटयमयतेचा अनुभव येत नाही. खरोखरच या नाटकाची भाषा म्हणजे दीर्घकाळानंतर कानांना मिळणारा दिलासा आहे. एखादा महेश एलकुंचवार सोडला तर सध्याची नाटकं एक तर अति-weak भाषेत असतात, खोट्या शाब्दिक भावनाकुल अंगानं जातात किंवा उपहास-वजा, खटकेबाज अशा संवादांनी भरून जातात. या ना त्या कारणानं नाटकाच्या संहितेला दुय्यम मानलं जात आहे. याची खंत ज्यांना वाटते त्यांना चार्वाकची संहिता वाचून खरोखरच दिलासा मिळेल, आनंदही होईल. भाषा हे नाटकाचं प्रमुख माध्यम आहे आणि लेखक सिद्धहस्त असल्यानं त्यानं ते अतिरेक न करता वापरलं आहे, राबविलेलं नाही.

अनेक वेळां विद्याधर पुंडलीक यांच्याशी बोलताना त्यांना धूसर व्यक्ती आणि धूसर व्यक्तींचा परस्पर संबंध किंवा एखाद्या व्यक्तिमत्त्वाचा एक धूसर कोपरा यांचं जबरदस्त आकर्षण आहे असं मला जाणवतं. वाङ्मय, इतिहास, महाकाव्ये अशा अनेक ठिकाणच्या धूसर जागा त्यांना खुणावत असतात. त्यांचं आव्हान स्वीकारण्याची धडपड पुंडलीक करीत असतात. या धूसर जागांना ते dark areas of silence असं म्हणतात. चार्वाक ही त्यांना तत्त्व-ज्ञानाच्या क्षेत्रात अशी एक जागा सापडली. अशी अस्पष्टता, अशी शांतता निर्माण होण्याच्या आगेमागे पुष्कळच नाटयमयता असू शकते आणि तिचा शोध घेण्याचा प्रयत्न ते कधी कथातून करतात, कधी नाटकातून तर कधी एकांकिकेचं नाटक करून ! चार्वाक हा केवळ भोगवादी नव्हता, केवळ नास्तिक नव्हता किंवा फॅशनेबल बंडखोरही नव्हता अशी भूमिका घेऊन पुंडलीकांनी चार्वाक हा एक व्यक्तिनिष्ठ, बुद्धिप्रामाण्यवादी बंडखोर विचारवंत म्हणून उभा करण्याचं ठरविलं आणि एक मोठं आव्हान स्वीकारलं ! एकीकडे आणीबाणीसारख्या अनेक तात्त्विक संघर्षांची पार्श्वभूमी असूनही 'सूर्यास्त' सारखी भडक नाटकं लिहिली जात असताना, अडचणीची वेळ येताच मातब्बर मंडळी 'ब्रेश्त वगैरे सोडून द्या!' म्हणून सामाजिक जाणिवेचं धनुष्य छातीवर घेऊन धाडकन् उताणी पडत असताना, उघडउघड तात्त्विक संघर्षाला प्रधान मानून तो रंगमंचावर उभा करायचा आणि त्या संघर्षामध्ये केन्द्रस्थानी असलेल्या व्यक्तीचं तत्त्वज्ञान आणि जीवन यांच्यामध्ये सुसंगती प्रस्थापित करायची असं त्यांनी ठरविलं आणि खरोखरच या नाटकाकडे वेगळ्या दृष्टीनं पाहणं अनि-वार्यच करून ठेवलं.

### अनेक पातळींवरचे संघर्ष

चार्वाकाच्या जीवनातल्या प्रधान तात्त्विक संघर्षाला इतर अनेक संघर्षांचीही जोड या नाटकात मिळाली आहे. धर्म, प्रेम आणि बुद्धि-प्रामाण्य; मित्रत्व आणि कर्तव्य ही बेकेट-पद्धतीची रस्सीखेच; राजसत्तेचं दंड कर-ण्याचं सामर्थ्य आणि व्यक्तीच्या विचारांचा अव्याहतपणा, धर्मश्रद्धांना, रूढींना धक्का देणाऱ्याबद्दलची समाजाची चीड, संताप आणि एक प्रकारचं अनामिक आकर्षण, आदर यांची ओढाताण, भूतकाळ व भविष्यकाळ नाकारल्या-नंतर वर्तमानाशी उद्भवणारा अपरिहार्य संघर्ष असे अनेक पातळींवरचे संघर्ष या नाटकात आहेत. संघर्ष जर नाटयमयतेसाठी आवश्यक असेल तर या नाटकात फार वरच्या दर्जाची नाटयमयता आपोआपच यायला हवी होती; ती मात्र आलेली नाही — याचं एक कारण मला वाटतं की, यातला कोणता तरी एक संघर्ष मुख्य मानून नाटकाचं लेखन व्हायला हवं होतं. म्हणजे संघर्षसूत्रं पार्श्व-भूमीसारखी उपयुक्त ठरली असती. अनुभवाला 'टोकदारपणा' ही आला असता. भास्कर किंवा अदिती ही पात्रं अधिक प्रभावी करून ते साधता आलं असतं. आता ही पात्रं चार्वाकापेक्षा वेगळी आहेत, ती चार्वाकावर प्रेम करतात, चार्वाकाच्या निर्भय विचारशक्तीबद्दल त्यांना आदरही आहे. चार्वाकाशी झुंज मात्र त्यांना घेता येत नाही. अशी झुंज अधिक नाटयमय झाली असती हे निःसंशय !

चर्चाप्रधान कलाकृती निर्माण करणं हे जोखमीचं काम आहे. कथा-कादं-बरीमध्ये चर्चा करणं सोपं असतं. कारण त्याचा अनुभव वाचक केव्हाही थांबवू शकतो — तो पुस्तक ठेवून देतो. नाटकात तसं करणं प्रेक्षकाच्या हातात नसतं. असूही नये. नाटकाचा प्रेक्षक सतत 'पुढे काय' ही मागणी अनुभवाच्या भाषेत करीत असतो आणि तो पुष्कळच अधीरही असतो. म्हणून नाटकातली चर्चा एक तर भावनात्मक अनुभवाच्या पातळीवर जावी लागते किंवा ती तुफान मनोरंजक तरी असावी लागते. एलियटच्या 'मर्डर इन द कॅथीड्रल'मधली चर्चा ही पहिल्या प्रकारची आहे आणि चर्चा-विचार, प्रधान मानूनच लिहिणाऱ्या शॉच्या बहुसंख्य नाटकांमधील चर्चेचा ढंग दुसऱ्या प्रकारचा आहे. विदूषकी भाषा आणि विचित्र हालचाली ही शॉची प्रमुख तंत्रं होती; परंतु सेंट जोनसारखं नाटक त्याला त्या धर्तीवर शेवटपर्यंत लिहिता आलं नाही. मर्डर इन द कॅथीड्रलमध्ये वैचारिक संघर्ष भावनात्मक पातळीवर चढविताना एलियटनं काव्य, प्रतीकं, धार्मिक वातावर-णाची पार्श्वभूमी, देवसत्ता-राजसत्ता यांचं द्वंद्व आणि त्याला येणारी मित्रत्वाची डूब यांचा पुरेपूर उपयोग करून घेतला आणि तत्त्वचर्चा कायम ठेवून शोकनाटच उभं केलं, तर शॉनं आपली बहुसंख्य नाटकं ही चर्चा-प्रधान परंतु विनोदी ठेवली. या चर्चेमध्ये ओनुई, ब्रेश्त, पिरांदेल्लो, इब्सेन या सर्वांना आणणं शक्य आहे; परंतु सध्या आवश्यक नाही. चर्चाप्रधान शोकनाटच लिहिताना पुंडलिकांनी दुहेरी धोका पत्करला हेच फक्त सांगायचं आहे. चर्चा जर अनुभवाच्या, भावनोत्कट प्रतीतीच्या पातळीवर गेली तरच शोकनाटच यशस्वी होतं— भावनात्मक प्रतीती-शिवाय ट्रॅजेडी असूच शकत नाही.

या सगळ्यामध्ये सामाजिक रेलेव्हन्सचा एक भाग असतोच. त्यानं मामला अधिक गुंतागुंतीचाच होतो. या नाटकाला तो आपो-आपच प्राप्त झाला. बुद्धिप्रामाण्य आणि रूढिग्रस्तता यांच्यातला भारतीय समाजातला चिरंतन विरोध हे एक कारण— आणीबाणीच्या काळात निर्माण झालेलं व्यक्तिस्वातंत्र्य व सत्तालालसा यांचं द्वंद्व हे दुसरं कारण ! संहितेतला आणीबाणीचा उल्लेख संयत आहे. प्रयोगात तो थोडा बटबटीत होतो; परंतु उपयुक्त ठरतो. तेव्हा सहेतुक असो की निर्हेतुक, सामाजिक संदर्भ इथे स्पष्ट आहे. नाटक पाहताना आणि वाचतानाही असं

जाणवतं की चार्वाकाचा समकालीन रूढिग्रस्त समाजाशी, कर्मकांडाशी आणि त्याचे पर्यवसान म्हणून राजसत्तेशी चाललेला झगडा अतिशय प्रभावीपणे व्यक्त झाला आहे. दुसरा अंक फार चांगला वठतो तो त्यामुळेच. धर्म, समाज, प्रेम, व्यक्तिस्वातंत्र्य, परंपरा अशा अनेक विषयांचा पुंडलीकांनी दीर्घकाळ अभ्यास केलेला आहे हे केवळ जाणवत नाही, त्या अभ्यासाची खोली मोहूनही टाकते. भाषेची झळाळी सार्थपणे प्रकाशमानही होते. जरी अभिनय फारसा उजवा नसला तरी आणि कोणताच संघर्ष पूर्णपणे exhaust होत नसला तरीही ! कर्म, प्रारब्ध, संचित, श्राद्ध, इत्यादी अनेक मराठी नाटकांपासून दूर असणारे शब्द सुद्धा फारसे जड वाटत नाहीत, काही डोक्यावरून जातं आहे असं वाटत नाही... हे प्रसंग अधिक प्रभावी करता आले असते असं वाटूनही ते पार कंटाळवाणे आहेत असं वाटत नाही हे लेखकाचं यश आहे.

चार्वाक या नाटकाची गंमत अशी की नेमके भावनात्मक प्रसंगच कंटाळवाणे झाले आहेत. आई–वडील, प्रेयसी–पत्नी, भास्कर आणि शिष्यवर्ग यांच्या सहवासात असे भावनात्मक प्रसंग चार्वाकाच्या वाटचाला येतात आणि एकापाठोपाठ एक भुईसपाट होतात. चार्वाकाच्या बुद्धिप्रामाण्याची आणि नास्तिकतेची बीजे त्याच्या जीवनात शोधताना पुंडलीकांनी फार चांगली कल्पकता दाखविली आहे. त्याच्या वडिलांनी देवाच्या शोधार्थ प्रेम, वात्सल्य, कर्तव्य ही सर्व मूल्यं झिडकारून त्याच्या व आईच्या जीवनात जे दुःख निर्माण केलं त्याची प्रतिक्रिया म्हणून चार्वाक नास्तिक व ऐहिकतावादी, वर्तमानवादी झाला ही उपपत्ती सुसंगत वाटली तरी तिचा नाट्यानुभव तसा येत नाही. पुंडलीकांनी रंगविलेले प्रसंग केवळ अपौराणिक आणि कालविपर्यस्त नाहीत ते मुळातच चार्वाकाच्या व्यक्तित्वाशी सुसंगत वाटत नाहीत. अतिशय मध्यमवर्गीय आणि तेही आधुनिक पद्धतीचे मध्यमवर्गीय प्रसंग चार्वाकाच्या आयुष्यात पुंडलीकांनी घातले आहेत. नास्तिक, बुद्धिप्रामाण्यवादी चार्वाक, रुक्ष, तुसडा नव्हता असं दाखविण्यासाठी हा सगळा खटाटोप. अगदी सुरुवातीचा नैवेद्याच्या दुधाबद्दलचा आईशी चाललेला ' श्यामची आई ' पद्धतीचा संवाद ' चार्वाक 'वरच्या कोटचा आणि ' श्री ' रागावरून प्रेयसीशी होणारं गुळछबू बोलणं, शिष्यांशी वागताना दिसणारी नम्रता हे सगळं मोठं छान आहे, छान लिहिलं आहे; पण चार्वाकाच्या व्यक्तिमत्त्वाला आवश्यक ती धार आणि धुमसता असंतोष त्यातून अनुभवास येत नाही. असा चार्वाक एकदम सर्व धर्म, रूढी, समाज, सत्ता यांचा विरोध का पत्करतो, बलिदान का करतो, हा प्रवास नाटकात नीट घडलेला नाही– एकीकडे हळुवारपणा दुसरीकडे वज्रनिश्चय असे चार्वाकाचे दोन भाग जोडले जातच नाहीत. कदाचित् विसाव्या शतकातला मध्यमवर्गीय बुद्धिप्रामाण्यवादी असा असूही शकेल– त्याचा चार्वाकावर इतका गुदमरून टाकणारा प्रभाव न पडू देणं लेखकाच्या हातात होतं. तत्त्वचर्चेचं आव्हान पुंडलीकांनी स्वीकारलं, पेललं– भावनात्मक संघर्षाचं तसं झालेलं नाही. ते लिहिलेत चांगले एवढंच. अदिती शेवटी येऊन ' मी तुमच्या स्वप्नात...' वगैरे बडबड करते तेव्हा तर अगदी उद्वेग येतो आणि चार्वाक ज्या व्याकुळतेनं स्वतःच्या मुलाविषयी शिष्यांशी बोलतो, अदितीशी बोलतो तेव्हा केवळ वर्तमान प्रमाण मानणारा पंडित चार्वाक अकारण खाली उतरतो– निराशा करतो. नायकाचं व्यक्तित्व विविध रंगी करण्याचा हव्यास थोडा नडलाच आहे. मध्यमवर्गीय जाणिवांचा हानिकारक प्रभाव हे या नाटकाचं ' तीन पैशाचा तमाशा 'शी आणखी एक साम्य आहे !

चार्वाकाचं तत्त्वज्ञान किती सुसंगतपणे उभं राहतं हेही पाहिलं पाहिजे; परंतु त्या बाबतीत माझा अधिकार फार मर्यादित आहे. मुळात चार्वाक दर्शन म्हणूनही फार थोडंच उपलब्ध आहे; परंतु पुंडलीकांचा चार्वाक हा नास्तिक वाटण्यापेक्षा व्यक्तिवादी वाटतो अशी एक बोलकी प्रतिक्रिया श्री. ग. माजगावकर यांची आहे. तिचंही कारण मला चार्वाकावर सध्याच्या संदर्भांचा, सध्याच्या मध्यमवर्गीय अनुभवांचा जो अनावश्यक प्रभाव पडला आहे त्यात असावं असं वाटतं. अर्थात चार्वाक–दर्शनाचा रंजक परिचय हा नाटकाचा हेतूच असणार नाही. नाही तर आमच्या विद्यापीठात रोजच चार्वाकचे प्रयोग चाललेच आहेत असं म्हणावं लागेल. नाटकात दिसलेल्या चार्वाकाकडे एक बंडखोर विचारवंत माणूस म्हणून पाहताना जे वाटलं तेवढंच इथे मांडलं आहे, त्याची कारणं शोधण्याचा प्रयत्न केला आहे. ' चार्वाक 'च्या निमित्तानं जे प्रश्न निर्माण झाले त्यांची चर्चा केली आहे. संहितेतली उदाहरणं, प्रयोगातले बारीक गुण-दोष यांवर फार भर दिलेला नाही. मर्ढेकर तशा लिखाणाला Cheaply academic म्हणत !

' चार्वाक ' हे नाटक वाचलं पाहिजे, पाहिलं पाहिजे. त्याच्यावर अधिक चर्चा झाली पाहिजे. ' चार्वाक 'चं यशापयश हे एका वेगळ्या प्रयोगाचं आहे. हा प्रयोग विचारी, प्रगल्भ लेखकाचा आहे, गल्लाभरू ' नाटककारा 'चा नाही. मराठी नाटकांविषयीच्या चर्चेला एक वेगळं वळण देण्यासाठी चार्वाक हे एक मोठं निमित्त आहे. □


**आणीबाणीच्या पावणेदोन वर्षांचा वेगळा शोध**

**स्पष्ट, परखड आणि प्रामाणिक**

# जनांचा प्रवाहो चालिला

**लेखक : विनय हर्डीकर**

**किंमत : वीस रुपये**

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.

शिक्षण व त्यांची अर्थार्जनाची कुवत यामध्ये सुधारणा घडवून आणणे आणि आपल्या कुवतीप्रमाणे आणि इच्छेप्रमाणे प्रत्येक नागरिकाला कोणत्याही ठिकाणी काम करण्याचे व राहण्याचे स्वातंत्र्य प्राप्त करून देणे, यासाठी आवश्यक ते कार्यक्रम पार पाडण्याचे राहील.

चार कारणांसाठी, अमेरिकन समाजाने या पर्यायाचा स्वीकार करण्याचा गंभीरपणे विचार केला पाहिजे, असे आम्हाला वाटते. १. नवीन व्यवसायक्षेत्रे मुख्यतः उपनगरांमध्ये व महानगरक्षेत्रांमध्ये निर्माण होत आहेत; पण कायमची बेकार लोकसंख्या ही वरच्यावर नीग्रो 'महारवाड्या'तून अधिकाधिक केंद्रित होत आहे. यामुळे, बऱ्यापैकी नोकऱ्यांमध्ये सर्व बेकार नीग्रोंना सामावून घेणे हे दिवसेंदिवस जास्त कठीण होऊन बसेल; पण जर शहरांच्या मध्यभागापेक्षा अन्यत्र, म्हणजे उपनगर व महानगर क्षेत्रांमध्ये, नीग्रोंची वस्ती वाढली, तर त्यांना कोणत्या प्रकारच्या नोकऱ्या कुठे उपलब्ध आहेत याची माहिती सुकरपणे होईल. नोकरी करण्यासाठी त्यांना फार लांब जावे लागणार नाही. स्वतःच्या प्रयत्नाने नोकरी मिळविण्याची व ती टिकविण्याची संधी त्यांना अधिक प्राप्त होईल. २. नीग्रो 'महारवाड्या'तून राहणाऱ्या मुलांच्या शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्याचा वांशिक व सामाजिक एकात्मता हाच सर्वांत परिणामकारक मार्ग आहे, असे महामंडळाचे मत आहे. ३. गरीब व मध्यमवर्गीय नीग्रो लोकांसाठी पुरेशी घरे बांधावयाची झाल्यास, तसेच उत्पन्नाच्या सर्व पातळ्यांवर नीग्रोंना खऱ्या अर्थाने निवडस्वातंत्र्य द्यावयाचे झाल्यास, नीग्रोंचे उपनगर व महानगर क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर स्थलांतर व्हावे लागेल. असे स्थलांतर केवळ वाढत्या सुस्थितीतून आपोआप घडून येईल असे आम्हास वाटत नाही. स्थलांतराचा असा प्रवाह सुरू होण्यासाठी, वर्णभेदातीत घरविषयक कायदा होणे अत्यावश्यक आहे. ४. द्विदल समाजाकडे चाललेली आजची वाटचाल थांबवून एकराष्ट्राची निर्मिती करण्याचा एकात्मीकरण हा एकच मार्ग आहे, हे हा पर्याय स्वीकारण्याचे सर्वांत महत्त्वाचे कारण आहे. समाज दुभंगण्याची प्रक्रिया हाताबाहेर जाण्याआधीच ती उलटविण्यात येण्याची शक्यता फक्त या पर्यायातच आहे.

आम्ही वरील तीन प्रमुख पर्याय अमेरिकेच्या लोकांसमोर मांडले आहेत. कारण, आम्हाला असे वाटते की, अशी कोणतीही निवड करण्याचे परिणाम काय होतील हे एकदा स्पष्टपणे अमेरिकन लोकांच्या डोळ्यांसमोर यावे आणि त्यांना शहाणपणाने निवड करता यावी या गोष्टीचे आम्हाला अत्यंत महत्त्व वाटते.

## निष्कर्ष

वरील विश्लेषणातून निर्णायक महत्त्वाचे तीन निष्कर्ष निर्माण होतात. १. एकाच भौगोलिक सरहद्दीमध्ये दोन विभक्त अमेरिकन समाज निर्माण होण्याच्या दिशेने आपल्या सबंध राष्ट्राची वाटचाल वेगाने चालू आहे. आणखी वीस वर्षे याच दिशेने आपण जात राहिलो, तर ही विभागणी अशा थराला जाईल की, मग 'एकात्म राष्ट्र' ही गोष्ट अशक्यप्राय होऊन बसेल. उपनगरांतून, दुय्यम–तिय्यम शहरांच्या मध्यवर्ती भागांतून आणि महानगरांच्या मध्यभागांच्या कडेकडेने श्वेतवर्णीय समाजाची वस्ती राहील, तर नीग्रो समाज मुख्यत्वेकरून महानगरांच्या मध्यभागातून केंद्रित होऊन राहील अशा दुभंगलेल्या राष्ट्रात नीग्रो समाज हा कायमचा कनिष्ठ दर्जाचा राहील. नीग्रो 'महारवाड्या'वर सुधारणेची झिलई चढवण्यासाठी खर्ची घातलेल्या किंवा आपण भविष्यात खर्ची घालू त्या रकमांमुळे व प्रयत्नांमुळे नीग्रोंच्या कनिष्ठ दर्जामध्ये बदल होणार नाही.

२. राष्ट्राची अशी कायमची विभागणी झाल्याने दोन विभागांतले अंतर सतत वाढत राहिल्याने दूरदृष्टच्या दोन धोके संभवतात. शहरांतून हिंसक दंगलीचे वातावरण कायमचे टिकून राहील. मानवी प्रतिष्ठा, व्यक्तिस्वातंत्र्य आणि समान संधी या पारंपरिक अमेरिकन ध्येयांना आपण कायमचा हरताळ फासल्यासारखे होणार आहे आणि मग ही आपली आदर्श तत्त्वे जगाने स्वीकारावी असे आपण कोणत्या तोंडाने सांगणार? स्वतः तरी त्यांच्याशी इमान कसे राखणार? ही तत्त्वे उराशी बाळगावी असे आपल्या मुलांना आपण कसे शिकविणार? त्याही परिस्थितीत मुले राष्ट्रनिष्ठेच्या शपथेची पोपटपची करतीलच; 'एक अभंग राष्ट्र' असे म्हणतीलच; पण असे म्हणत असताना, त्यांच्यावर संस्कार मात्र राष्ट्रभक्तीचा होणार नाही. मानव्यावरील अश्रद्धेचाच संस्कार होईल.

३. आपल्या महानगरक्षेत्रांमध्ये माणसामाणसांमधील संबंध कसे असावेत? महानगरक्षेत्रांचे रूप काय असावे? यासंबंधी निर्णय घेण्याची जबाबदारी आपण टाळू शकत नाही. ही जबाबदारी इतकी निर्णायक महत्त्वाची आहे की, विशेष विचार न करता, सध्याचीच धोरणे चालू ठेवण्याच्या निवडीचे परिणाम अतिशय गंभीर होणार आहेत. आपण अजूनपर्यंत जाणीवपूर्वक निवड केलेली नाही किंवा आपणाकडून दिरंगाई झालेली आहे. तशी दिरंगाई करून, एक प्रकारे, आपण चुकीच्या पर्यायाची निवड करत आहोत. म्हणून आपण आशा सोडून द्यावी व कायमचे विभक्त व दुभंगलेले राहण्याचा भोग स्वीकारावा असेही नाही.

वांशिक दंगली, मुख्यतः शहरात होतात. तेव्हा त्यांचा उद्भव होऊ नये याची जबाबदारी स्थानिक प्रशासन व नेतृत्व यांच्यावर आहे, हे जरी खरे असले तरी, या दंगली हा केवळ शहरांचा व शहरांमधील वांशिक अलग वस्त्यांचा प्रश्न नाही. आपण पाहिल्याप्रमाणे समाजशरीरात सर्वत्र भिनलेल्या रोगाचा वांशिक दंगली हा केवळ एक बाह्य आविष्कार आहे. या रोगाने प्रत्येक अमेरिकन माणसाचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. सध्याचीच परिस्थिती चालू राहणे किंवा लष्करी नाकेबंदी करून दंगलीच्या क्षेत्रांना वेढा देणे, हे दोन्ही मार्ग दूरदृष्टच्या स्वीकारणीय नाहीत. अमेरिकन समाजाने जी ध्येये आपल्या जन्मापासून स्वीकारलेली आहेत, त्यांच्याशी अनुरूप असे भविष्य साकार करावयाचे झाल्यास, राष्ट्रीय पातळीवर या समस्येची सोडवणूक करण्यासाठी साऱ्या समाजाने कंबर कसली पाहिजे. पृथ्वीवरील सर्वांत शक्तिशाली आणि श्रीमंत राष्ट्राजवळील साधनसंपत्ती आणि संकल्पशक्ती पणाला लावून नेटाने या समस्येशी निकराने चढाई केली पाहिजे.

एका शतकापूर्वी अमेरिकन संघराज्याच्या संरक्षणासाठी अब्राहम लिंकनने सर्वस्व पणाला लाविले. 'एकात्म अमेरिकन व्यक्तिमत्त्व आणि एकात्म समाज' निर्माण करण्यासाठी आज आपणही असेच सर्वस्व पणाला लावू या! □

[समाज प्रबोधन पत्रिका, ऑगस्ट–सप्टेंबर १९६८ अंकावरून साभार पुनर्मुद्रित]

# पुरुषोत्तम करंडक

## अधिक जागरुकता हवी

कॉलेजमधील तरुण मंडळींना आपल्यातील कला-गुणांची चमक दाखविण्यासाठी पुण्यामध्ये महाराष्ट्रीय कलोपासक या नाटच-संस्थेने रंगमंच उपलब्ध करून दिला आहे. पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका– स्पर्धा या संस्थेमार्फत गेली तेरा वर्षं आयोजित केली जात आहे. यंदाचं हे चौदावं वर्ष. आज मराठी रंगभूमीवर चमकत असलेले अनेक अभिनेते, लेखक, दिग्दर्शक, तंत्रज्ञ या स्पर्धेमध्येही केव्हा ना केव्हा चमकून गेलेले आहेत. शिवाय महाविद्यालयीन तरुणांना वाव देणारी ही एकमेव स्पर्धा असल्याने ती प्रतिष्ठेचीही मानली जाते.

यंदा अभिनव कला महाविद्यालयाने सादर केलेल्या 'यमूचे रहस्य' या एकांकिकेने स्पर्धेची सुरुवात झाली. सतीश आळेकर यांनी केलेलं हे एका कथेचं नाटचरूपांतर आहे. माधव वझे आणि मंजिरी परांजपे यांनी आकाशवाणीवर ती एकांकिका पूर्वीच सादर केली होती. त्यामुळे तिचा प्रयोग कसा होतो याबद्दल उत्कंठा होती. कारण ही एकांकिका रंगभूमीवर सादर करायला कठीण आहे. मधू आणि मालती ही पती-पत्नी हीच या एकांकिकेतील महत्त्वाची पात्रं. यमू ही त्यांची 'कल्पित कन्या.' कल्पित अशा अर्थानं की, ती प्रत्यक्षात अस्तित्वात नसतेच; पण मधू आणि मालती बऱ्याच वेळा ती त्यांच्यात असल्यासारखंच वागतात. तिला शाळेतून घरी आणतात, आंघोळ घालतात, झोपवतात इत्यादी इत्यादी. थोडक्यात एकांकिका सतत वास्तवता आणि फँटसी या दोन पातळचांवर वावरते. त्यामुळेच ही एकांकिका स्टेजवर सादर करणं अवघड होतं; पण शाम भुतकर (मधू) आणि बीना खैरे या 'अभिनव'च्या जोडीने हे आव्हान निश्चितच चांगल्या तऱ्हेने पेललं. शाम भूतकर हा विद्यार्थी गेली तिन्ही वर्षं 'पुरुषोत्तम'च्या स्टेजवर येत आहे. ७६ साली 'लासट हिरव्या डोंगर रांगा'-मध्ये फातरफेकर, गेल्या वर्षी 'पिदी'मध्ये पहिला इसम आणि यंदा 'यमूचे रहस्य'मध्ये 'मधू' अशा या तिन्ही भूमिकांमध्ये भुतकरच्या अभिनयात सहजता हा गुण प्रकर्षाने जाणवला. यंदा त्याला बीना खैरेनेही चांगली साथ दिली. फक्त ते पती–पत्नी म्हणून पुरेसे शोभत नव्हते.

अभियांत्रिकी महाविद्यालयाची 'चिऊताई; चिऊताई दार उघड' ही एकांकिका दुसऱ्या दिवसाचं खास आकर्षण होती. तशी या एकांकिकेची संहिता फारशी प्रभावी नाही. पण विषय महत्त्वाचा आहे, appealing आहे. कितीही शिक्षण घेतलं तरी त्याचा आणि पुढे नोकरी मिळण्याचा काहीच संबंध नसतो; त्या बाजारात व्हायची ती होलपट होतेच, हे प्रेक्षकांच्या मनावर सतत ठसवीत असतानाच 'कॉलेज लाइफ' हीही बाजू एकांकिकेत चांगली दाखविली आहे. त्यासाठी हिंदी सिनेगीतांचा चांगला वापर श्रीरंग करकरे या विद्यार्थ्याने करून घेतला आहे. (उदाहरणार्थ, एका तरुण–तरुणीच्या कॉलेजातल्या प्रेमाची छटा दाखविताना 'उसने कहा था'मधलं 'अहा रिम झिमके ये प्यारे प्यारे' हे गाणं आणि ते फिसकटल्याचं दाखविताना 'दाग'-मधलं 'ये मेरे दिल कहीं और चल' किंवा 'वो न आएँगे पलटकर' हे ठुमरीवजा गीत) करकरेचा आवाजही उत्कृष्ट आहे. हृदयनाथ मंगेशकरपासून तलतपर्यंत सर्वांचीच गीतं तो उत्तमपणे म्हणत होता. दादही घेत होता. 'चिऊताई, चिऊताई दार उघड' हे टायटल साँग आणि इतरही संगीत-दिग्दर्शन त्याचंच होतं. टायटल साँगचा शेवट मात्र थिएटर अॅकॅडमीच्या 'बदकांचं गुपित'मधल्या संगीताशी कुठं तरी साम्य असल्यासारखा वाटत होता. या एकांकिकेचं आणखी एक वैशिष्टय म्हणजे त्यातले गायक-वादक स्टेजवरच चौथऱ्यावर बसले होते आणि साथ करीत होते. (तीन पैशाचा तमाशा? ब्रेख्त??) एकांकिकेमध्ये चौदा पात्रं असूनही स्टेजवर गर्दी झाल्यासारखी वाटली नाही. कारण 'कंपोझिशन्स' व्यवस्थित बसविलेली होती. सतीश देशमुखचा अभिनय ही या एकांकिकेची आणखी एक जमेची बाजू. एकांकिकेत नृत्याचा भाग फारसा नाही; पण जो थोडा आहे तो 'घाशीराम'वरून उचलल्यासारखा वाटला. 'स्टील्स'चा मोहही त्यांना टाळता आला नाही– विशेषत: शेवटल्या भागात काही ठिकाणी तो अनावश्यक वाटला.

एकांकिकेचा शेवट तर अगदी दुरीकरणाचा (alienation) वापर करूनच 'तोपर्यंत हा पडदा तरी टाका' असं काही तरी म्हणून होतो. थोडक्यात, आधुनिक प्रायोगिक रंगभूमीवरचे यच्चयावत प्रयोग आणि प्रकार या एकांकिकेत वापरले होते. प्रथम क्रमांकाचा पुरुषोत्तम करंडक याच एकांकिकेला मिळाला; पण एकांकिका निर्विवादपणे त्या प्रतीची झाली नाही. कदाचित डॉ. वि. भा. देशपांडे या परीक्षकांनी आपल्या निवेदनात सांगितल्याप्रमाणे At च्या दर्जाची कोणतीच एकांकिका न झाल्यामुळे आणि 'समग्र परिणामा'चा विचार करून या एकांकिकेला करंडक दिला असावा.

बी. जे. मेडिकल कॉलेजच्या 'सुलतान' या एकांकिकेचाही बराच दबदबा होता. कारण गेल्या वर्षी 'कैद' ही संपूर्णत: एकपात्री एकांकिका अतिशय प्रभावीपण सादर केलेल्या सदानंद बोरसेने ही एकांकिका दिग्दर्शित केली होती; त्यातील प्रमुख भूमिकाही तोच करीत होता; पण प्रत्यक्षात मात्र एकांकिका फारशी प्रभावी होऊ शकली नाही. विशेषत:, जोपर्यंत पहिली पाच–दहा दहा मिनिटे बोरसे एकटाच स्टेजवर होता तोपर्यंत त्याने प्रेक्षकांवर चांगली पकड ठेवली होती; पण जसजशी डॉक्टर, स्वामी, ज्युली ही पात्रे स्टेजवर येत गेली तसतशी एकांकिका पातळ होत गेली. शिवाय एकांकिकेत सुलतान नावाच्या वाघाला फार महत्त्व आहे. अर्थात तो प्रत्यक्ष स्टेजवर आणणं अशक्यच होतं; पण टेपरेकॉर्डरवरून त्याचा आवाजही establish होऊ न शकल्यामुळे हे अत्यंत महत्त्वाचं प्रतीक प्रेक्षकांपर्यंत पोहोचूच शकलं नाही. एकंदरीत न, एलकुंच-

वारांची ही एकांकिका प्रयोगक्षमतेच्या दृष्टीने थोडी डावीच वाटते.

त्यामानाने बी. जे. चीच 'इतिहास' ही एकांकिका चांगलीच उठावदार झाली. डाव्या आणि उजव्या उजव्या विचारसरणीतील संघर्ष हे या एकांकिकेचे मुख्य सूत्र. प्रसाद कुलकर्णी याने ही एकांकिका उत्तम बसवली होती आणि त्यामुळेच सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचं पारितोषिक त्याला मिळालं. प्रसाद कुलकर्णीचं कामही (सरकार) चांगलं झालं. त्याला अविनाश भोंडवेने (प्रती) आपल्या उत्तम आवाजाने चांगली साथ दिली.

दिग्दर्शनाच्या संदर्भात बोलताना प्रसाद कुलकर्णी म्हणाला, "बऱ्याच लोकांना ही एकांकिका आणीबाणीवर आधारित आहे, असं वाटतं; पण मला मात्र यातला विचार, संघर्ष हा स्थल-कालनिरपेक्ष वाटतो. म्हणूनच मी या एकांकिकेची निवड केली. मूळ एकांकिकेमध्ये सरकार, प्रती आणि बाकी अशी तीनच पात्रं आहेत; पण आधीच wordy असलेली ही एकांकिका त्यात जर तीनच पात्रं असतील तर अधिकच असह्य होईल, असं वाटल्याने मी त्यात चार-पाच पात्रं अधिक घातली; त्यांचा वापर मी निरनिराळ्या सामुहिक हालचालींसाठी करून घेतला. हल्ली सामुहिक हालचालींचं अवास्तव स्तोम माजलं आहे, हा आक्षेप मान्य करूनही या एकांकिकेच्या दृष्टीने त्या आवश्यक वाटल्याने मी त्यांचा समावेश केला आणि मला हवा असलेला परिणाम साधला गेला."

'इतिहास'च्या पाठोपाठच सर परशुरामभाऊ महाविद्यालयाने 'पुरुषराव' ही एकांकिका सादर केली. जुन्या काळात बालविधवांचा होणारा कोंडमारा आणि त्यातून निर्माण होणारे सामाजिक प्रश्न यांचं दर्शन एकांकिकेचे लेखक-दिग्दर्शक प्रा. विजय कारेकर यांनी 'पुरुषराव'मध्ये घडवलं आहे. अशा तऱ्हेचा विषय पुरुषोत्तम करंडक स्पर्धेच्या (आणि स. प. च्याही ?) इतिहासात प्रथमच मांडला गेला असेल. एकांकिकेची बांधणीही नीटस होती. जयवंत दळवींच्या 'बॅरिस्टर'चा वास मात्र मधूनमधून येत होता; पण यंदाच्या स्पर्धेतील ही एक उल्लेखनीय एकांकिका. अंजली परांजपे (लक्ष्मी) अविनाश ओक (अनंता) आणि मंगेश ठाकूर (गंगाधरपंत) यांनी कामंही व्यवस्थित केली होती. अंतिम निर्णय अंदाज स्पर्धेत बऱ्याच मंडळींनी या एकांकिकेला स्थान दिलं होतं. आता हा अंदाज क्वचितच खरा ठरतो; त्याला कोण काय करणार? कदाचित हा विषयच आता मागे पडल्यामुळे असं झालं असेल.

यंदा अभियांत्रिकी महाविद्यालयाने दोन चांगल्या एकांकिका सादर केल्या. त्यातली एक तर पुरुषोत्तम करंडकच घेऊन गेली. रवींद्र मंकणीने दिग्दर्शित केलेली 'स्ट्रे बर्डस्' या अभियांत्रिकीच्या दुसऱ्या एकांकिकेनेही एकूणात तिसरा क्रमांक मिळवला. व्हिएटनामच्या युद्धात कैद केल्या गेलेल्या सॅम नावाच्या जवानाची ही शोकांतिका आहे. युद्धाबद्दल सॅमला वाटणारा तिरस्कार एकांकिकेत वारंवार प्रभावीपणे व्यक्त होतो. एकांकिकेत पात्रं दोनच-एक सॅम हा युद्ध-कैदी आणि त्याची सतत उलटतपासणी घेणारा डेव्हिड. सॅमच्या भूमिकेबद्दल रवींद्र मंकणीने यंदाचं उत्कृष्ट अभिनयाचं पारितोषिक मिळवलं; पण त्याच्या प्रत्येक हालचालींवर-ओठांच्या, हातांच्या, पायांच्या, मागं वळून पाहण्याच्या-मोहन गोखलेचा प्रचंड प्रभाव जाणवत होता. आता एखाद्या प्रस्थापित नटाची तंतोतंत नक्कल हा अभिनयाच्या दृष्टीने दुय्यम दर्जा मानावा का, हा वादाचा विषय होऊ शकेल; पण या पार्श्वभूमीवर गेल्या वर्षी बी. जे. च्या सदानंद बोरसेचा 'कैद'मधील स्वतंत्र अभिनय निश्चितच उठून दिसतो. एकांकिकेत वापरलेल्या तांत्रिक क्लृप्त्याही जुन्याच होत्या. उदाहरणार्थ, कैदेतला सॅम दाखवण्यासाठी स्पॉटवरच जाळी बसवून तो सॅम बसलेल्या खुर्चीवर टाकणे, (गेल्या वर्षी 'पिदी'मध्ये ही क्लृप्ती वापरली होती.) किंवा मागच्या पडद्यावर सावल्या दाखवून एखादा flash back घेणे. (थिएटर ॲकॅडमीच्या स. प. महाविद्यालयातील सांस्कृतिक केंद्राच्या उद्घाटनाच्या वेळी मुंबईच्या उदय कला केंद्राने सादर केलेल्या 'काय वाट्टेल ते' या एकांकिकेत ही क्लृप्ती वापरली होती.) सर्वोत्कृष्ट विद्यार्थी-लेखकाला मिळणारं पारितोषिक याच एकांकिकेचा लेखक रवींद्र सरदेसाई याला मिळालं. तो सध्या बी. जे. मध्ये शिकत आहे. कोरियन युद्धावरील एका कादंबरीतून या एकांकिकेची theme सरदेसाईला सुचली. यापूर्वीही त्याने एक-दोन एकांकिका लिहिण्याचा प्रयत्न केला होता; त्या त्याच्या त्यालाच न पटल्यामुळे सरदेसाईने स्वतःच फाडूनही टाकल्या. म्हणजे तसं पाहिलं तर ही त्याची पूर्णपणे लिहिलेली आणि सादर केली गेलेली पहिलीच एकांकिका. त्या दृष्टीने प्रयत्न निश्चितच स्तुत्य आहे.

जाता जाता 'पिकनिक्' या एकांकिकेचा उल्लेख केलाच पाहिजे. टिळक आयुर्वेद महाविद्यालयाची 'पिकनिक्' आणि शाहू कॉलेजची 'नारदा, अवतार घ्यायलाच हवा' या दोनही एकांकिकांचा मुख्य गुण म्हणजे कोणतंही पात्रं विशेष प्रभावी नसताना दोन्ही कॉलेजेसनी टीमवर्क चांगलं दाखवलं. आणखी एक उल्लेख केला पाहिजे तो आबासाहेब गरवारे कॉलेजच्या 'अंधारवाडा' या एकांकिकेचा. ही एकांकिका बसवली होती बऱ्यापैकी; परंतु तिच्यातला भयाचा परिणाम मात्र दिग्दर्शकाला नीट साधता आला नाही. (कोणी तरी एक कॉलेज-कन्यका मात्र ही एकांकिका पाहताना फारच घाबरल्याची वदंता आहे.) सुनेत्रा मिरासदार (नेत्रा) या विद्यार्थिनीने आपली भूमिका समंजसपणे केली. आवाजाचीही उत्तम देणगी तिला लाभली आहे. वाक्यांची डिलिव्हरी आणि कंपोझिशन्स यात मात्र सर्वच पात्रं कमी पडत होती.

लॉ कॉलेजने सादर केलेली 'घेराओ' ही एकांकिका प्रेक्षकांची दाद घेऊन गेली. सध्याची शिक्षणपद्धती, परीक्षापद्धती, विद्यापीठ, व्हाईस चॅन्सलर या सर्वांची रेवडी उडवणं हा एकांकिकेचा प्रमुख उद्देश असावा. एकांकिकेतील सामूहिक हालचाली चांगल्या बसवल्या होत्या; पण विद्यार्थी-नेते मात्र वाजवीपेक्षा अधिकच आवेश आणून वागत होते-अभिनय करीत होते. अर्वाच्य शब्दांचीही संहितेमध्ये पुरेशी भर होती.

प्रभाकर वाडेकर या विद्यार्थी-लेखकाच्या यंदा दोन एकांकिका सादर झाल्या. गेली तीन वर्षं वाडेकर एकांकिका-लेखन करत आहे. दुर्बोधता हा त्याच्या एकांकिकांचा एक खास विशेष (गुण की दोष ?). तरीही यंदाच्या त्याच्या 'ओंडका' आणि 'अथपासून इतिपर्यंत' या दोन्ही एकांकिका पहिल्या पाच क्रमांकात आल्या, हे निश्चितच कौतुका-

स्पद आहे. कोणती तरी एकच imagery घेऊन वाडेकर ती सबंध एकांकिकाभर सर्व बाजूंनी ताणत असतो. त्यामुळे काही वेळा त्रास होतो. त्याची 'अथपासून इतिपर्यंत' या एकांकिकेमध्ये वॉल्टर डीला मेर या कवीची Railway Junction ही कविता आणि बेकेटचं Waiting For Godot वारंवार डोकावताना आढळतात. अर्थात आपण यापैकी काही वाचलं असल्याचं वाडेकरने नेहमीप्रमाणेच अमान्य केलं.

पारितोषिक वितरणाच्या वेळी स्पर्धेचे संयोजक श्री. राजाभाऊ नातू यांनी आपल्या अहवालात आणि स्पर्धेचे एक परीक्षक डॉ. वि. भा. देशपांडे यांनी आपल्या निवेदनात एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख केला. ती म्हणजे, येथील परीक्षकांवर निकालाच्या बाबतीत संयोजकांकडून किंवा इतर कोण-त्याही व्यक्तीकडून कोणतंही प्रेशर आणलं जात नाही. जो निर्णय स्पर्धक प्रेक्षकांपर्यंत येतो तो परीक्षकांचा आणि फक्त परीक्षकां-चाच असतो; पण संयोजकांना किंवा परीक्ष-कांना ही गोष्ट आवर्जुन सांगावी लागावी, हेच पुरेसं बोलकं आहे.

डॉ. वि. भा. देशपांडे यांनी आपल्या निवेदनात एक चांगली सूचना मांडली. त्यांच्या मते, सध्या स्पर्धेतील एकांकिका किंवा अभिनेते यांना गुण दिले जातात. त्या ऐवजी श्रेणीपद्धत (Gradation) अंमलात आणावी; पण यामध्ये एक अड-चण वाटते. ती म्हणजे, समजा, यंदाच्या पहिल्या चारी एकांकिकांना A grade देण्यात आली आहे; पण मग यातील कोणत्या एकांकिकेला पहिला क्रमांक द्यायचा आणि कोणत्या एकांकिकेला चौथा क्रमांक द्यायचा, हे कसं ठरवणार? कारण दोन्ही एकांकिकांना फक्त ग्रेड दिलेली. अशा वेळी गुणपद्धत उपयुक्त ठरते. विद्यापीठाच्या पदव्युत्तर सत्रपद्धतीमध्येही जरी श्रेणीपद्ध-तीचा अवलंब आता केलेला असला तरी गुणपद्धती त्यांनाही पूर्णपणे टाकून देता आलेली नाही. किंबहुना ते फक्त प्रथम श्रेणी, द्वितीय श्रेणी या ऐवजी A ग्रेड, B ग्रेड असा बदल करू शकले आहेत. या ग्रेडस् गुणां-वरूनच ठरवण्यात येतात. तेव्हा याही मुद्याचा विचार व्हावा. कारण एकदा श्रेणी-पद्धत स्वीकारून चार एकांकिकांना ए ग्रेड दिल्यानंतर त्यामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय असे क्रमांक तर-तम भावाने देणे न्याय्य ठरणार नाही.

गेली तीन-चार वर्षे पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धा पाहिलेला कोणताही सुजाण प्रेक्षक हे मान्यच करील की, स्पर्धेतील विद्यार्थ्यांचा उत्साह कमी झालेला नाही; पण दर्जा मात्र दुर्दैवाने खालावत आहे. याला कारणं अनेक असतील; पण मला एक संभाव्य कारण असं दिसतं की, गेल्या-वर्षीपासून या स्पर्धेच्या नियमांमध्ये असा एक नवीन नियम घालण्यात आला आहे की, स्पर्धेतील दिग्दर्शन, पडद्यामागील साहाय्य, प्रकाश योजना, ध्वनी योजना, नेपथ्यादि सर्व कामे स्पर्धक संघाच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनीच करावयाची आहेत. महाविद्या-लयाबाहेरील सहाय्यकास ही कामे करा-वयाची परवानगी मिळणार नाही. मला वाटतं, हा नियम दर्जाच्या दृष्टीने थोडासा जाचक होत आहे. कारण त्यामुळे महा-विद्यालयातील विद्यार्थ्यांच्याच दिग्दर्शनावर तांत्रिक ज्ञानावर सर्व भार पडतो आणि हा भार समर्थपणे पेलण्याइतके महाविद्यालयीन विद्यार्थी तयार झालेले नसतात. दोन वर्षां-पूर्वी जेव्हा हा नियम नव्हता तेव्हा महा-विद्यालयात शिकत नसलेल्या, पण दिग्दर्शन किंवा इतर तांत्रिक अंगांच्या बाबतीत चांगली जाण असलेल्या व्यक्तींच्या हाता-खाली काम करण्याचा अनुभव विद्यार्थ्यांना मिळत असे आणि तो त्यांच्या भावी कार-कीर्दीच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरत असे; पण हा नियम झाल्यापासून प्रामाणिक विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या प्राध्यापकांना सर्वस्वी स्वतःवरच अवलंबून रहावे लागते आणि ते जर या जबाबदाऱ्या पेलण्यास समर्थ किंवा लायक नसतील तर प्रयोगाचा दर्जा घसरणं स्वाभाविकच आहे. बाहेरील साहाय्यकामुळे विद्यार्थ्यांच्यातील सुप्त गुण दडपले जातील वगैरे जर वाटत असेल तर ते चुकीचं आहे. उलट योग्य मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाखाली ते अधिक चांगल्या तऱ्हेने आणि दिशेने वाढीस लागतील. किंबहुना कलेच्या क्षेत्रात, अनुभवी, गुणवान कला-कारांचा सहवास आणि मार्गदर्शन हेच शिक्षणाचं खरं साधन असतं. हा नियम काढून टाकल्यामुळे विद्यार्थी-दिग्दर्शकासाठी असलेलं पारितोषिक कुणीही विद्यार्थी असं बाहेरचं सहाय्य घेऊन मिळवील, अशी कुणाची एक तक्रार असण्याची शक्यता आहे; परंतु सध्या हे घडत नाही, असं जर त्यांना वाटत असेल, तर ती एक तर आत्मवंचना आहे किंवा भाबडेपणा आहे. त्यापेक्षा मग हा नियम पुन्हा अजिबात काढून टाकून नाट्यक्षेत्रात काही करून दाखवण्याची उमेद बाळगणाऱ्या या तरुणांना वर म्हटल्याप्रमाणे प्रत्यक्ष शिक्षणाची दारे तरी राजरोसपणे खुली करावीत. कारण भविष्यकालात मराठी रंगभूमीवर नावारूपाला आलेले अनेक अभि-नेते, लेखक दिग्दर्शक आणि तंत्रज्ञ प्रथम रंगमंचावर आणल्याचं पुण्य याच स्पर्धेने मिळवलं आहे.

—सतीश कामत


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

# चौकटीबाहेरच्या चरित्रनायकाचा अन्त

बाबा गेले. गेली किती तरी वर्षे ते असेच अवचित जायचे आणि यायचे देखील ! त्यांच्या नेहमीच्याच ह्या येण्या-जाण्याला सरावलेल्या आमच्यासारख्यांना त्यांचं आताचं हे कायमचं जाणं म्हणूनच कल्पनेपलीकडचं वाटतंय. वाटतंय, अजूनही पलीकडच्या खोलीतल्या त्या अर्थपूर्ण शांततेत ते काही तरी वाचीत तरी असतील नाही तर लिहीत तरी बसले असतील ! मग कुठल्या तरी एका क्षणी ते उठतील आणि खोलीतल्या खोलीत येरझारा घालीत कसल्या तरी विचारात दंग होऊन जातील. मग दुसऱ्याच क्षणी थांबतील, काही तरी आठवू लागतील आणि मग खुंटीवरचा आपला नेहरू शर्ट अंगात घालतील, वर काळचाशार रंगाचं जाकीट चढवतील, एका हातात छत्री आणि दुसऱ्या हातात काळी कातडी बॅग घेऊन मुंबईला, कोल्हापूरला, लोणावळचाला नाही तर दिल्लीला देखील जाण्यासाठी म्हणून जिना उतरायला लागतील आणि अवघ्या पंधरा-वीस मिनिटांतच बसस्टॉपवरनं तसेच परत पण येतील. आपल्या भल्या मोठया आवडत्या खुर्चीत बसून पुन्हा एकदा वाचायला घेतील, नाही तर तेवढचात आलेल्या कोणाशी तरी बोलण्यातच रंगून जातील !

आता असं काही होणं नाही. बोलणं नाही, आणि दिसणंही नाही. बाबा म्हणजे स्वप्न, कल्पना, विचार, वाचन. बाबा एकदा बोलू लागले म्हणजे नवनव्या कल्पनांची कवाडं आपोआपच उघडी व्हायची. सुंदर सुंदर स्वप्नांची मांडणी, मोडणी आणि पुन्हा उभारणीही व्हायची. विचारांची आतषबाजी दिसायची आणि नव्या-जुन्या, पौवार्त्य-पाश्चात्य संदर्भांची नुसती उधळण व्हायची. मिनिटांमागून मिनिटं, तासामागून तास, बघता बघता फस्त व्हायचे. बाबा भान हरपून बोलायचे. कधी त्यांचा नुस्ता चेहराच बोलायचा, तर कधी कधी त्यांचे हातवारे काही तरी सांगायचे, तर कधी त्यांच्या त्या मिष्किल हसण्यातच खूप काही अर्थ असायचा. बाबांना तसं कुठल्याच विषयाचं वावडं नसायचं. मार्क्स असो नाही तर मर्ढेकर, बुद्ध असो नाही तर बर्गमन, शिल्प असो नाही तर आजचं शास्त्र, बाबांचे शब्द चौफेर संचार करीत राहयचे; पण विषय कोणताही असो त्यांच्या संभाषणाचा ओघ बऱ्याचदा बघता बघता ज्ञानेश्वरांपर्यंत जाऊन पोहोचायचा. ही ज्ञानेश्वरांची ओढ त्यांच्या रक्तातच कुठे तरी असावी.

साहित्यातल्या 'भटक्या' जमातीचं प्रतिनिधित्व करणाऱ्या बाबांनी संसारी असून देखील रूढार्थानं संसार केला नाही. लेखक असूनही सरसकट आपली लेखणी राबविली नाही आणि संपादक असून देखील संपादनाची ठरीव चाकोरी मळली नाही. कारण मुळातच हा चारचौघांसारखा चौकटी मांडणारा माणूस नव्हता, तर तो मांडलेल्या चौकटी मोडणारा माणूस होता. आखीव, व्यवहारी जगणं हे तर त्याच्या स्वभावातच नव्हतं आणि त्यामुळंच अस्थिरतेचं त्याच्या व्यक्तिमत्त्वावर शिक्कामोर्तब झालं. आठवतंय, वर्षामागून वर्षं फरफटत चालली होती आणि आज इथे तर उद्या तिथे आणि परवा आणखी कुठे अशीच बाबांच्या आयुष्याची वाटचाल चालली होती. दलालांबरोबरचं 'दीपावली' हे मराठीतलं पहिलं वार्षिक, मुंबई आकाशवाणीवरची नभोनाटचं, मग नोकरी, कुमारसेन समर्थांबरोबर 'साईबाबा' सिनेमा, जव्हारच्या राजांचं चरित्रलेखन, 'चिमुकली दिवाळी'सारखा लहान मुलांसाठीच सुंदर आणि कल्पनापूर्ण अंक, यामिनी हा दिवाळी अंक, राजा केळकर वस्तुसंग्रहालय, ह. वि. देसाईंबरोबर बेळगावला 'विशाल महाराष्ट्र' दैनिक, भोगावकरांबरोबर कोल्हापूरला 'धरती' वार्षिक, पुण्यात 'आरती' ह्यासारखा दिवाळी अंक, 'रात्र' हा स्वतःचा काव्यसंग्रह, कोल्हापूरच्या गर्जनेचे विशेषांक, भारतीय स्त्रियांवर संपादित केलेला प्रचंड इंग्रजी ग्रंथ, लोणावळचाचं कैवल्यधाम, सरपोतदारांचं 'दिल्लीदरवाजा' हे मासिक, बाबांचा अखंड प्रवास चालू होता. एस्टॅब्लिशमेंट हा शब्दच बाबांच्या शब्दकोशात नसावा म्हणूनच ह्यातल्या कुठल्याच चौकटीत गुंतून पडणं त्यांना मानवण्यासारखं नव्हतं. कुठं काही महिने, कुठं वर्ष, कुठं दोन वर्षं, कुठं चार, माझ्या माहितीतली ही तीसेक वर्षं बघता बघता खर्ची पडली. अगदी परवा-परवापर्यंत हा प्रवास चालूच होता. कल्पना आणि वास्तव, संकल्प आणि सिद्धी ह्यांतली खोल दरी मात्र अजूनही जशीच्या तशीच होती.

अलीकडच्या अशाच एका संध्याकाळी मी जरा उत्साहानंच बाबांना विचारलं, बाबा, आता तुम्ही आत्मचरित्र का नाही लिहीत ?'

बाबा क्षणभर पहातच राहिले. गंभीर झाले. नेहमीसारखाच चष्मा वर सरकवीत म्हणाले,

'अशोक, खूप जण म्हणतात, लिहा म्हणून; पण काय लिहिणार मी ? अरे, परिस्थितीनं मला आत्तापर्यंत इतकं बोचकारलं आहे, रक्तबंबाळ केलं आहे. अपयशाशिवाय माझ्या आयुष्यात लिहिण्यासारखं दुसरं काहीही नाही !'

बाबा बोलता बोलता थांबले. नेहमी-सारखे किंचितसे हसले. म्हणाले,

'आणि एक सांगू का ज्यानं आत्मचरित्र लिहिलं ना तो तिथंच संपला ! ह्या क्षेत्रातनं निवृत्त झाला. मला नाही वाटत येवढ्यात मी असं निवृत्त व्हावं म्हणून अजून एक-दोन काम करायचीयंत. मग ज्ञानेश्वरी-बद्दल मला एक ग्रंथ लिहायचाय. बस्स, एवढं झालं ना की मग आत्मचरित्र !'

त्या दिवशी बाबा अधिक काही बोलले नाहीत; पण वाटत होतं, त्यांनी आता आधी आत्मचरित्र लिहावं आणि मराठीच्या ह्या साहित्यदालनात मोलाची आणि वेगळी भर घालावी; पण बाबांचा हाही संकल्प सिद्धीला नेणं नियतीलाच मंजूर नसावं !

बाबांचं अवघं आयुष्य म्हणजे ऊन्ह–सावलीचा खेळ होता. साऱ्या जीवनप्रवासातच वास्तवाचं ऊन्हच त्यांच्या सदैव सोबतीला राहिलं. कधी कधी त्या उन्हाची तिरिपच मुळी इतकी प्रखर असायची की, त्यात वणवण हिंडणाऱ्या एकट्या बाबांचीच होरपळ व्हायची असं नव्हे, तर त्यांच्या कुटुंबियांनादेखील वेळोवेळी त्या उन्हाची झळ लागायची; पण त्या साऱ्यांनीच ती ती वेळ, ती ती परिस्थिती बिनतक्रार निभावून नेली. नाही म्हणायला यातही सावलीसारखे समाधानाचे काही क्षण होतेही. मुलांचं तर बाबांवर अलोट प्रेम आणि बाबांचीही आपल्या मुलांवर अप्रगट पण अपार माया होती ! म्हणूनच प्रत्येक अपयशात त्यांच्या सर्वच मुलामुलींनी बाबांची जशी अजोड पाठराखण केली, तशीच बाबांनीही आपल्याकडून होईल तेवढी त्यांच्या भावनांची वेळोवेळी बूजही राखली. बाबा घरात असोत–नसोत, ते नेहमीच त्या सर्वांच्या आदराचा आणि अभिमानाचा विषय बनून राहिले.

आठवतं ' विशाल महाराष्ट्र 'त असताना बाबा ' अलख निरंजन ' नावानं आपलं सदर लिहीत. ' धरती 'त असताना ' निरंजना निराला ' नावानं लिखाण करीत. साहित्यात ते अवलिया म्हणूनही ओळखले जात. ' रात्र 'मधल्या त्यांच्या कविता एक प्रकारे विरक्तीचीच चिंतनचित्रे ठरतात. एकंदर संसारात राहूनदेखील विरक्तीचीच ओढ त्यांच्या रक्तात कुठे तरी दडलेली असावी. ह्या सहजप्रवृत्तीमुळेच त्यांचं पाऊल कुठल्याच व्यवसायात, कुठल्याच साहित्यक्षेत्रात, कुठल्याच ठिकाणात स्थिरावलं नसावं. बाबा तसे कुठेही असोत, कुठलीही संपादकीय वा इतर कामगिरी बजावीत असोत–नसोत, त्यांच्या एकूण व्यक्तिमत्त्वाभोवती गूढतेचं एक आवरण असायचं. त्यांच्या कर्तृत्वाबद्दल वाद असायचे आणि वागण्याबद्दल निरनिराळ्या वदंताही असायच्या. जीवनानुभवांवर बेतलेल्या स्वतःच्या नाटकात बाबा जसे कुठे तरी असायचेच तसेच ते कुठल्या तरी कादंबरीचे चरित्रनायक म्हणूनही नांदायचे.

बाबांच्या व्यक्तिमत्त्वात परस्परविरोधी गुणांचं एक विलक्षण मिश्रणही आढळायचं. त्यामुळंच ते एका क्षणी जसे गंभीर दिसायचे तसे दुसऱ्या क्षणी मिष्किलही व्हायचे. अजूनही वाटतंय, ते आमच्या घराचं पुढचं दार किलकिलंच उघडतील, बोटांनी खूण करून जवळ बोलावतील, आपली मिटलेली मूठ माझ्या तळहातावर दाबीत चष्म्यातनं मिश्किलपणे पहात म्हणतील,

' ओळख पाहू ?'

' काय आहे बाबा ?'

' गंमत. घे; पण देऊ नको हं कुणाला !'

आणि मग ती मिटलेली मूठ उघडल्यावर त्यातून चार-दोन रायआवळे नाही तर शेंगदाणे पाहायला मिळतील. बाबांचा तो खट्याळ हसरा आविर्भाव आठवला की, आज देखील गलबलल्यासारखं वाटतं.

अजूनही वाटतंय, वर्षभर घरी पाय न लागलेले बाबा दिवाळीच्या पहाटे घरी अचूक अवतीर्ण होतील. तऱ्हतऱ्हेच्या रंगबिरंगी कव्हरांचे असंख्य दिवाळी अंक जादूगाराच्या पोतडीसारखे आपल्या बॅगेतून काढून आम्हा मुलांना वाचायला देतील आणि मगच आमची दिवाळी ते अंक वाचून खऱ्या अर्थानं साजरी होईल !

ह्याच काय ह्यासारख्या अनेक आठवणी आज गलका करून उठतात. कधी हुरहूर लावतात, कधी खिन्न करून सोडतात. एवढं मात्र खरं, ह्या पुढच्या व्यवहारी जगात अशी माणसं सहजासहजी भेटणार नाहीत आणि क्वचित भेटलीच तर ती ' रॉय किणीकर ' असणार नाहीत !

—अशोक प्रभाकर डांगे

[ मृत्युदिन : मंगळवार – ५ सप्टेंबर – ७८ ]